CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

G-1
69/19

अलमारी संख्या ———

९६

खाना संख्या ———

विवाह

बंडल संख्या ———

फाइल की संख्या

क्रम-संख्या

फाइल का शीर्षक

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

G1 69/19 Provincial ... LUCKNOW. 954.03 G1 69/19

पेशवे दप्तरांतून निवडलेले कागद

१९

पेशवे माधवराव यांचा रघुनाथरावांस विरोध

[किंमत—१ रुपया ७ आणे किंवा २ शिलिंग ६ पेन्स]

गव्हर्न्मेंट सेंट्रल प्रेस, मुंबई

१९३१

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

STATE MUSEUM, LUCKNOW
LIBRARY

Acc. No. ______________

Book No. ______________

Government do not share any responsibility for the comments and views expressed by the editor.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

PESHWA MADHAVRAO AT CROSS PURPOSES WITH HIS UNCLE RAGHUNATHRAO

1761–1772

.t is well known how the domestic dissensions in the Peshwa family, lowing the great disaster of Panipat, considerably weakened the ıratha power. The few accounts and details the student so far ;sesses are scrappy, disconnected and incomplete, so that it becomes l-nigh impossible to form a correct view of the situation. But papers brought together under this section and numbering over undred, yield a connected story of that long struggle, which assumed erent phases at different periods. When two prominent figures in a ng family start an open fight, the various subordinates and dependents their position very delicate and often follow the course which in r opinion would most conduce to their personal interest. This tion is well explained in the present papers and can be definitely ›wed through its minute intricacies.

he dispute started at Poona in the autumn of 1761 and gradually ıght the uncle and the nephew to open blows. A severe action was ht by the two with their camps on the opposite banks of the river d (12th November 1762) in which the uncle got the upper hand ; and way in which the nephew on his own initiative and with admirable ence of mind quietly threw himself on the mercy of the uncle near ;aon (on the Bhima) proved at once what metal the young Peshwa made of. While in confinement, he managed his uncle very cleverly secured his hearty co-operation in the subsequent struggle with the am over whom the two won a splendid victory at Rakshasbhuwan h August 1763) on the banks of the Godavari. This victory enabled Peshwa to assert his power for the rest of his life.

\n important episode which enhanced the young Peshwa's iculties was the sudden appearance of the pretender Sadashivrao ıu, who was in reality a north-Indian Brahman named Sukhnidhan, l who created an unprecedented stir throughout India for some time. good many letters of this section graphically describe the various ›penings in connection with the pretender's movements and ions and with the measures adopted by the Peshwa to capture and .ıish him.

In the year 1765 Raghoba undertook an expedition into Northern



woefully mismanaged it contrived to throw the blame on emanded from him a half share in the Government. as revived and the relations of the two became entirely after long and varied negotiations for settlement, an t between them in the summer of 1768. One Naro by Raghoba, defied the orders of the Peshwa to deliver of Burhanpur, which was forcibly reduced to the great

Facs: uncle and his party. But Madhavrao was not the

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

same young inexperienced boy now that he had been six years befo He had established his prestige and acquired a reputation for managi men and matters with consummate skill and foresight, so that he eas inflicted a crushing defeat on his uncle in an action near the fort Dhodap (10th June 1768), captured him and imposed stringent rest tions on him and in addition severely punished his accomplices who been responsible for all the trouble. A large number of very interes papers here for the first time see the light of the day, clearly setting out destructive characteristics of this domestic contest. The terrible pun ment meted out to Gangadhar Yashwant Chandrachud and his tr end, together with a few details of the Peshwa's campaign against Ja Bhonsle of Nagpur, complete an important section relating to the s and eventful career of the best of all the Peshwas.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh



Facsimile of the handwriting of Raghunath Hari Newalker.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 104



Facsimile of the handwriting of Raghunathrao. (1734–1783)

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 1] [*22-2-1756*

श्रीशंकर

विष्णु राम याप्रति वरदाचे आशीर्वाद उपरी. अत:पर पत्र येईल ते संज्ञेने पाठवावे. मार्ग बहुत कठीण व चिकित्सक फार. शास्त्री जवळ नाहीत म्हणून संस्कृत न लिहिलें. पुराणश्रवणाखेरीज तुझे बुधीस निर्मळता होता दिसत नाही. खामखा पुराणीक ठेऊन प्रहरपर्यंत पुराण आइकत जाणे. रेवा माहात्म्य अथवा रेवाखंड असले तरी जरूर जरूर आइकणे. दरदाची गाठ पडल्यावरी पुस्तक देतील तोपर्यंत तेथेंच पुस्तके हरइलाज करून मेळऊन वाचीत जाणे. पुराणीक न मिळे तरी तूच वाचीत जाणे. जितके कळेल तितकेच कळो; परंतु * * * राहिल्याने संसारात मन पडेल. जवळ असतो तरी सिकवितों. आतां पुराणच सिकवीन. दुसरा इलाज नाहीं. शास्त्री आले तरी तुम्ही दोघे जेवल्यावरी च्यार घटिका पुराण वाचावी हे खामखा करणे. चहु घटकासी कार्य; बाकी सारे करणे. तुलाहि वाचता येईना तरी कौमुदी अथवा आमरकोश हा तरी पाहात जाणे. तेथे ब्राम्हण भला पाहून या प्रमाणें करणे, नाही तरी विषयासक्त होसील. मग सारेच गेले. लिहिता गाठ पडत नाहीं. तूं एक लिहिलें हजारा जागा मानून नित्य रिकामा न राहणें सत्कालक्षेप करीत जाणे. परगण्याचा वगैरे बंदोबस्त तरी केलाच असेल. एक कारभारी भला माणूस ठेऊन तूं रिकामा होऊन हे करीत जाणे. त्याणे च्यार रुपये खादले तरी खाऊ; परंतु हे अगत्य करीत जाणे. मजकडील कागद आठापंधरा दिवशी वाचून पाहात जाणे म्हणजे ठीक पडेल. शास्त्रीसहि लिहिलें आहे तेहि लवकरच येतील. आम्हाकडील वर्तमान तरी आम्ही उत्तम रीतीने आहो. आम्हास मोठा भरवसा तुमचा आहे. विशयासक्त न होणे. आम्ही पोथी पाठविली ती पाठ केलीच असेल. तिचे मनन एकांती करीत जाणे. माघ वद्य ७ सप्तमी आदितवारीं रवाना केले.

¶ *This paper is of the same nature as the next one, which has a fuller note.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 2] [*16-3-1756*

बदसुमार ४

पो छ २ रजब

श्रीशंकर

चिरंजीवास वरदाचे आसीरवाद. पत्र पाठविले ते पावले. कलमवार उतरे लिहिली ती कलली. यैसियासी सांप्रत कलमवार जाबसाल लिहिले असेत. उतरे पाठवणे. सावकाश दोनतीनदा पत्र पाहून मनन करीत जाणे.

रामचंद्र बलाल भुसकुटे यास पहिलीहि रुबरु ताकीद केलीच होती. सांप्रत दोन तीन दिवस त्यास येथून जाऊन जाहाले. यास्तव ताकीदपत्रे पाठविली आसेत; परंतु त्या ताकीद-पत्रावर तुम्ही चढी लागाल तरी न लागणे. विचाराखालेच चौघासी मैत्री राखून काम करणे. दोन रुपये तोटा आला तो पुरवला. परंतु सोब-त्यासी दावा कामाचा नाहीं. ताकिदी मात्र पाठविल्या आहेत. जे लागेल ती देत जाणे. ताकिदीवर काही आमचे वजनावर रागावर काम करणे. निदान सोबती फारच लबाड्या करूं लागले तरी सिबंदी जाजती ठेऊन येखाद्याचा मोबदला करावा; परंतु कंठ हा की (?) आता रयत ओस होते. इलाज नाही. ते वेलेस आंगी लबाडी पुर्ती चौघाचे साक्षींने लाऊन मग येखाद्याचे पारपत्य जातीने करावे. तोपर्यंत तूटच सोसीत जावी. तूट सोसणे हेंच उचित आहे. आम्हासहि येथे हिसका बसणार नाही. च्यार रुपयावर मदार न ठेवणे. रयत लावणी उतम करणे कलम १

उष्णकाल प्रात झाला आहे. या दिवसांत ब्राम्हणाची वसंतपूजा करीत जावी. वसंतपूजा करून दक्षणा पैसा मात्र द्यावा. त्याजवर च्यार घटिका अथवा प्रहरपर्यंत पुराण आइकावें. येणेप्रा। करीत जाणे. नव्या ब्राम्ह-णास जोडा पायपोस नसेल त्यास जोडे द्यावे व वाल्याचे पंखे ब्राम्हणास सिष्टास अतिथीस द्यावे येणेप्रा। करीत जाणें. ब्राम्हणास ताक दही-भात हिरव्या आंब्याचे सरबत ऐसीं देत जाणे. पुढे आंबे पिकल्यावर आंबे विकत घेऊन आंब्रभोजन घालीत जाणे. खरबुजे द्यावी. उत्तम पदार्थ देवास व ब्राम्हणास द्यावा यैसे करावे; व आपण बहुत नरमाईने व गरिबीने असावें. तप करावें. हेंच सांप्रत तुम्हास उचित. राजधर्म आम्ही करीतच आहों, तूं व शास्त्री ब्राम्हणधर्मच करीत जाणे. महादेवा-वर उन्हालाची गलती लावणें. दोन च्यार जागा गलती लाऊन ठेवणें. कलम १

आम्ही नेमणूक केली आहे त्यापेक्षा वसंतपजा अथवा सिबंदी व परगण्यात

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

शास्त्री याची स्त्री आली हे तुला त्याणी बहुधा लिहिलेच असेल. तेहि लौकरच येतील. तूहि खर्चाची बेगमी केलीच असेल कलम १

कलमवार यादी लिहिल्याची उत्तरे वगैरे कुपिया निराला कागद लिहिणें आणि काही एक पुरवणी लोकास दाखवायाजोगी लिहित जाणे. येथे तुझे कागद आले. त्यामध्ये क(ल) मवार लिहिले होतें. तें तर कुपियाच होते. आणि दुसरे दोन कागद रामचंद्र भुसकुट्याचेविषईची रड होती ते दाखवावयाजोगी होती ते महिपतरायास दाखऊन ताकिदी लिहून पाठविल्या आहेत. याप्रोाच लिहित जाणे. कलम बाहरील पुरवणीत श्रीमंत राजश्री ऐसे लिहीत जाणे. कलम १

मंडलेश्वरचे पेठेंत कोष्टी व वस्त्रे नवी धोत्रजोडे सेले पागोटी करितात. याची वस्ती मेलऊन अगत्य करणे. तेथे नवे वस्त्र उपजे ऐसे करीत जाणे. होईल त्यास आलस न करणे. कलम १

या संवसारामध्ये शतवर्षें माणूस उद्योग करील. त्यास रिकामे पंधरा दिवस फावणार नाहीं. जितका व्याप तितका संताप हें तूं पुर्ते मनात आणून ठेवणे. तूं जितका व्याप करिसील तितका संताप होईल. तरी हे मनात आप् गीत जाणे. कारभार करावयासी कारभारी ठेवणें. चांगला मिलाला तरी बरेच जाहाले. नाहीतरी दर तोटा व अनुष्टान वगैरे किरकोल मजकूर व शास्त्री याचा खर्च वगैरे मिलोन अधिक लागेल त्यास मागे पुढे न पाहाणे. हे पहिले वर्ष आहे. या वर्षात च्यार अधिकआगली माणसे ठेऊन बंदोबस्त करणे. पुढल्या वरसापासून नेमलियाप्रोाच खर्च करावा. किंबहुना उणाच करावा, तो कसा होईल म्हणसील तरी यादी दिल्ही आहे तिच्या निमेचा डौल धरावा. तेव्हा त्या ताल्यास येईल. हा सवसार वाढिवला तितका वाढतो. तोडिला तितका तुटतो. हें तूं फार बारकाईने पाहात जाणें. आपल्या जीवाचे सुखास्तव काही न करावे. परोपकारार्थ खर्चेल ते खर्चा(वे) स्वार्थास लाऊ नये. आम्ही जीवे अर्थे प्राणे तप करावे. परोपकार करावा व साध्य वस्तु मुख्य करावे. सुखावर दृष्टी कामाची नाही. ज्यास जेवावयास अन्नवस्त्राची तृप्ति जाली म्हणजे सुखावर नजर धावते तसे न करावे, हे पुराण आइकता तुझ्या प्रत्ययास येईल. कलम. सारांश यदा रुपयाकडे न पाहाणे पुढे मी आल्यावरी बंदोबस्त करीन. कलम १

तेथे शास्त्री आलियावरी त्यास आमचे आजपर्यंत तुला कागद आसतील ते वाचून दाखवणें. कलम १

घर निर्मल राही ते करीत जाणे. घरात चिखल अथवा भलता अमंगल पदार्थ नसे ते करणे. फरशबंदी करणे

1767

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

वर्षास दूर करून दुसरा ठेवित जावा. जातीनें कारभार न करावा तेव्हा हा प्रकार प्राप्त होईल. नाहीतरी जन्म-परियंत फिरल्याने सार्थक नाही.

श्लोक

तद्गेहं यत्र वसति तद्भोज्यं येन जीवति । येन निष्पाद्यते चार्थस्तत्स्वके ममतात्र का । या श्लोकाची भावना करीत जाणे अर्थ कलेना तरी विचारून घेणे. कलम १

म्हणजे वाईट होणार नाहीं. फरशबंदी सिवाई पावसाला निर्मल राहाणार नाही. आपल्या घरासेजारी घर वाईट यास्तव किल्यापासून दूर घरे राहात जवल-वस्ती न होय ते करणें. जवल घर लडीबाईचेहि कामाचे नाही. शौचास ओढा जवल आसिला तरी त्याचे पाणी आणावे. नर्मदेचे न आणावे हे बनले तरी करणें. कलम १

लाखोट्यावर धोंडी खंडोजीचे नांव लिहून पाठवीत जाणें. आत लखोटा आमचा राहील. कुलपी लाखोटा बहुत मजबूत पाठवीत जाणे. आम्हीहि बलकट करून पाठवीत असतो. संव-ज्ञेने फार करून कुपिया पत्रांत लिहित जावे. पहिली नावे लिहिली आहेत संज्ञेची त्याप्रो ल्याहावी. आणिकहि संज्ञेने आम्हास समजेसे लिहीत जाणे. दरबारी पत्र चांगले पाठवीत जाणे. आमचे नांव वरद आहे. त्याप्रो तुझे नाव आमृतराव ठेविले आहे. या संज्ञेनेच तुला लिहीत जाऊ. तूंहि त्याप्रोच आम्हास लिहीत जाणे कलम १

येणेप्रो दाहा कलमे लिहिली आहेत. उत्तरे पाठविणे. शास्त्री यासी जल्द आपल्याजवल नेणे. आमचे कागद निराळेच ठेवणें. कधींबंधी व जाणे. जाणिजे छ १४ जमादिलाखर फाल्गुन शुध पौर्णिमा मंगल आसीरवाद.

शास्त्री
महादेवा-
दोन
ठेवणें.

¶*This and the previous one are two letters apparently in the handwr of Raghunathrao under the pseudonym Varada. The writer gives salu advice on various practical points of life. The papers disclose the curious enigmatical ways of Raghoba.*

पेक्षा
यात

1768

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

श्री

श्रीमंत राजश्री नाना
स्वामीचे शेवेसी

सेवक नारो कृष्ण सां नमस्कार विनंती. येथील कुशल जाणौन स्वकीये लेखनाज्ञा केली पा विशेष:— आपण सरकारचे पत्र पुणियाचे मुकामचे पा ते पावले. मसलत खर्चाची मोकासी याजवरी मागता म्हणौन कललें. ऐशास नेमणुकखेरीज ज्याजती खर्च काये जाला तो हिसेब हुजूर पा. मनास आणून आज्ञा करणे ते केली जाईल. तोंवर कोणास तगादा न करणे म्हणौन आज्ञा केली. ऐशास श्रीमंतानी लश्करातून आम्हास तोतियाचे पारपत्यास रवाना केले. त्याजवरून फौजबंदी करून जैनगराकडे आलो. तोतियास कितेक फितुरी लोक मिळाले. येणेकरून त्याचा जमाव भारी जाला. त्याचा आमचे युध्यप्रसंग बहुत जाले. मसलत वाढत चालिली ते समयांत जो जो प्रसंग वडोन आला त्याप्रो कार्यार्थी मनमाने तसा करणें प्राप्त जाला. त्याचा अन्वये पत्रद्वारें समजोतीत येत नाहीं. श्रीमंताचे प्रतापेकरून कार्य सिधीस गेले. या मसलतीचे खर्चाचा हिसेब पाठवावा तर त्वरेने तयार होत नाही. प्रांताचा बंदोबस्त राहून कार्यसिधी व्हावी म्हणौन वावगा कोणास उपसर्ग न देतां जातीवर कर्जवामाचा वोढा मनमाने तसा जाला तो सोसून कार्य संपादिले. सांप्रत कर्जाचा वोढा व फौजेचे देण्याचा वोढा या गर्गशांत आहो. याचा निर्गम होये तोपर्यंत हिसेब आकारत नाही. मसलत सेवटास गेलियावर मुलकात मसलत खर्चाची मदतपटी मागतो तेहि वावगी नाहीं. श्रीमंताचे आज्ञेप्रमाणेच वर्तणुक आहे. असे असता कोणी गाऱ्हाणे तेथवर आणितील त्यास आपण दिवस फ़रवावी. मसलतीस खर्च मबलग जाला. यापो थोडा बहुत मुलकांत तितका‌वा तर कर्जापासून आमची स्थित कसी राहते ? फौजेचे देण्याचा निकाल ठेवणे,डतो ? आणि स्वामीनी तऱ्ही खाजिन्यातून कोठवर द्यावा ? यास्तव कोणी तित‌णी घेऊन येतील त्यास आज्ञा करून आमची मदत करवावी. फौजेचा आप‌ा वारालियावरी हिसेब मसलतीचा आकारून सेवेसी पाठवितो म्हणजे सर्व कार‌ास येईल, व कितेक येतद्विशईचे अर्थ कारकून स्वमुखे निवेदन करितील तर

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

त्याजवरून ध्यानास येईल. सर्व सरंजामी याजवरी या खर्चाची थोडथोडी वाटणी केली आहे. ते वसुलांत आली पा. येविशी आपणाकडून ताकीद असली पाहिजे म्हणजे फौजेचा निर्गम होतो. सेवेसी विदित होय हे विनंती.

¶*Naro Krishna complains of the heavy expenses consequent upon the little skirmishes that he had with the Pretender of Bhausaheb and requests Nana to pay no heed to the people's complaints against him if there be any, with regard to the collection of dues. Naro Krishna Darve was the Officer in charge of the town of Burhanpur, rather favouring Raghunathrao as against Madhaorao.*

No. 4] [*27-11-1761*

पौ छ २५ जााखर नकल

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य

राजश्री अंबादास भाऊ स्वामीचे सेवेसी

सो माहादाजी कृष्ण साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून मार्गषीर्ष शुध १ तिसरा प्रहरपावेतो मुाा धांदर येथे सुखरूप असो विशेष. राजश्री खंडेराव भोसले व आम्ही श्रीमंत भाऊसाहेबाचे भेटीस जेनगरास बुधवारी त्रितीये प्रहरी छ २७ रोजी भेटीस गेलो. राजश्री खंडेरायाणी वर्तमान सांगितलें त्यावरून भेटी जाली. कोठून आला? मजकूर सांगितेला कीं श्रीमंत राजश्री नारो कृष्ण सरसुबेदार याच्या लस्करातून आलो; त्याजवरून खुशाल जाले. अकबरी मोहोर खोटी म्हणत होते त्यास मोहार खरी आहे. जे पहिले चलण व मुखचंद्र पाहिला होता त्याप्राोच आहेत. आपल्या चितांत काहीं संशये नाही. इतकियावर लोक काये म्हणतील ते म्हणोत. त्यांजवर ईश्वरी कृपा होईल तेव्हा सर्व लोक खरे म्हणतील; परंतु राजश्री नारो दादाजी व राजश्री माधोराव बांडे यैसे दोनसे स्वार व पाईचे माणूस दोनसे यैसे जमा जाहाले आहेत. परंतु भेटीस येत नाहीत. ते म्हणतात की तुम्ही भेटीस यावें. हे म्हणतात की आम्ही येत नाही. तुम्हास येणे असल तर पाचा माणसानसी येणे; नाही तर तुम्ही आपल्या घरास जावे. तुमची परव्हा धरीत नाही. श्रीमंताचे भेटीस कितीयेक ग्रहस्त आले. भेटी जाहाली. त्याचे चितांत आले, येथें कोणे गोष्टीचा संशये नाही. बऱ्हाणपुराहून राजश्री नारोबा नाईक आले; त्याची भेट जाली. भेटीअंती बोलखिले, भाषणे जाहाली, यैसा मजकूर आहे. येथे सिबंदी श्रीमंतानी ठेविली. पाईचे लोक पाचसे व स्वार दोनसे यैसे ठेविले आहेत. ढाला २ व डेरे २ यैसे गावच्या बाहेर उभे केले आहेत. येथून

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

जेनगराहून कोठे जात नाहीत. कितीयेक ग्रहस्तानी आपल्या हतचे लिहिले मागितले, त्यास जाब दिल्हा की डोलेयावर पडल आले म्हणून लिहिले मागतां ? आम्ही लिहिले देत नाही! मोहोर अकबरी खरी करून घेणे, यैसे बोलतात. राजश्री हरि दामोदर भेटीस येत नाहीत ; त्यास म्हणतात की न आला तरी त्याची परवा धरीत नाही. ईश्वरे येथवर निर्वाह केला, पुढेहि निर्वाह करील. आम्ही कोणास शरण जात नाही ऐसे म्हणत आहेत. राजश्री मल्हारजी होलकराचे नामस्मरण करीत आहेत; यैसा विचार आहे. श्रीमंत राजश्री नानास पत्र लिा आहे ते पावले. येथे लोकाणी रोजमन्याविषई निकड केली आहे ; तरी रोजमरा पाठऊन देणे. आम्ही मागाहून येतो. कलले पाहिजे. बहुत काये लिहिणें, कृपा लोभ असो दीजे हे विनंती. येथे धोंडो केशव आले त्याणी वोलखिले. संशये नाही, हे विनंती.

¶*The letter refers to the first appearance of the Imposter of Sadashivrao Bhau at Jaipur. It is interesting for the manner in which the subject is discussed. The witer is Mahadaji Krishna and the addressee Ambadas Bhau.*

No. 5] [*January or February 1762*

श्री

शेवेसीं आज्ञाधारक भगवंत विष्णु साष्टांग नमस्कार विज्ञापणा यैसीजे. राजश्री सखारामपंत ब्बापू रुशून गेले तेहि कार्य उत्तमच जालें. त्याचेहि चित्तास अहंता होती कीं आम्हांवाचून कारभार चालणार नाहीं. त्याचीहि अहंता दूर जाली असल! आपणांकडे वडीलपण आहे तो अर्थ ते समजत नव्हते. याजमुळें त्याचे मसलतीस धका बसला म्हणोन त्याचाहि चित्तांतून त्यास दर करूं नये. पुढें हिंदुस्थानची मोहीम मातबरच आहे. तिकडील दबाब तुमचे तरफेचा अगदीं उत्तम आहे. हिंदुस्थान प्रांतीं लौकिक बोली यैसी पडली कीं मल्हारबा मोठा प्रतापवंत आहे त्यास लौकिक बोलण्यावर दबाव आहे यैसा मनसबा करून तिकडील तमाम रजवाडियांसीं शकटभेद करून अगदीं वस्य केंले पाहिजे. दुसरें मल्हारबासी प्रीत रक्षून आपला नक्ष होये तो अर्थ केला पाहिजे. सिंदे याचे राजकारण भारी आहे. त्या मसलतीस माणूस मल्हारबाचे तोलाचा पाहिजे. नारो शंकराचा मजकूर * * * वगैरे मामलत आहे त्यास बार येवत नाहीं हे उज * * * ची जागा आहे. नारो शंकरामध्यें येक गुन मातबर आहे कीं पैसा ठोकून पिट्टून घेईल, परंतु तिकडील मुलकाची आबादी रक्षून सरकार पागाचा बंदोबस्त करून, याचा दबाब तिक-

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

डील राज्यावर बसणार नाहीं, कीं पूर्वी मल्हारबाकडूनच कमाविस होती. सांप्रत्य सिंदियाचें राजकारन सांगितलें तर तिकडील बोली हेच होईल. सर्व कारभार मल्हारबाचेच श्वाधीन केला. आतां श्रीमंताचे पदरीं मातबर माणूस कोन्ही दिसत नाहीं, याजमुलें आधिक दबाव उठोन जाईल. पुढें हिंदुस्थानची मसलत भारी पडेल. दाभाडे याचेहि मुलकाची मसलत भारीच आहे. साहेब म्हणतील कीं रामचंद्र जाधवराव व बापूजी नाईक तिकडील बंदोबस्त करितील; परंतु सालमजकुरीं त्यास पाठवावयाची मसलत नाहीं. त्यासी परस्तुत त्याचेच मुलकाजवळ दाहा वीस लक्षाचा मुल्क देऊन परस्तुत तिकडे कर्नाटक प्रांतावरहि दबान राहील. अविंदाचेहि मुलकावर दबान राहील. * * अरकाट प्रांतीं विसाजीपंत बिणीवाले आहेत. येकंदर फौजेची त्याची त्यास कुमक परस्परें बंदोबस्त केला पाहिजे. दमाजी गाईकवाड तोहि मातबर माणूस आहे. पूर्वीं साहेब-चाकरी उत्तम प्रकारची केली आहे. साल मजकुरीं कामकाजांत न आले म्हणून येकायेकीं त्यास तोडूं नये. त्याचा प्रकार येद्यपि तों खोटाई करूनहि आला नसेल तर आपन त्यास यैसें समजून ल्याहावें, कीं हिंदुस्थानचे मोहिमीमुळें इकडे यावयाची शंका धरिली तर येकरूप काळ कोन्हाचाहि नसतो. पुढें आयुशाची मर्यादा आहे तर पुढेंहि हिंदुस्थान तुम्हांकडून ईश्वर ई (अपूर्ण)?

¶*Bhagwant Vishnu to Raghunatharao, communicating that Sakharam Bapu had taken offence and retired, and advising how Malharrao Holkar, Naro Shankar and Damaji Gaikwad should be conciliated. The character of these persons is well analysed. The letter is fragmentary.*

No. 6] [*20-6-1762*

श्रीशंकर

यादी कलमे बंदोबस्ताची सुरुसन सलास सितैन मया व अलफ छ २६ जिलकाद. रविवार जेष्ठ-बहुल त्रयोदशी.

उभयता श्रीमंताही मातुश्रीचे विचारे आपले चित निश्चयांत आणून या दौलतेचे रक्षणाकरितां सर्व प्रकरे याकाळीं दौलत राखावयाचे व बंदोबस्ताचे व एकाचे हुकमात लहान थोर एके आज्ञेत चालावयाचे जे जे प्रकार या दौलतेत पैका नाहीं तेव्हां मनस्वी खर्च वाढेल. उपयोगी असतील ते जरूर जरूर राखावे. गैरउपयोगी परंतु भिडेचे म्हणून मुलाहिजा न धरितां बंदोबस्ताचे रीतीनें खर्च तोडून जमेचे प्रकार बेमुरवतीनें नीट

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

उचित प्रकारे याकाळीं जरूर जालेच पाहिजे त्या प्रकारे कलमवार निराळे निराळे मजकूर लिा ; याप्राा खामखा चितापासून ममता कृपापूर्वक घडवावे यामुळे कांहीतरी होऊ अगर कोणी काही कोणे वेळेस सांगो परंतु विकल्प चितात न आणितां चिताचा खंबीर ज्याजवर यख्तियार कारभाराचा दिल्हा त्याचेच पुस्तपन्हावर असावा. लक्षा प्रकारे ज्या प्रसंगी ज्या काळीं ज्या नेटाच्या जरबेच्या गोष्टी करणे त्या प्रमाणें खावंदाने करविल्या असतां दौलत उभी राहील यांत संदेह नाहीं. तथापि ईश्वरी इच्छा न कळे ; परंतु जो प्रकार योजिला तोच खामखा नेटाने सिधीस न्यावाच न्यावा यामुळें आधी वाईट मग बरे कसेहि जाले तरी कबल यैसा द्रढ निश्चय करून ईश्वरावर भार ठेऊ (न) सत्यापूर्वक सेवकाचे डोईवर हात ठेऊन निभाव करूंच करूं यैसी खातरनिशा सुभेदाराची पुरवावी. सुभेदाराही कारभारियाची पुरवावी. याप्राे जालियानें सेवक उमेदवार होऊन करील. या गोष्टीची निभावणी सुभेदाराकडे. त्याणी निभाऊन देऊ म्हणोन निशा करावी. हा मजकूर प्रथम कलम १.

सरंजाम मुछद्यास व सरदारास आहेत. त्यास सरजामाप्राे सरदारानी चाकरी मागें यद्यपि केली तथापि त्या सरंजामाचे उमेदीवर आपले कुवती प्राे तरतूद करून जो फौज घेऊन करून ऐवजास ठिकाण करावे. मागे दौलतेच कर्ज जालें त्याची पत आतां राहत नाहीं ; परंतु हली ज्याचे देणे ते कराराप्राा त्याचे त्यास देऊन पत राखावी. कर्जहि देणार फारसे नाहीत, तेव्हा पदरी मातबर आहेत त्यांनी व लहान असतील त्यांनीं सर्वांनी दोन तीन वर्षे आपले संसार थोडक्यावर करून सरकारची कुमक अर्थे प्राणे परिछिन करावी. त्याचे ऊर्जित जो निखालसपणें कामास येईल त्याचे पुढें समजोन चालवणे तसे चालवावें. या राज्यांत असोन या काळीं भरला भादला असोन दौलतेचे उपयोगास न ये त्याचा मुलाजा न करितां त्याजपासून घेणे ते घेऊन तो जशी वर्तणूक करील त्याप्राे तशी त्याजवर कृपा करून त्याचे त्यास सोय पडल्यावर देऊन त्याचेहि बरे अथवा वाईट करणे तसे त्याचे वर्तणुकेप्राे करावें. विना या प्रकारे केल्याखेरीज ऐवज जथोन फौजेस प्राप्त होणार नाही. विना फौज मनसबा सिधीस जाणार नाहीं. दुसरा मुख्यत्वे प्रकार. कलम १

सुभेदार महालकरी याचे कारभार देसचे व कोकणचे मनस्वी जाले आहेत. त्यात जो प्रमाणीक विश्वासू शाहणे ऐसे असतील त्याजवरच यख्तियार ठेऊन कारभार घ्यावे. * * * * मनस्वी कारभारी मनस्वी कारभार जाले ते नीट करून बंदोबस्त

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

निखालस चाकरीस येईल त्याचा सरजाम फौजेचे उपयोगास्तव त्याचा त्याजकडे ठेवावा. सरजामाचे उमेदीवर आंगावर पैका लाख दोन लाख च्यार लाख सात लाख दाहा लाखपर्यंत जसी ज्याची योग्यता तसी त्याने तरतूद करून सिरा चांगली फौज ठेवून आणावी. निमित्यास खोगीरगणती आणली तर खावंदाचे कार्य होणार नाहीं. उमेदीनें करील त्याचे ऊर्जित, दौलत काईम जालियावर खावंदानी करावे. जाजती पैका लागेल तो ज्याचा सरंजामात दो चौ वर्षात फिटेल तो त्याने फेडून घ्यावा. न फिटेसा असेल तो खावंदानी विचारे विचारे फिटोन उमेद करावा रयतेची बदुवा (बेदुवा) ? इजारेयानी जाली. त्यामुळें नुकसान थोडेसे जाले तरी कबूल करून रयतेची दुवा जरूर घ्यावी. ह्या गोष्टी एव्हाच होणार नाहींत. करीत करीत लिा लक्षाप्रमाणें कराव्या. कलम १.

खावंदाजवळ लहान मोठे कितेक पोटभरू आहेत. एकहुकमी कारभार जालियाने बहुतास अवघड वाटून बहुतजण या गोष्टीचे नाशास प्रवृत होतील. या गोष्टीचे पुर्ते स्मरण.

(यापुढील येक बंद मिळाला नाहीं.)

¶*This important document, of which the last and third sheets are unfortunately missing, puts down conditions of reconciliation between Raghoba Dada and his nephew Madhaorao.*

No. 7] [*1-9-1762*

पौ छ १२ रावल सन
सलास अस्विन सुध १४
चतोर्दसी सुक्रवार दोन प्रहर

श्री

राजश्री शाहाजी भापकर
गोसावी यासी

अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्नो माधवराव बलाल प्रधान आसीर्वाद. सुा सलास सितैन मया अलफ. पूर्वी तुम्हास तीर्थरूपांचे पत्र आले की, पथकसहित येणे; त्यावरून तुम्ही हुजूर लिहून पाठविले. त्याचे उतर राजश्री

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

बाबूराव फडनीस याणी खासा स्वारी सासवडास गेली होती म्हणून लिहिले की, तुम्हीहि न जाणे. व माहादाजी केशव यासहि न पाठवणे. त्यास हुजूर पाठवणे याप्रमाणे लिहून पाठविले. त्यावरून तुम्ही न गेला, येकनिष्टतेस उचित तोच अर्थ तुम्ही केला. तुम्ही इमानी लोक तुम्हापासून अंतर पडणे नाही हे [शिक्का] निशा आहे. मागेहि अंतर पडले नाही. पुढेहि पडणार नाही. प्रस्तुत तीर्थरूप औरंगाबादेकडे येणार. तुमची गाठ पाडून तुम्हास घेऊन जाणार. यास्तव हें पत्र लिहिले असे. तर तुम्ही त्याची गांठच पडो न देणे. किल्याजवल असल्याने ते किल्याजवल येणार नाही. सारांश गाठच पडो न देणे किंबहुना तेच तुमचा वेसवास[1] खाऊन किल्यासेजारी न येत व तुमचे आसपास खेड्यापाड्यासहि उपसर्ग न लागे ते युक्तीने करावे. आपला स्वार त्यांचे कबजेत न ये, दबावानेच दगा न खाता हुशार हमेश राहून तलावा दुरून सेदोंनसे स्वाराचा करावा. तुम्ही लस्करसुधा किल्याचे आंत थोरले शहरपन्हाचे आंत राहाणे. बाहेर परिछिन्न न राहाणे. आंत राहिल्याने बुलगे लस्कर बेवसवस राहून, तुम्ही बाहेर निघोन उभे राहावयास मोकले असाल, तर लिा प्रमाणे करणे. याचअन्वये उधो विरेश्वर यांसहि लिा आहे. रा छ ७ रावल बहुत काये लिहिणे.

लेखन
सीमा.

¶*Madhaorao Ballal writes to Shahaji Bhapkar not to join Raghoba Dada who is coming to Aurangabad.*

No. 8]

श्री

सहाश्रायु चिरंजीव विजईभव राजमान्य राजश्री मोरोपंत यांस प्रति पार्वतीबाई काा पाटस आसीर्वाद विनंती. उपरी: ल्याहावया कारणे जे खटवांकडून भाऊची पत्रे आली आहेती ती आपल्याकडे सिदोजी जखताप याजबराबर पाठविली आहेत, तर त्याचा मजकूर ध्यानास आणून तेथून कागदपत्र काढून सत्वर देणे म्हणजे त्याचा बच्याव होईल. तर सिदोजीस कागदपत्र काढून

---

[1] भय.

CC-0. Agamnigam Digital Preseyation Foundation, Chandigarh

याजपासी देऊन याजला पत्रदर्शनी वाटे लावावें. अम्हीच ल्याहावे असा अर्थ नाही. आपल्यास कालजी आम्हापेक्षा अधिक आहे. बहुत काये लिहिणे हे आसीर्वाद.

¶*Parvatibai sends to Morobadada the letters of Bhau (?) with Sidoji Jagtap.*

No. 9] [About August 1764

श्रीशंकर

राजश्री चिंतो विठल गोसावियासी

उपरी : राजश्री महादजी सिंदे याचे पत्र आले ते तुम्हाकडे पाठविले असे. तरी चौघेजण बसोन विचार करून उतर पाठवणे. परंतु, आमचे विचारे त्यास जाब ल्याहावा, त्यात हाच मजकूर कीं, तुम्ही तिकडे गेला आणि झासी वगैरे या प्रांताचा बंदोबस्त करणार; ऐसियासी तूर्त हैदर नाा याचे पारपत्याबद्दल खासा स्वारी कर्नाटक प्रांते जात आहे. बरोबर भोसले व गायकवाड येत आहे. नवाबाकडीलहि कांही फौज व तोफा येतील. बा(ज)द बरसात जाऊन त्याचे पारपत्य करून छावणी माळव्यात करावी ऐसे योजिले आहे. त्यास तुम्ही हजूर यावे, चाकरी करून दाखवावी. तुमचे सामान पाहून तुम्हांस सरंजाम आणिक लाऊन दिल्हा जाईल. अद्यापि कांही नासले नाहीं. ऐसे कितेक प्रकारे आशा दाखऊन व दबाऊन ल्याहावें. हेहि ल्याहावे, तुम्ही तिकडे गैरहुकमी राहिल्यास तुमची फजिती व तुम्हास चौघा सावकारानी रुो पहिले दिल्हे आहेत त्याची धरबूड इतके मात्र होईल. मग पश्चातातापी पडाल. तुमचा मनसुबा सेवटास जाणार नाहीं. यास्तव हजूरचे मर्जीप्राो वर्तणूक करणे. नाहीतरी तुमचे शासनास फौज येतच आहे. सत्वरच फळ पावाल. या गोष्टीस बहुत विलंब नाहीं. दूरवर विचार पायाशुध करीत जाणे. हलकी बुधी केल्यानें लोक तुम्हास हासतील व फळहि काही नाहीं. जलद पत्र पावतांच येणे. ऐसे दोन्ही मजकूर नरम व गरम ल्याहावे. तेथे तुम्ही चौघे शहाणे विचार करून गुणदोष पाहून उतर देणे. आमचा विचार तुम्हांस लिहिला आहे. चिरंजीव रायाचे व मातुश्री बाईचे पत्र पाठविले आहे हेहि जिकडील तिकडे पाठवावी. चिरंजीवाकडेच ऐवज बहुत आ(दा जाला) आणि स्वारीस कमी राहिला तरी कसे पुरवेल? विनासरंजाम कूच कसे होईल? येविसी नानास सावध करणे. जाणिजे छ २७ मोहरम. रुजू.

¶*Raghunathrao to Chinto Vithal, giving a draft of a letter to be despatched to Mahadaji Shinde, asking the latter to join him in his expedition into Carnatak along with the Bhonsle and the Gaikwad who were also going to join.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 10]

पौ छ ३ शाबान

श्रीशंकर

राजेश्री दादासाहेब गोसावी यासी

¶ सकळगुणअळंकर्ण अखंडितलक्षेमीअलंकृत राजमान्ये श्री शाहाजी-राव सुपेकर दंडवत विनंती उपरी: येथील कुशल जाणून स्वकीये कुशललेखन-आज्ञा करीत असिले पाहिजे. यानंतरे बहुत दिवस कृपापत्र येऊन परामरुश होत नाही; तरी सदैव सांभाळ करीत असावे. यानंतरे सामप्रत्य वर्तमान यैकिले की, आपन श्रीत्रिंबकेश्वराकडे कूच करून गेले. हे वर्तमान यैकून चितास बहुत विशम वाटले. तरी कृपाकरून सविस्तर लिहिले पाहिजे. आम्ही सर्वस्वे आपले पदरचे असो. भीमातीरी जे आपनासी व आमसी शतप्रमाण जाले होते तेच सेवक आम्ही आसो. दुसरा विचार सहसा जानत नाही. सेवकापासून सेवेत अंतराये होनार नाही. सदैव कृपापत्री संतोशवीत असावे. बहुत काये लिहिणे कृपा लोभ असो द्यावा. रा छ २० रजब हे विनंती.

¶*Shahajirao Supekar assures Raghunathrao of his full support.*

No. 11] [पौ *5-9-1762*

श्री

दुसरें पत्र

पौ भाद्रपद वद्य द्वितीया रविवार प्राथःकाल सुा सलास सितैन.

विनंती उपरी. मुरादखान श्रीमंताकडे जातो, तेव्हां कोणत्या रोखानें जातो, त्यास हस्ताक्षरगत करणार किंवा कोणत्या मुद्यावरी जातो हे न कले. त्यास आपण आपले राऊत दोनसे मुरादखानाचा पुढें जाऊन श्रीमंत राजश्री दादासाहेब

1777

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

आपल्या लष्करात घेऊन बंदोबस्त होय तो करावा. कदांचित तुम्ही फौज पुढें रा न केली आणि मुरादखानाने श्रीमंतास औरंगाबादेस नेल्या गोष्टी कार्यास न ये. यास्तव दोनशे स्वार घेऊन पाठीमागें जावे व पुढें जलदीनें आविंध पोहचला नाहीं तो जलदीनें श्वार पोहचवणे. पेशजी पत्र लिा त्यांत मजकूर होता जे, पाठीमागें जावे; परंतु विचार पाहतां पुढें दोनशें राऊत श्रीमंताकडे पाठवावे. कदाश्चित समय पडला तरी त्यास घेऊन आपल्या फौजेंत तऱ्ही आणतील. सारांष पत्र पावतांच दोनसे श्वार पुढें जलदीनें रा करून दादासाहेब त्याच्या स्वाधीन न होय ते करावें. बहुत काय लिहिणे, लोभ असो दीजे, हे विनंती.

¶*The addressee is asked to despatch immediately two hundred troopers to Raghoba in order to obstruct Muradkhan from taking the former to Aurangabad.*

No. 12] [*14-9-1762*

श्री

विनंती उपरीः खोरकरजुले (?) येथून माणसे आली. ते सांगतात की, श्रीमंत राजश्री दादासाहेब नगरास शंभर रावतानसी शनवारी दाखल जाले. मागूण फौजहि येती. व येथहि वर्तमान कीं, नवाब छ २५ सफरेस शहरी दाखल होतात. कलले पाहिजे हे विनंती.

¶*News-letter reporting the flight of Raghunathrao and the arrival of the Nizam at Aurangabad.*

No. 13] [पो *20-9-1762*

पौ छ १ रावल

सन सलास

श्री

विनंती उपरीः तुम्ही पत्र पा ते पावले लिा मजकूर विदित जाला. श्रीमंत् राजश्री दांदासाहेबाकडे न जावे म्हणून आज्ञा श्रीमंताची पुण्याहून आली ऐसे लिा, उतम आहे. आम्हाकडील नवल विशेष ल्याहावयायोग्य नाही. मुरादखानाची व श्रीमंताची भेट जाली. फौज पाच हजारपर्यंत आहे. राजश्री नारो शंकर व सखाराम बापू व विठल सिवदेव ऐसे आहेत. आपणास तो वर्तमान कललेच आसेल. आम्हीहि डाक बसविली आहे. वरचेवरी विशेषात्कार आलियावरी लेहून पाठऊ. आपल्याकडील आधिकोतर ऐकिल्यास ल्याहावे. बहुत काये लिहिणे लोभ कीजे हे विनंती.

¶*The writer and the addressee are not mentioned. The writer as ordered not to go over to the party of Raghunathrao agrees to obey the order.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 14] [Nov. 1762?

श्री

पुा श्रीमंत राजश्री रावसाहेब
स्वामींचे सेवेसी

विज्ञापना. आलाहिदा पुा पत्री आज्ञा कीं मुतसद्याच्या फुटीमुळें श्रीमंत राा दादा स्नानसंध्येचे आर्टेई[1] (?) जाले किंवा कैसे ते लिा. यैश्यास मुतसद्याच्या मते दादानीं कंबर बांधावी आणि प्रसंग तसाच आरंभला होता. रावसाहेब प्रथमता दोनसे रावतानसी येऊन भेटले. मुजरे केले. दादासाहेबांचा जोडा उचलून डोईवर घेतला, बहुतच अर्जमात जाले. तेणेकरून दादासाहेब ममतावादांत पडले, आणि रायास आज्ञा केली कीं तुमचे चितांत दुसरा अर्थ दिसत नाहीं; तरी सर्व तुमचेच आहे. मजला कांही लागत नाहीं. तुमची फौज येऊ देणे. याजवरून फौज पाच सात हजार आली. च्यार किले मात्र रावसाहेबी मागून घेतले. वरकड दादाचे मर्जीप्रमाणेच जाबसाल केले; आणि आपली काबू[2] केली. मुदे दादानी लिहून दिले त्याजवर रावसाहेबांचे करार ते कलमाची याद सेवेसी पाली आहे. सर्वार्थ ध्यानास येईल. सेवटी दादास कळले कीं जीव काढून निर्माल्यवत केले. निरोपाय जाणोन स्नानसंध्या मान्य केली. श्रुत होय हे विज्ञापना.

¶*The letter gives some of the terms of agreement between Raghunathrao and Madhavrao. The addressee appears to be Vishvasrao Laxman. The letter is significant of Madhavrao skilfully managing his uncle by submitting to him fully, after the battle of the Ghod River in which the uncle was victorious.*

No. 15] [15-7-1763?

श्री.

सेवेसी विज्ञापना छ २९ जिल्हेजची पाठविली की, श्रीमत् राजश्री दादासाहेबाचे बाजूस राहाणे. जर नदीपार असलेस तर नदी उतरणे. नदी पारून येणे. मग आम्ही उतरोन येऊ. अथवा तुम्हास जे आज्ञा कर्तव्य ते करून. त्यास आज्ञेप्रमाणे आज छ ३ मोहरमी नदी-आलीकडे राहिलो आहो. जैसी आज्ञा होईल तैसी वर्तणूक करून. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*The writer says that he has crossed the river as per instructions, probably referring to the battle of Rakshasbhuvan.*

---

१ स्वाधीन (?) २ मतलब साधला.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 16] [19-11-1763

पैवस्ती छ १३ जावल नकल
कार्तिक शुध १४ शनवार
रात्रऊ प्रथम प्रहर

श्री

राजश्रियाविराजित राजमान्ये
राजश्री गणेशपंत दाजी स्वामीचे
शेवेसी

सेवक नारो भिकाजी कृतानेक सां नमस्कार विनंती. उपरी : येथील कुशल ताा आस्विन वद्य ९ नवमीपावेतो मुकाम उदेपूर बसोदे जाणून स्वकीये कुशल-लेखन करीत असिले पाहिजे विशेष. श्रीमंत राजश्री भाऊसाहेब कन्हेरियासी दाखल जाले. प्रथम गोसावियाचे वेसेकरून नरवरास आले. समागमे अतीत-मंडली होती. नरवराच्या अतीतानी वोलखले; परंतु हे म्हणतात कीं आम्ही भाऊ नहो. हे वर्तमान राजश्री विस्वासराव लक्षुमण यासी कलले. त्याचे दिवांण राजश्री चिमणाजी वामण व विठलपंत बकसी हे भाऊसाहेबाबरोबर पाणिपती होते, त्यास वोलखावयासी पाठविले. त्यांनी वोलखोन कन्हेरियासी घेऊन गेले. छ १९ राखरी किले मजकुरी दाखल जाले हे वर्तमान तथ्य; पहिल्यासारिखे लटके नहवे. राजश्री गणेश संभाजी यास कन्हेरियांहून पत्रे आली. वर्तमान तथ्य आहे. संतोषाचे वर्तमान आपणास कलावे यास्तव लिहिले असे. राजश्री नारो रघुनाथ शाहाडऊरवाले देसी जावयासी बसोद्यापर्यंत होते, हे वर्तमान कललियांवर माघारे फिरले होते, हे वर्तमान कललियांवर माघारे फिरले. त्याणी आम्हासहि राहविले. हे वर्तमान श्रीमंत राो त्रिंबकराव नानास ल्याहावे व आमचे येजमानांस ल्याहावे. चिरंजीव राो बालोबास पत्र लिहिले आहे हे टाकलीस पावते करावे. हेच पत्र लस्करांत श्रीमंत राजश्री त्र्यंबकराव नानांस व आमचे येजमान श्रीमंत राजश्री सदासिव बापूजी यासी दाखवावे. तातडीने पत्रे पाठविली असेत याजकरिता पत्रे उभयेता येजमानास लिहिली नाहीत. चिरंजीव बालोबासहि पत्र लिहिले हे तातडीने पावते करावे, हे विनंती. कासिदास रुपया १ येक इनाम दिल्हा पाहिजे हे विनंती.

¶Naro Bhikaji to Ganeshpant Daji, informing him of the appearance of the pretender of Sadashivrao Bhau and of the attempts made by Vishvasrao Laxman and others to identify him.

1780

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 17] [26-4-1764

पौ छ ७ सवाल

श्री

सेवेसी बालाजी जनार्दन कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ताा छ २२ रमजानपावेतों येथास्थित असें विशेष. (पुरंद) रकरी यांणीं मुलकांत वगैरे बहुत उपद्रव केला आहे. त्याचे बंदोबस्ताकरितां स्वामींनीं राजश्री बापू सखाजी यास पथकसुद्धां रवाना केलें. त्यास आज्ञेप्रमाणें माारनिले पथकसुद्धां आले; आलेयास पंधरा दिवस जाहाले. प्रथम माारनिले फौजसुद्धां निरेनजीक पिंपरीस आले. तेव्हां गडकरी याचे राऊत जेजुरीस होते, ते गडाचे दक्षणेकडे पळूं लागले. इताकियांत याची व त्याची गांठ पडोन झटपट जाहाली. दाहावीस घोडीं वगैरें गडकरी याची सांडविलीं. त्याजवर गडकरी याचे राउतांवर बापू सखाजी याचे फौजेचा शह बसोन गडा(वरचे) राऊत पळोन घरोघर गेले. त्याजवर * * चिरंजीव राजारामपंत राऊत व लोक पाईचे (मिलो)न माचीस हल्ला करावयास गेले. माचीखाली गेल्यावर गडकरी यांणीं दगडाची वगैरे मारागिरी केली. ते समयीं दाहा वीस माणूस * * * * * * कडील ठार पडले व पन * * * * * हाळे त्या लढाईमध्यें * * * * * पायास गोळी लागली. जखम हलकी * * * * च बरी होईल. बापू सखाजी याची फार करून (फौज) गडाचे दक्षणेकडे आहे व कांहीं सासवडास आहे, व राजारामपंत लोकसुधां सासवडाजवळ आहेत. श्रीमंत+ मातुश्रीबाई साहेबा(चे पत्र) आलें कीं श्रीमंत राजश्री नारायणराव (यास गंगा-)पुरास पाठवणें, त्यावरून मुहूर्त पाहून रवानगी करितो. शेवेसी श्रुत होय हें विज्ञापना.

¶*Nana Fadnis describes a skirmish between Bapu Sakhaji and the Gadkaris belonging probably to the fort Purandar.*

No. 18] [29-7-1764

पौ[१] छ २१ मोहरम

समस मुाा नाशिक

श्रीशंकर

राजश्री बालाजी जनार्दन

विनंती उपरी. आम्हास महिना पंधरा दिवस श्री स राहाणे. यास्तव चिंतो विठल व तुम्ही मिलोन तमाम सांगितल्याअन्वये कारभार करणें. रसदा घ्या-

---

+ येथून अक्षर खाशाचें. १ सबंध पत्र राघोबाच्या हातचें आहे. पैवस्ती नाना फडणविसाच्या हातची.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

वयाचे काम तुम्हाकडेच मुकरर केले आहे ; परंतु चिंतो विठलासहि इतला[१] देत जावा. व त्याचे तुमचे विचारे येक जागा होऊन तडका कारभार करावा. चिंतो विठल आमचे पूर्ण यख्तियारी आहेत. ते सांगतील ते आमचीच आज्ञा समजणें. आमचे मर्जीस ते पूर्ण वाकिफ आहेत. तुम्हासहि थोड्यातच पुढील कर्तव्य खर्चाचा प्रकार सागितला आहे. तुम्हासहि आमचे मर्जीची आर्धी वाकीफगारी आहेच. सारांश ते व तुम्ही मिलोन कारभार अटको न देणे. चिरंजिवाचे नावचे शिकेहि चिंतो विठल याजकडे पाठविले आहेत. सनदा व ताकिदपत्रे याजवर करावयास कामास येतील. मुतालकीचे सिके आहेत. स्वारांस लिहिल्याअन्वये आमचे मर्जीप्रा॥ कारभार केल्यास उतम आहे. रसदाचा ऐवज सालमजकुरी कमी न होये; किंबहुना गुदस्तापेक्षा कोठे कोठे जाजती घ्यावयाचा आहे. ओढीचा प्रसंग सर्व तुम्ही जाणता. तुम्हास तपसील बहुत कशास ल्याहावा ? आमचेपेक्षा दौलतेची काळजी तुम्हास अधिक आहे. सारांश आमचे राहाणे श्रीसंनिध होये, व कारभार तरी चाले ऐसे तुम्ही उभयता येक विचारे होऊन कामे विल्हे लावणे. दोघाचे विचारे दुसरा कमाविसदार करणे, तरी तो हजूर मंजूरच पडेल. मखलासी करून देण्यासहि संदा मेण-कापडीत पाठवीत जाणे. हेच पत्र चिंतो विठलास दाखविले तरी ते व तुम्ही मिलोन कराल, हा भरवंसा आहे. दोघे साधे व सालस आहा. हे विनंती.

¶*Raghunathrao informs Nana Fadnis that he will be staying for a fortnight or so at Trimbak and asks him to conduct the administration conjointly with Chinto Vithal during his absence. He further asks him to allow no reduction in the revenue.*

No. 19] [*12-8-1764*

श्री

कची हकीकत. तोतया इा भाद्रपद शुध १३ त्रयोदशी ताा श्रावण वद्य १ मुकाम लस्कर भूमगड नजीक टोंक परगणें जयनगर. हाजिर मजालस राजश्री मल्हारजी होळकर सुभेदार व समस्त सरदार वगैरे लोक. जुवानी पाराशर ब्राम्हण दौलतगिरीचा नरवरास असतो. त्या समयांत हा ब्राम्हण होता. त्याची जबानी बितपशील बोलिला कीं, पहिल्यानें आले तेव्हां अतीत कोपिन मात्र होता. निस्प्रहताप्रमाणे होता. बागांत जाऊन बसोन राहिला. तों इतकियांत येक कायत नामें करून—त्याचें नांव ठावकें नाहीं—त्याचे घरीं तीन रोज होता. तेथें

---

१ जिम्मा जबाबदारी.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

आपल्याच हातें सिंगाड्याचे पिठाचे रोट्या पावशेर वजन कचे, येक पैसा भार तूप, सेंधेलोणासी खात असत. तिसरे रोजीं येकदा खावें. त्यावर बोभाट जाला कीं, येक अतीत आसे. बहुत शरीरेंकरून सुंदर व तपतेजेंकरून उजल म्हणून लोक बोलों लागले. त्याजवरून संभुपुरीं गोसावी म्हणून महंत नरवरच्या गंज सराईत मठ आहे त्याणें हें वर्तमान थैकोन आपण खासा पाहावयास दरशनास आला. त्याचेहि मन बसोन लीन जाला कीं, तपस्वी सुंदर आहे. त्यास पुसोन आग्रहेंकरून आपल्या हवेलींत मठांत आणिलें. तेथें येक महिनाभर आपल्या स्वछेंदेंकरून असावें. ती रोजानीं येकदां सिंगाडेयांचे पीठ पावसेर, कचे पैसा भार तूप, सैंधवासीं खावें, याप्रमाणें असतां मग जगदीशगीर तेथेंच होता. त्याणें आग्रहेंकरून आपले हवेलींत नेलें. तों मागाहून जोरावरपुरी गावास कोठें गेला होता तो आपल्या मठास आला. गुरूनें सर्व हकीकत सांगितल्यावर जोरावरपुरी उठोन, जगतीसगिरीच्या मठास येऊन, या अतीताचें दरशन घेऊन, येक प्रहर पावेतों बसोन वोलखिलें. आणि जोरावरपुरी बोलिला कीं, तुम्हीं अतित कां जाला ? आपल्या राज्यावर जावें. फकिरी न करावी. तुम्हांस आम्ही वोलखिलें. तुम्ही भाऊसाहेब असोन आपल्यास कां लपवितां ? प्रसिध व्हावें. मग अतित बोलिला कीं, मी भाऊ नव्हे. भाऊ असेल तो आपला शोधून घेणें, रागेंकरून उठोन चालिला. मग बहुत आदरेंकरून, मिनतीनें करून, आपल्या हवेलीस जोरावरपुरीनें नेले. तेथें राहिला. तिसरे रोजीं येक वेल भक्षावें याप्रमाणें तपश्चर्या करून होता. मग राजश्री गोविंद सामराज ग्वालेरकर यांस कळलें. त्याणी येक ग्रहस्त पाहावयासी पाठविला. त्याणें निश्चय करून ग्वालेरीस गेला. उपरांत नरवरी बाबूराव सखाजी याणे नरवरीं राहिला होता. त्याणें आपले घरीं घेऊन, फराल घातला. आणि निश्चय करून, कागद कऱ्हेरीयास पाठविला. त्याणी यादो तुकदेव विस्वासराव लक्षुमण याचा खासगी दिवाण तो नरवरास आला. त्याणें वोलखिलें. मग पत्र कऱ्हेरीयास विस्वासराव लक्षुमण याण लिहून पाठविलें. तेथून राजश्री चिमणाजी वामन आले. तेहि येऊन भेटले. त्याणी वोलखिलें. मग पालखीत बसऊन कऱ्हेरीयास घेऊन गेले. तेथें भेट जाल्या. घोडे नजर करून सरबती केली. विस्वासराव याणे वोलखिलें. खूण पुरलियावर दोन तीन रोजानी पुसों लागलें. त्यावर पोथी तुजला दिल्ही होती ते व घोडीची खूण पुसोन घेतली. तेव्हां निशा विस्वासरायाची जाली व चिमणाजीपंताची जाली. तेव्हां नजर

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

नजराना मागती जाला. सरबती जाली. मग राजश्री गोविंद सामराज यास लिहून पाठविलें. मग तेहि खासा येऊन दाखल जाले. भेटी जाल्यावर हती नजर केला व घोडे दोन नजर केले. दोन च्यार रोजानी येके दिवसीं अवघेच स्वारीस निघाले. स्वारी करून आले. मग येका रोजांत तोफखाना सोडिला. खुशाली बहुतसी केली व साखरहि वांटिली. बहुत संतोषेंकरून आनंदे मेजमान्या परस्परें करूं लागले. गोसावी वरचेवर म्हणत गेला कीं, मी भाऊ नव्हें. मजला कां जबरदस्ती करितां ? मी नागा अतित. कोपीन दुसरी घेत नाहीं. मजवर कां जुल्म करितां ? हे कोणी न आइकत. जबरदस्तीनें हतीवर बसवावें व पालखीत बहुत मिनतीनें बसविलें. तेव्हांहि गोसावी यानें जाब दिल्हा कीं, भाऊ नव्हें. तरी न मानीत. बलेंच भाऊ म्हणून कराल तर भाऊ होणार नाहीं. भाऊ आपला कोठें असेल तो शोधून घ्यावा. माझ्या वाटेस न जावें. मजला सोडून देणें. माझ्या योगास आडथाला न करावा. मी नागा अतित आहें. यैसें बोलत असतां अतीआग्रहेंकरून फिरवितों यैसे करून नाना-प्रकारें करून आर्जव करूं लागले. उपरांत जेवणेंखाणें येकमेकांनी जेऊन पंगतीस जेवणें जाली. परंतु आपल्याजवल केवल मिसलामिसल न होतां अलाहिदा. आपण गोसावी असोन यांस न सिवावें. परंतु याणी धोत्र चुणून द्यावी, नेसवावीं यैसें केलें. पाय तलाथावे, पिकदाणी धरावी, चवरी उडऊं लागले. नारोपंत शाहाडोरावाले याणी ताटवाट्या नजर केल्या. सुखभोजनें केलीं. सोमवाराचें वृत्त सोडिलें. मग आठच्यार रोज जाले. मग फितूर जाला कीं कसें जालें तें नकळे परंतु बदमामलीचा मजकूर जाला. फौजा ठेविल्या. स्वारी सिकारी करूं लागले. घेऊन गोसावी यास हत्तीवर बसऊन कामे काजें करूं लागले. सिके केले. निशाणहि नको म्हणत असता निशाण केलें ! परंतु पटका जरी न लावणें तेही न मानिलें, जरीपटका निशाणास विस्वासराव लक्षुमणानें लाविला. जबरदस्तीनें भाऊ म्हणून ठराऊन बक्षिगिरी घेतली. दिवाणगिरी घेतली. चिटनिसी व फडनिसी वांटून घेतली.

गोसावी यासी जाला. तेथून कूच करून जयनगरावर आले. तेथून कूच करून बनास नदीवर आले. तेथें नदी घाट उतरून लस्करांत गोसावी दाखल जाला. हती घोडे व नगारा व निशाण हरकुली पागेस लाविलें. बंड मोडलें (?) इतकी हकीकत जाली. कलावें जाणिजे छ १४ सफर सुहुरसन खमस सितेन मया व अलफ.

¶*An account of the appearance of the pretender and his final defeat, narrated by Parashar in confession to Malharrao Holkar and others.*

1784

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

[3-9-1764

No. 20]

पौ छ ६ रावल खमस भाद्रपद मुा[1]
नाशिक बाा आपाजी

श्री

पुा[1] राजश्री नाना स्वामीचे सेवेसी

साा नमस्कार विनंती. उपरी, दोन बंद पत्र पाठविले ते पावले. बहुत संतोष जाला. पुरंधरचा मजकूर लिहिला, तरी तों यथार्थच आहे. तर्तूद राजकारण थोडें बहुत होतच आहे. दुसरा विचार करणें तों श्रीमंत् उभयता येक होतील तेव्हां बलकट बोलोन उपरांतिक जे करणें ते करावे. तूर्त राजकारणें व बंदोबस्त जो होईल तो करावा. वरकड सविस्तर राा हरिपंत लिहितील त्यावरून विदित होईल. बहुत काये लिहिणें, लोभ आसों दीजे, हे विनंती.

¶*This letter, written by Sakharam Bapu to Nana Fadnis, refers to a quarrel between the Peshwa and Raghunathrao and the rising of the Kolis at the fort of Purandhar.*

[17-9-1764

No. 21]

पौ छ २३ रोवल

श्री

श्रीमंत राजश्री दादासाहेब
साहेबाचे सेवेसी

विनंती शेवक गणेश विठल[2] कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना विनंती. तागायेत छ २० रोवल मुा किले नगर साहेबांचे कृपाकटाक्षेकरून सेवकाचें व किले मजकुरचें वर्तमान यथास्थित असे विशेष. साहेबी छ ११ रोवलचे आज्ञापत्र सादर केलें. तेथें आज्ञा कीं, किले पुरंधर हा कोल्याने घेतला. त्यास कोल्यास तंबी पोहोंचाऊन किला सरकारांत घ्यावा लागतों; याजकरिता तेथील मोर्चेबंदी करावयास लोकांचें प्रयोजन आहे; तरी किले अमदानगर येथील माणूस आा ५० पनास किले मजकुरी पाठवून देणें. किल्याचे मोहसऱ्याचे काम राा

---

१. सबंध पत्र सखाराम बापूंच्या हातचें असून पैवस्ती नाना फडणविसांच्या हातची आहे.

२. आडनांव वाघमारे, राघोबाच्या पक्षांतील.

1785

CC-0. Agamnigam Digital Preseyation Foundation, Chandigarh

सर्वोत्तम शंकर यास सांगितले असे. त्यास पेशजी राजश्री शंकराजी केशव याणी तुम्हास पत्र पाठविलें आहे, त्याप्रा॥ लोक सत्वर माारनिलेकडेस पाठवणें म्हणोन आज्ञा. आज्ञेप्रमाणें लोक पाठवावे त्यास कसबे कडें येथे ठाणे निबगाव निा भोसले याणी कडयास उपद्रव फार दिल्हा आहे. दोन लडाया जाहाल्या; सबब साहेबाचे पत्र आले कीं, निंबगावकरांचे पारपत्य करून बंदोबस्त करणें. त्यावरून तिकडेस कारकून रवाना केले आहेत. हाली लोक सेपनास पाठवावे लागतात. येका दों दिवसी लोक रवाना करून बंदोबस्त करितो. लोक न पाठविले तरी कडे राहात नाही, यास्तव पाठवितों. तिकडून आल्यानंतर पुरंधरासहि रवानगी करितों; परंतु पेसजी साहेबाची आज्ञा आहे कीं, सेपनास माणूस किल्यास नवे पाठविले अगर किल्यातून बाहीर कामगिरीस नेमिले, तरी आपले खुणेचे पत्र येईल तेव्हा नवे घ्यावे अगर बाहीर काढावें, यैसी आज्ञा आहे. हाली लोकाविषी पत्र आलें, परंतु खुणेचे संज्ञेचे पत्र आले नाहीं. लोक कोणत्या आसऱ्याने बाहीर काढावे ? पहिल्ये सुचनेप्रमाणें पत्र आल्यास आज्ञेप्रमाणें लोकाची रवानगी करू. चौकी पाहारे याचे बंदोबस्त राहिला पाहिजे; परंतु निकडच लोकाची असल्यास खुणेचे पत्र येईल तेव्हा लोक किल्यातून बाहीर काढून रवानगी करू. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶Ganesh Vithal to Raghunathrao from Nagar fort, informing him that he has to send some men to the relief of Kada which has been attacked by the men of Bhonsle and therefore he could not spare any men to be sent to Purandhar to take it back from the Kolis.

No. 22] *[5-11-1764*

पौ छ १० जावल

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री
माधवराव स्वामी गोसावी यांसी

स्नेहाभिलासी भिकाजी विठल आशीर्वाद विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीयें कुशल लेखन करीत असिलें पाहिजे विशेष. आपण पत्र पाा तें पावलें, लिहिला मजकूर कळों आला. श्रीमंत भाऊसाहेब जयनगरास आले. लोक वळखितात. तुम्ही समीप आहां, तहकीक वर्तमान तुमचें येथें असेल तें ल्याहावें म्हणोन लिहिलें. ऐसियास आम्ही येथून गृहस्थ तेथें पाठविलें होते त्याणीं पाहिले.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

त्यांस शरीर आकृत तेच ऐशी दिसतें; परंतु वेष गोसावियाचा व बोली ग्वाल्हेरी. आपले हातें लिहीत नाहीं. त्याजवरून संशय निवृत्त होत नाहीं. वरकड लोक जातात, पाहतात, वळखितात हें खरेंच. पारोळियास कागदपत्र गेला नाहीं. या प्रकारचें वर्तमान आहे. दुसरें आम्हांकडील वर्तमान तर कुकडमुढेंकरांनीं व भिलांनीं उपद्रव मांडिला आहे, त्याचा बंदोबस्त केला आहे. आपल्यांकडील सविस्तर वृत्त लिहून तोषवीत असावें. कितेक गृहस्थ कुकडमुढेकर वगैरे यांजला ऐसेंच पाहिजे. कुकडमुढेकरांचा कांहीं विषम भाव जाहल्यास बरकंदाजा-विशी लिहूं तेव्हां असल्यास पाठवावें. बहुत काय लिहिणें हे विनंती.

¶*Bhikaji Vithal reports details of the pretender and his ways to Madhavrao.*

No. 23] [पौ *6-11-1764*

पौ छ ११ जावल

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री
माधवराऊजी
स्वामी गोसावी यास

पौ चादो मोरेश्वर आशीर्वाद उपर. येथील कुशल जाणून स्वकीय लिहीत असिलें पाहिजे विशेष. कृपा करून पत्र पाा तें पावलें. पत्रीं मजकूर कीं, श्रीमंत राजश्री भाऊसाहेब जयेनगरीं प्रगट जाहाले आहेत. त्यास सविस्तर लिा म्हणोन. ऐसियासी श्रीमंताचा उदयाचा प्रकार दिसत आहे. भेश गोसाव्याचा आद्यापवर आहे. जयेनगरींच आहेत. कांहीं राऊत प्यादे जमा होतात. खासे करार सित्य मिथ्य निवडोन निक्षून आल्यास प्रमाण. सर्व मुखवचन आपला पेंदा सांगतां विदित होईल. श्रीमंत राजश्री दादासाहेबाचा मुकाम कोणे स्थलींत आहेत तें लिहिलें पाहिजे. सदैव पत्रद्वारें सांभालीत असिलें पाहिजे. श्नेहास आंतराय न कीजे. बहुत काय लिहिणें? लोभ कीजे हे विनंती. सत्य मिथ्य कांहीं निवडून आलें नाहीं. कऱ्हेरास होते ते खरे. यैसे वर्तमान आहे. राजश्री जिवबास आसीर्वाद. लिा परिसोन लोभ कीजे हे विनंती. पाो जयेराम मोरेश्वर आसीर्वाद उपर. तीर्थरूपानीं लिा आहे त्याजवरून श्रुत होईल. लोभ कीजे हे विनंती.

¶ *A description of the pretender communicated in a news-letter by Chando Moreshwar to one Madhavrao.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 24] [29-12-1764

पौ छ १२ रजब सन
खमस पौष

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक विसाजी केशव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील वर्तमान ताा छ ९ रजब पावेतों येथास्थित असे. यानंतर साहेबी आज्ञापत्र पाठविलें तेथें आज्ञा कीं, किले पुरंधर येथून राऊत व माणसें जाऊन मौजे उरली वगैरे गांव येथें पैकियाचा तगादा करून रयेतेस उपसर्ग देतां. येविसीं पेशजी दोन तीन आज्ञापत्रें सादर जाली असतां पत्राप्रों वर्तणूक करीत नाहीं. हे परिछिन कार्याचें नाहीं. याउपरी रयतेस व कोण्हा गावांस उपसर्ग न देणें म्हणून आज्ञा. त्यास किला धण्याचा, मुल्लकहि साहेबांचा. किल्यास यैवज हुजूर पोत्यातून द्यावा. पोत्यास परवानगी नसल्यास परभारा वराता देऊन बेगमी करावी. दोन्ही प्रकार नसतां तिसरा प्रकार नाहीं. त्यामध्यें समर्थासी शत्रुत्व रोज उठोन लडाई भिडाई होती. अर्ध कोस कोसपरियेत पायेदल उतरून जुज होते. गडच्या पाईज्यास राऊत येऊन पोहचों लागले. खावंदाची कुमकहि त्यांस सामील होऊन आम्हासींच जुझावें. तेव्हां आम्हांस भासलें कीं, थोराची पाठराखी थोरच करितात. आम्हासच आश्रये नाहीं. राजश्री राजारामपंत[1] कमरबंदी करून आमच्याच पारपत्यास येणार. तेव्हां आमचे पदरीं पुंडपण सहजच प्राप्त जालें. उपाये नाहीं म्हणून चौदासे येकांडे राऊत ठेविले. सासवडचें पारपत्य करणेंच प्राप्त जालें. राऊतांस पोटास पाहिजे. खावंदाच्या मुलकांतून पैका घेऊन देतों. किले जतन करितों. येक वर्षाची बेगमी किल्याची करूंन मग खावंदाकडे जाणें. साहेबीं मेहरबानी करूंन उर्जित करावें अगर पारपत्य करावें. उभयेता गोष्टीनी लौकिकच आहे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶Visaji Keshao in reply to the Peshwa's order not to molest the ryots of Purandhar, says that he is required to meet the attack laid by Rajaram Govind and therefore has to maintain a squadron of 1,400 for the expenses of whom he has to collect money from the adjoining provinces as those expenses are not paid from State treasury.

---

१ नगरचा रहिवासी, राघोबाच्या पक्षाचा.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री
अंबादास बलाल स्वामीचे सेवेसी

सेवक नारो कृष्ण सां। नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये लिा विशेष. आम्ही लस्करांत दाखल जाल्यावर पैठणाच्या मुकामीहून पत्रें लिहोन कासीद जोडी ताबडतोब रवाना केली आहे. ते पावोन सविस्तर अर्थ कलेल. सांप्रत तिकडील सरंजामियाचे कमाविसदारास वगैरे सरकारचीं पत्रें घेतलीं. फौजेची नेमणूक जाली. राजश्री मानाजी निकम यासी पुढें रवाना केले आहे. ते मजल दरमजल तुम्हांजवल लवकरच येऊन पावतील. दुसरी पथकें मागोन रवाना करितों. व आम्ही स्वार होऊन फौजसुधां लवकरच येऊन पोहोंचतों. त्यास हें वर्तमान तुम्हांस कलावें व तमाम तिकडील कमाविसदारास व सरंजामियास कलावें. त्याणें आपले आपले सरंजामानसी तुम्हांजवळ येऊन दाखल व्हावें. याजकरितां तुमचे आसपासच्या कमाविसदारास तूर्त पत्रें सरकारचीं पाठविलीं आहेत. येणेप्रमाणें

१ हरि दामोदर
१ माधवराव बांडे
५ कमाविसदारास
  १ सुलतानपूर नि॥ होलकर
  १ नंदुरबार नि॥ होलकर
  $\frac{१}{२}$ थालनेर नि॥ होलकर
  १ डागरी नि॥ मीरखान
  १ गालणा नि॥ होलकर
  ———
  ५
———
७

येकूण सात पत्रें पाठविली आहेत. येथें जे सरंजामी सरदार आहेत त्याचीं पत्रें ठेविलीं असत. त्याजकडील कमाविसदारास त्याचीं पत्रें घेऊन व फौजेची नेमणूक ठराऊन तुम्हांकडे लवकरच पाठवितों. तूर्त पाठविलीं आहेत. हे ज्याची त्यास दाखऊन त्याजसी बोलावें कीं, श्रीमंताची आज्ञा या प्रकारें आहे. तुम्हीं सरंजामानसीं येऊन सामील व्हावें. त्यास राजश्री हरि दामोदर सरकारआज्ञेप्रमाणें

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

येतील. त्या प्रमाणें कमाविसदारहि येतील. ये गोष्टीचे त्यास जरूरच आहे. कदाचित कोण्ही अनमान करील तर त्यास सांगावें कीं, धण्याची मर्जी हा तोतिया मोडून टाकावा. अनमान केल्यास डौंश धरितील. येविसीं श्रीमंताची मर्जी सांप्रतच्या पत्रावरून व फौज्याच्या रवानगीवरून सर्वांस कळली. या कार्यास कोणाच्यानी दिकत करवणार नाहीं. प्रस्तुत लिहिलेप्रमाणें कमाविसदाराचा वगैरे सरदार सरंजामी बांडे देखील पत्राप्रमाणें सरंजाम बलाऊन बेजरब बरावर करून घ्यावे. तुम्हांजवळ सरंजाम असेल तो दरोबस्त येकत्रटोन व यासिवाय अलुफा[१] खर्च दरसाले भरण्यास काहीं जथतील त्यास हजार पांचसें पर्यंत खर्च लागले तर करून ऐसा जमाव धरून तुम्ही तोंडावर जाऊन शह देऊन आधिक जमोन पावत तुमच्या अवसानांत गोष्ट युक्तीस आल्यावर सिकस्तहि कराल. आम्हांकडून फौज रात्रीचा दिवस करून तुम्हांकडे येऊन दाखल होईल. मानाजी निकम याची तर रवानगी केली. ते लवकर येतात (अपूर्ण)

¶*Ambadas Ballal is informed by Naro Krishna that forces have been despatched against the pretender and is advised to do his best in this connection : otherwise the master would be highly offended with him.*

No. 26] [पो *5-1-1765*

पो छ १२ रजब सन
खमस पौष

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
साहेबांचे सेवेसी

आज्ञाधारक कोंडाजी नाईक चिव्हे व समस्त सरदार किले पुरंधर कृतानेक विज्ञापना विनंती. साहेबी आज्ञापत्र पाठविलें तेथें आज्ञा कीं, मौजे उरली वगैरे गाव येथे राऊत पाठऊन उपसर्ग देतां. रयत तजावजा[२] जाली आहे. तुम्हास दोनतीन आज्ञापत्रें सादर जाली असतां पत्राप्रो वर्तणूक करीत नाहीं तरी याउपरी काडीमात्र उपसर्ग न देणे म्हणून आज्ञा. त्यास किला धण्याचा बिनपोटावीण जतन कसा होतो? सासवड शत्रू सनिध, पोटास देणे नाही. परामृष करणें दूर राहिलें. आम्हीं आपल्या जिवावर जागा जतन करितों. रोज उठोन लडाई करावी लागती. आश्रये कोणाचा नाहीं. राऊतानी आम्हांस

---

१ उलफा=कोरडा शिधा. २ घाबरी.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

हैराण केले. निरोपाये जाणून फौज ठेविली. नालबंदी दिल्ही. साहेबांचा मुल्क खाऊन पोट भरून सासवडास तंब्री पोहचाऊन किल्याचा सरंजाम येक सालाची बेगमी करावी, खावंदरयतेस उपसर्ग न द्यावा, पैका न घ्यावा हे चितांत असलें तर किल्याची आस्था नाहीं असें सेवकांस भासतें. साहेबी तसीच आज्ञा करावी. मग मुलकास काडीमात्र उपसर्ग न देऊं. सासवडचें पारपत्य करून मग चितास येईल तें करूं. सेवेसी विदित होये हे विज्ञापना.

¶Kondaji Chive and officers of Purandar inform the Peshwa why they have been obliged to raid the neighbouring territory for funds, as they get no pay from Government.

No. 27] *[12-2-1765*

पौ छ २० रमजान सन
खमस

श्री

श्रीमत् राजश्री नाना स्वामींचे
शेवेसी

सो आपाजी गणेश कृतानेक सां नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता। माघ वद्य सप्तमी मुकाम नजीक कुकडमुढे स्वामीचे कृपेकरून सुखरूप जाणून स्वकीय कुशल लिहीत आसावे विशेष. बहुत दिवस जाले स्वामी-कडील पत्र येऊन परामृष होत नाही, तरी निरंतर पत्री साभाळ केला पाहिजे. यानंतर आम्ही आपले स्वकीय वर्तमान रा। माहादाजी गणेश याजसमागमे पत्री लिहिले व मशारनिलेनी मुखवचने सागितलेच असेल. त्याजवरून विदित जालेच असेल. इकडील वर्तमान श्रीमत् भाऊचे नामे करून तोतया पुरुष निर्माण जाला. त्याच्या बदोबस्तास श्रीमंताचे आज्ञेने राजश्री नारो कृष्ण व रा। हरि दामोदर आले. तोतया पुरुषामुलें नंदुरबार सुलतानपूर परगाणियात बहुत बखेडा जाला. आम्हासहि उभयेतानी पत्रे पाठविलीं की, तुम्ही भेटीस येणे. आगोधर माझे शरीर सावकाश नव्हतें, सावकाश जालियानंतर उभयेताचे भेटीस लोणखेड्याचे मुकामी आलो. त्याजवर तोतया पुरुष गोसावीसुधा सुलतानपूर टाकून पळाला. तों कुकंडमुढ्यास संकराजीपंत रा। बचाजीपंता-कडील आगोधर त्यास भेटले, त्याजसमागमे तेथे गेला. संकराजीपंताचेहि ध्यानास आलें की, भाऊनामेकरून खोटा आहे. परंतु गोसावी तीन च्यार सहश्र समागमें वरकड कितेक ब्राह्मण समागमे भाऊ म्हणतात, याजला येकीकडे काढावे याच मजकुराची आम्ही मसलत मशारनिलेस देऊन गोसावी यास साडे

1791

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

पंचवीस हजार रुा द्यावे, यैसे करार सर्वानुमते करून त्याची निशा पत्री पाडून गोसावी फोडिलें, आणि भाऊ नामे पुरुष कैद केला. इतका प्रकार जाल्याने इकडील प्रांतांचे शैल्य तुटले. याजउपरी तोतया पुरुषाचे कर्मानुसार आळंकार देऊन माफजतीने[१] तिकडे रवानगी होईल. येथील येथे सिक्षा करावी तर कितेकानी भाऊ म्हटले होते, याजकरिता श्रीमत् मातुश्री गोपिकाबाई व पार्वतीबाई पाहातील त्यानंतर त्याज योग्य सिक्षा आथवा मुक्तता करतील. याजप्रो तोतया पुरुषाचे वर्तमान जाले ते सेवेसी लिहिले आहे. स्वामीचे दर्शनास यावे येसा हेत बहुत आहे. कछ भूज प्रांतीं सिंदी पठाण ऐसी हजार आले आहेत. भुजेस मोर्चे लाविले आहेत, यैसे वर्तमान आले. सिंदियानी भुज घेतल्याने गुजराथ प्रांतीहि गडब(ड)च होईल. स्वामीस वर्तमान विदित व्हावे याजकरिता लिहिले आहे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञप्ति.

¶*Appaji Ganesh (Bhagwat) informs Nana Fadnis how the pretender of Bhausaheb was captured at Kukarmanda in Khandesh and how he was being sent on to Poona for being punished.*

No. 28] [12-5-1765

पौ छ ८ जिल्हेज

जेष्ट सन खमस सितैन.

श्री

श्रीमंत राजश्री दादासाहेब

स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक रघुनाथ हरि सां नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ताा छ २१ जिलकादपर्यंत स्वामीच्या कृपावलोकनेंकरून सेवकाचें वर्तमान यथास्थित असे विशेष. जयनगर पो सुलतानपूर येथें तोतिया उत्पन्न जाहाला त्याचें पारपत्यास सरकारांतून राजश्री नारो कृष्ण व मानाजी निकम पाठविले आहेत तरी तुम्हीं जमावसुधा जाऊन नारो कृष्ण, मानाजी निकम येकत्र होऊन तोतियाचें पारपत्य करून धरून हुजूर पाठवणें म्हणोन तीर्थरूप हरि दामोदर यासीं आज्ञापत्र सादर जाहालें त्यावरून फौज ठेऊन जाऊन आज्ञेप्रो तोतिया पारपत्यपुरस्कर धरून राजश्री नारो कृष्ण यांचे स्वाधीन केला. तोतियाचे मसलतीत जुजा भांडणांत स्वता मेहेनत बहुत करावी लागली यामुळें शरीरास

---

१ काळजीनें, बंदोबस्तानें.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

ज्वराची व्यथा पौष मासीं उत्पन्न जाहाली; तथापि सरकारकार्य होय तों पावेतो च्यार मांस तैसेच तिकडे राहिले. कार्य समाप्ति जाहल्यानंतर शरीर आरोग्यार्थ दैवी औषधी उपाये करावे याअर्थें चैत्र मासीं घरीं पाऱ्होलियासी आले. औषधादिक उपाय करणें ते केले, परंतु व्यथेस अंतराये नाहीं याजकरितां अग्निहोत्र समाप्त करून तापीतीरीं येऊन वैशाखी पौर्णिमेस संन्यस्त जाहाले. पुढें निर्याण समय जाणोन अनशनव्रत संपादून वैशाख वद्य पंचमीसें समाधिस्त जाहाले. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Raghunath Hari Newalkar, the ancestor of the Rani of Zanshi, reports the death of his father Hari Damodar on 9th May 1765 at Parola (in Khandesh) owing to the exertions he was compelled to undergo in the capture of the pretender of Sadashivrao Bhau.*

No. 29] *[6-6-1765*

पौ छ १६ जिल्हेज सीत जेष्ट

श्री

विज्ञापना. स्वामींनी चिटी पाटविली ती पावली. भेटीचा मजकूर लिहिला अ तो कलला. त्यावरून आपले लिहिण्याचे अन्वयें श्रीमंत रावसाहेबांस विनंती ˉकेली. आज्ञा केली कीं, श्रीमंत दादासाहेबास पुसावें. त्यावरून तिकडे गेलों. विनंती केली. साडे तेवीस घटका कल्याणी, ती सरल्यावर भेट जाल्यास कसें, त्यावरून आज्ञा केली कीं उत्तम. येथून निघावयास दोन प्रहर होतील. मग कवडीस जाऊं. पागा पाहूं. साडे तेवीस घटकाचे सुमारें हडपसराजवल येऊं. तेथे तिकडून श्रीमंत रायानी यावें, भेट होईल. तो निरोप श्रीमंत रावसाहेबां जवल सांगितला. तिकडील इकडील एकवाक्यता जाली की, साडेतेवीस घटका नंतर भेटीचा योग घडावा. त्यावरून सरकारचे पत्राचा जाब लिहून पाठविला आहे. आपलीहि मर्जी असीच होती. ठीक आले. रात्रींत स्वारीची तयारी करून वीस घटका दिवसास हडपसरचे पुढें येऊन उभें राहावें. इकडून उभयतां श्रीमंताची स्वारी येईल. हडपसरापुढें आलियावर पुढें सांडणीस्वार पाठवावा. मुहूर्तास दोन घटका अवकाश असल्यास इकडे विनंती करून स्वारी उभी करूं. स्वारीची तयारी करून लिहिल्याप्रो भेटीचा योग घडे तें करावें. पर्वा भेटीचें ठीक बननार नाहीं, मजा नाहीं, म्हणोन स्वामींनी लिा तें प्रमाण. आपली मर्जी होती त्याप्रमाणेच योग जाला. कलावें हे विज्ञापना. बातनी आज्ञेप्रो सेवेसी लिहून पाठऊ हे विज्ञापना.

¶*The writer, who from the handwriting appears to be Haripant Phadke, informs Nana of the details of place, time and manner in which Raghoba and Madhaorao should meet near Hadapsar.*

---

(1) 9-5-1765.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

[6-6-1765

No. 30]

पौ १६ जिल्हेज सीत

श्री

विज्ञापना. स्वामींनी राऊतांबराबर चिठी पाठविली ती प्रहरादिवसा येथें पावली. भेटीचा मजकुराविसीं शब्द लाऊन लिहिलें. त्यास मी रात्रीस सांडणीस्वार पा। त्याणें मध्यरात्रीस स्वामीजवल पोहचावें ती गोष्ट त्याणें न केली. उज्याडल्यावर गेला, यामुलें उसीर लागला. त्याणें लबाडी केली. आज गुरुवारी तेवीस घटका कल्याणी आहे. ती टलून श्रीमंत राजश्री नारायणराव याणी भेटीस यावें, याप्रमाणें काल उभयतां श्रीमंतानी आज्ञा केली त्यावरून स्वामीस लिहून पा. परंतु पत्र उसरां पावलें असेल. जासुदजोडी येक आली होती त्याजवल कागद लिहून स्वामीकडे पाठविला, त्यास येक घटका जाली. मागाहून राऊत आले त्यास आपण स्वारीची तयारी करून वीस घटका दिवसास हडपसरचे सुमारें यावें म्हणजे भेटीचा योग ठीक घडेल. श्रीमंत येथून सोला घटका दिवसास निघतील. कवडीची पागा पाहून, पुढें हडपसरचे सुमारें येतील. तो भेटीचा योग ठीकच घडेल. कलावें. सांडणीस्वारानें जाण्याविसीं लबाडी केली यामुळें आपणास कलावयास उसीर लागला, आसो. आतां लवकर तयारी करून आलें पाहिजे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Haripant Phadke to Nana, communicating arrangements of the visit of Raghoba and Madhaorao.*

[8-6-1765

No. 31]

पौ छ १८ जिल्हेज सीत

श्री

विज्ञापना. सकालीपासून दोनतीन चिठ्या पाठविल्या त्या पावल्याच असतील. रात्रीस सांडणी स्वार पा। तो कोणे समई पावला कलत नाही. श्रीमंत राजश्री रावसाहेब कवडीचे पागेत येऊन बसले आहेत. श्रीमंत राजश्री दादासाहेब थेउरास आहेत. वाड्यात भोजन करून येतील. ते कवडीस येऊन पागा पाहातील. इतक्यास च्यार सा घटकांचा आवकाश आहे. मग येथून निघोन हडपसरचे सुमारे येतील. आपली तयारी जालीच असेल. हडपसरचे सुमारे आलियावर पुढें सांगोन पाठवावे. हे विज्ञापना.

¶*Hari Ballal to Nana (?) reporting the intended visit of Raghoba and the Peshwa near Hadapsar.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 32] [22-8-1765

श्री

तालीक
राजश्री पंतप्रधान

मखलासी मुाा पुणे छ ४ माहे
रौवल उर्फ भाद्रपदमास

यादी किले पुरंदरकरी व किले वज्रगडकरी कोंडाजी नाा चिव्हे व बालोजी नाईक चिव्हे व समस्त सरदार लोक व कारकून सुाा सीत सितैन मया व अलफ. श्रीमंत साहेबांचे सेवेसी विनंती येसीजे. साहेबांचे येकनिष्ठ सेवक पिढी दरपिढी निष्ठेने शेवा करीत आलों. इतके दिवस किले हुजूरच साहेबी ठेऊन किल्या निाा सेवा घेऊन साहेबी चालविलें येशास किले माार राजश्री आबा पुरंदरे याचे व राजश्री सखारामपंत बोकील यांचे निसबतीस दिल्हे होते. परंतु कोणे मजकुरावरी आमचेविशींचा संदेह त्यास निर्माण होऊन किल्याचे चाकरीवरून आम्हास दूर केलें आणि आमचे जीवाचे संकट येऊन आम्हास पडलें. तेव्हां खांवदाचा जोडा जतन करावा आणि आपलेहि जीव मुलांलेकरांसुधां वांचावे म्हणून आपले येकनिष्ठे-करितां न करावयाचें साहस तें करून जोडे हस्तगत केले आणि पाइरी न सोडितां खांवदाचे सेवक आम्ही यैसे म्हणून कोणेके रीतीने जोडा जतन करून राहिलों. याकरितां मातबरांचे दावेदार जालों. यामुळें कधीतरी पेंच आणणार आणितील. यास्तव झालें कारण तो मजकूर बोलून लिहिला असे आणि पुण्याचे मुकामी सन मारी शेवेसी येऊन अर्ज केला कीं, लिहिला सर्व अर्थ ध्यानात आणू आज-पर्यंत बरी अगर वाईट वर्तणुक शाहाणपणे अगर वेडेपणे जाली असेल ती शेवकास माफ करून किले सुधां साहेबीं पदरीं घेऊन पूर्ववतप्रमाणे शेवा घ्यावी. व यासिवाये कितेक मजकूर कलमवार लिहिले आहेत त्याजप्रमाणे कृपा करून मान्य करून चालवावें. कलमें वितपसील येणेप्रमाणे.

किता कलमे लिहिल्याप्रमाणेच करार करून द्यावी.

मुख्य अर्ज हाच की, किले याउपरी कधीही कोणाचे निसबतीस न द्यावे पहिल्याप्रमाणे हुजूरच ठेवावे कलम. १

तुम्ही अर्ज लिहिल्याप्रमाणे किले हुजुरच ठेऊन बंदोबस्त करविला जाईल. येविशीं खातरजमा असों

जागे जतन व्हावे स्वामीचे पदरीं असावें याकरितां ज्यांचे सांपडेल त्यांचे वित्तविषय घेऊन पोटास खाले व खर्चले ते बोज्यां बारज्यां न म्हणता सर्व माफ करावे.

कलम १

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

देणें. याउपरी किले कोणाचे निसबतीस देणार नाहीं.

किल्याचे निसबतीस पूर्वीपासून सेवकांची चाकरी घेतली आहे. त्याजप्रमाणे पुढेंहि इतबार ठेऊन घ्यावी. कैदकानू सरकारची पहिल्यापासून चालत आली आहे त्याप्रों आम्हास कबूल असे. यामागे आम्ही कोणाचे पेंचांत नहोतों. लाहानसाहान अंतरे कधींहि पडलींच असतील परंतु खुनुस चितांत आणून खांवदानी शासन केलें नाहीं. पुढें आम्हाजवळून लाहानसान अंतर कदाचित पडेल परंतु साहेबी कोणाच्या सांगितल्यावर न जातां माफ करून आमचें संरक्षण करून जाग्याची शेवा घ्यावी कलम. १

बुधिपूर्वक लबाडीनें अंतर न पडावे. लाहानसाहान चुकोन पडेल तें माफ केलें जाईल.

दरकदार किल्याचे पहिले होते. परंतु हालीं ज्यांचा आमचा पेंच पडला आहे त्यांचे निसबतीचे असतील ते साहेबीं करार करून किल्याकडे देऊं नयेत. सरकारमायेचे इतबारी असतील तेच द्यावे. कलम. १

तुम्हास ज्यांचा संदेह त्यांजकडील त्यांचे निसबतीचे देणार नाहीं. निखालस सरकारचे मर्जीचे तेच दिल्हे जातील.

किल्यावर वितविषय कोणकोणाचा होता व आहे त्यापैकीं खर्च जाला तो कागदी जमेस धरून जाला खर्च तुम्ही समजावणे. खर्च जाल्याप्रमाणें मजुरा पडेल.

किल्यांचा सरंजाम साहेबीं आलीकडे नेमून दिल्हा होंता त्याप्रों किल्यांकडे करार करून चालवावा. बलकुबलीस जाणे. आबादान हुशार राहातील. सरंजामाची चौकसी किल्यांचे निसबतीने सरकारचे कारकुनाने करावी. परंतु सरंजामाचा यैवज दरोबस्त किल्यांकडे सालदरसाल पावत जाये यैसे करावें. कलम १.

किल्यांचा सरंजाम किल्यांकडे दिल्हा होता त्याजप्रमाणे करार करून देऊं. सरकारचा यख्तियारी कारकून किल्यावर राहील. तो चौकसी करून यैवज किल्याकडे देईल.

आमचे ठांईं माया धरून सरकारचीहि कैद जतन करून आमचा ज्यांसी पेंच पडला आहे त्यांजकडील ममता न धरितां आमचें संगोपन करून सरकारची जागा जतन करी, यैसा सरकारचा इतबारी शाहाणा असेल तो आम्हास खांवद करून द्यावा. त्याचे आज्ञेप्रमाणे आम्ही वर्तणूक करूं. कलम १

तुम्ही लिहिलेप्रमाणे सरकारमायेचा निखालस सरल शाहाणा तुम्हावरी मायाममता करी येसाच नेमून देऊं. त्याचे आज्ञेत वर्तणे.

आम्हाजवलून जसी पाहिजे तसी पायांवर हात ठेऊन घेऊन निशा

1796

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

हिशेब समजाऊं. या मजकुराचें कलम आलाहिदा लिहिलें असे. त्या प्रमाणे जाला खर्च मजुरा द्यावा. राहिला वितविषय जो असेल तो तफावत न करितां ठाऊक आम्हास जाला असेल त्याप्रों सांगूं आणि आज्ञा होईल त्याचे स्वाधीन करूं. याखेरीज चौकसी कोणाचा वितविषय असेल त्याची साहेबीं सुखरूप करावी आणि अढलेल तो सरकारांत द्यावा. या गोष्टीमुळें आम्हावर कोणाचा पेंच न ये, तें साहेबी करावें.

कलम १

तुमचे लिहिले प्रमाणे निभाविलें जाईल.

करून घ्यावी. आम्हीहि करूं. येकनिष्ठेस अंतर कधीहि करणार नाहीं. तैसीच आमची खातरजमा होये. भरवसां पुरे येसी निशा साहेबी बेल तुलसी देऊन करावी. त्या विश्वासावर बेफिकीर शेवा करून राहूं.

कलम १.

तुम्ही लिहिल्याप्रमाणे कधीहि येकनिष्ठेस अंतर करूं नये. तुमचे खातरजमेप्रमाणे निशा केली असे. तरी सरकार आज्ञेप्रमाणे वर्तत जाणे.

सर्व गोष्टींची उमेद आम्हास आहेच. जरुर किरकोळी कारकून वगैरे आसामी चाकर ठेऊन त्यांचें चालवावयांची कारणे आहेत ते सेवक हुजूर आल्यास कृपा करून येकावें. कलम १

जरूर लाहानसाहान अर्ज येकिले जातील.

कलमे सुमार

९

सदरहू मजकूर व सदरहू लिोप्रों नव कलमें करार केलीं असेत. लिहिल्याअन्वयें तुम्ही वर्तणूक करावी. तुम्ही पुरातन सेवक हुजूर पुणियांचे मुकामी येऊन पांयांवर हात ठेऊन येकनिष्ठेने सेवा करावी याविषई शफत केली. त्याजरून तुम्हावर कृपाळू होऊन तुमचे लिहिले मजकुराप्रमाणे तुमची खातरजमा शफतपूर्वक केली असे. तरी तुम्ही कोणेकेविषई खतरा न धरितां आज्ञेप्रमाणे येकनिष्ठेने वर्तणुक करणे. सदरहू लिहिल्याप्रमाणे तुमची निभावणी केली जाईल. तुम्ही पूर्ववत तीर्थरूप कैलासवासी रावसाहेब, आपासाहेब, नानासाहेब, भाऊसाहेब, याचे शेवेमध्ये येकनिष्ठ होतां त्याप्रों आमच्या शेवेंत येकनिष्ठ राहावें. तुम्हापासून अंतर देखिले तरी आमची शफत उगवली. येणेप्रमाणे करार करावें करार रुजू.

1797

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

किता कलमे मखलासी करून करार करून द्यावीं.

किले पुरंदरावर श्रीकेदारलिंग व बहिरी घेरियास व किले वज्रगडीं रुद्रेश्वर जागत्या जोती आहेत. धण्याच्या जागा बलकुबलीस त्यांचे बलावर आम्ही राखितो, तर साहेबीं तिहीं देवास तीन पालख्या लाहान नव्या सरंजाम गोंडे दोरण्या, बिछाने तकियें, पिंजरीसुधां करून द्याव्या. देवाचे उछवाचे दिवसीं आम्ही किलेकरीच खांद्यावर घेऊन फिरवीत जाऊं. दोचौ वर्षी सरंजाम जुना खराब जाल्यावर सरकारांतून नवा करून देत जावा. कलम १

सदरहू लिहिल्याप्रमाणें तिहीं देवास तीन पालख्या सरंजाम सुधा करार करून देविल्या असेत. करार करावें. करार रुजूं.

किल्यावर जमातदार आहेत ते येकनिष्ठ बरे माणूस आहेत. त्यांत कोणास आत्फागिरें व कोणास दिवव्या व पोरगेसुधां करार करून द्यावें. पंधरा आसामीची याद आलाहिदा असे त्याजप्रमाणे मखलासी करून किल्यास सनद देवावी. कलम १.

लिहिलेप्रमाणे यादीवर करार करून सनद सादर केली जाई. करार करावें. करार रुजूं.

किलेकरी कदीम लोक हालीमाजींत मारले गेले. त्यांच्या बालपर्वेशा साहेबीं चालविल्या पाहिजेत. त्याची

किले पुरंदरचे कोंडाजी ना। चिव्हे पिढीदरपिढीचे चाकर त्याजवर कृपाळू होऊन पालखी त्यास द्यावी. सरसाल तैनात नेमणूक रुपये ७०० सातसें दसमाही करार करून द्यावे. पालखी सरंजामासुद्धां सरकारांतून तयार करून देवावी. कलम १.

लिहिलेप्रमाणे येक पालखी करार करून देविली असे.

करार करावें. करार रुजू.

किल्यास कदीम लोकसुधां हजार माणूस येक वर्ष करार करून द्यावें. त्याउपरी कदीम किल्याचे माणूस सा सातसें होतें त्याजप्रमाणे पुढें करार करावे. कलम १

येणेप्रो करार करावें. करार रुजू.

विसाजी केशव किल्यावर आल्यामुळें सरकारचा जागा जतन जाली. पुढें साहेबांस शरण येऊन जागा हवालीं केली. शाहाणपणास येकनिष्ठेस अंतर केलें नाहीं. यास्तव किले पुरंदरची सबनिसीकडील फडणिसीची आसामी त्यांजकडे नेहमी करार करून द्यावी. कोणी आपले तर्फेनें आसामीवर ठेऊन चाकरी करतील व खुद किल्यावर जातील, येतील. आसामीचे चाकरीचा बंदोबस्त राखतील. आपला पुत्र व आपण उभयतां साहेबांजवळ राहून शेवा करणार त्यास त्यांचे कुटूंब पोषण

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

नावनिसी आलाहिदा आणून दाखऊं. त्याप्रमाो करार करून द्याव्या.

कलम १.

कदीम चाकरमान्यापैकी मेले असतील त्यांची तैनात पाहून बालपर्वेसी करार केली जाईल. लेक भाऊ चाकरीजोगा असल्यास पुढें आसामी करार करून बालपर्वेसी दूर करून तैनात माणूस पाहून केली जाईल. येणेप्रों करार करावें. करार रुजू.

किलियाचे घेरियाचें भांडण विल्हे लागलें नाहीं त्याची हद महदूद पुरातन कसी, बाजी घोलपाने हद महदूद ठराविली ती कसी, हें मनास आणून त्याचा बंदोबस्त साहेबीं करार करून द्यावा. कलम १.

पूर्वापार चालीचा शोध मनास आणून किल्याचा सरंजाम होये, सोय पडे, येसी महदूद करार करून दिल्ही जाईल. करार करावे. करार रुजूं.

कऱ्हाडची देशमुखी यादवांची आहे ती हुजूर सरकारांत माहाराजानी घेतली आहे. त्यास वाई देशची साहेबी कृपा करून कांहीं जीवन माफक माथां ठेऊन त्याची त्यास दिल्ही. तैसीच हेहि द्यावी कलम १

वतनदारीचा प्रकार फार नाजूक असतो. सविस्तर ध्यानात आणून मग आज्ञा करणे त्याप्रमाणे केली जाईल. करार करावें. करार रुजूं.

होयेसा तैनाता करून त्यांचे चालवावे. येक गांव मध्यम प्रतिचा मारानिलेस तीन साडेतिनशे रुपयांचा इनाम द्यावा. तूर्त इनाम न दिल्हा तर तैनातेंत द्यावा. पेस्तर सेवा करून मग अर्ज करावयाची शेवकाची उमेद असे. पूर्ण करणार खावंद समर्थ आहेत.

कलम १.

किले पुरंदरची सबनिसीकडील फडणीसीची आा कदीम तैनात असेल त्याजप्रों करार करून दिल्ही असे. आसामीवर इतबारी शाहाणा कारकून ठेऊन बंदोबस्त ठेवावा. खुद मारानिलेनी किल्यावर कामकाजास जावें यावें. पुत्रसहवर्तमान हुजूर राहून शेवा करावी. याची उमेद योगक्षेम चालेसा अर्थ चितांत आणून उभयेतांस तैनात करून शेवा घेतली जाईल. गांव बाा मुाा लिाप्रमाणे दिल्हा असे. शेवा पाहून पुढें उर्जित केलें जाईल. करार करावें. करार रुजू.

किल्याचे घेरियास कुरणें आहेत व पानवडी व धनकवडीचे रान किल्याचे घेरियास लगतें आहे. त्यामुळें कुरणें त्या गांवचीं घेरियासच केवळ लगती आहेत, यास्तव माणसाचा राबता कुरणाचे निमित्ते होतो. जाग्यास दगा होईल यास्तव कुरणें दुसरे कोणाकडे नसावीं. तूर्त किल्याकडे कुरणाची बंदोबस्ती देखरेख सांगावी वसवसा किल्याचा दूर जाल्यावर खातरेस येईल तसें करावें कलम १.

1799

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

विसाजी केशव साने यांचा खोतीचा गांव मौजे कोतलूक ता। वेलहा सुभा दाभोल येथील मनसुबी खोतीची अहे. ती मनास आणून सेवकाची खरी असली तरी सेवकाकडे करार करून द्यावी. प्रस्तुत वोक करितात. त्याची भीड भारी. माझे गरीबाचे वाली साहेबीं होऊन वाजिवी मनास आणून शेवकाची स्थापना करावी, कलम १.

इनसाफाविषई कोणाची भीड न धरितां वाजिवी होईल त्याप्रों केलें जाईल. करार करावे. करार रुजू.

शकराजी नीलकंठ किल्यास सरनाईकीचे आसामीवर चाकरी करीत होते. त्याच्या वर्तणुकेच फळ आम्हास जालें. याउपरी त्यांचे आमचे परिछिन्न बननार नाहीं. त्याची सरनाईकी दूर करून सरकारात ठेवावी. त्यास कधींहि देऊं नये. कलम १.

त्याजकडून दूर करून सरकारात ठेविली असे. त्यास देत नाहीं. करार करावे करार रुजू.

साहेबाचे वचनावरून आमची निशा जालीच आहे. त्याचप्रमाणे खुद रावसाहिबास सांगोन आमची खातरजमा होयेसी करावी. कलम १.

उचितप्रकारें तेहि करतील आज्ञा केली असे. करार करावे. करार रुजू.

किल्याचा बंदोबस्त राहून जागा जतन जाली पाहिजे. म्हणून तुमचे लिंहिलेप्रों तूर्त कुरणाचा बंदोबस्त किल्याकडे सांगितला असे. करार करावें. करार रूजू.

दग्यामध्यें किल्याचे निसबतीस स्वार येऊन चाकर राहिले. पैका घेऊन न आले व येऊन पलोन गेले त्याजकडे येवज पावला असेल त्याची याद आणून दाखऊं. त्याप्रों पैका वसूल करून सरकारांत घ्यावा. कलम १.

याद हुजूर आणून त्याप्रों येवज सरकारांत घेतला जाईल. करार करावें. करार रूजू.

तूर्त हुकमाप्रों अडीचसें माणूस व कारकून किल्यावर घेऊन जातों. किल्यावरील वस्तवानीची चौकसी करील आणि किल्याचा बंदोबस्त पूर्वी नामजाद सरकारचे लोक येऊन करीत होते त्याप्रों करी येसा कारकून द्यावा. लाहान साहान किरकोल मारचा फिर्याद सरकारांत न ल्याहावी त्यानी आम्ही ममतेने असावें. आम्ही जुने रीती प्रों वर्तू. कैदेस अंतर करणार नाही.

कलम १.

येणेप्रों करार करावें. करार रूजू.

पुरंदरचे व वज्रगडचे किल्याची व किला निा तालुक्याची कोणी येक आसामी अगर कोणेकविशींची

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

खावंदगिरी पुरंदरे वगैर ज्यासी आमचा पेंच पडला आहे व त्यांचे मायेचे मिलताऊ आहेत त्यांस नसावी कलम १.

तुम्ही लिहिलेप्रमाणे असतील त्यांस सांगणार नाहीं. करार करावे. करार रुजू.

करार येणेप्रमाणे पंधरा कलमें.

करार करावी. करार रुजू.

¶*Agreement between the Peshwa and the Kolis of Purandar who revolted in 1765 against Aba Purandare, the new commandant to whom the fort was made over by Raghoba.*

No. 33] [*Oct. 1765*

श्री

पुाा विज्ञापना. आपण आज्ञा केली की, दरबारी मातबर मुत्सदी आपल्या पल्यावर (?) करून घ्यावा. त्यावरून राा दादा फडनीस केले आहेत. वरकड गुरुजी वगैरे तेहि साहित्यास केले आहेत. दरबारची कालजी न करणे. मुख्यत्वेकरून राा मोरोबादादा आहेत. यासी जे बोलणे ते बोललो आहे. त्याणी आम्हासी भाषण केले कीं, तुम्ही दोन गोस्टी कराव्या. येक केला कराराप्रमाणे रुाा भरावे, दुसरे फडणिसाचे हाते कामकाज सर्व घ्यावे म्हणजे अम्हीं तुमचे कार्यात पडल्याचे फल आहे. वरकड जाबसालविशाई चिंता न करणे, यैसे बोलणे जाहले आहे. कलले पाहिजे. चंदेरीचे कापड फेटे व महमुद्या बहुत बारीक उंच व पागोटी दोन, सेले दोन यैसे अनुकूल पडल्या जरूर घेऊन पाठवणे. श्रीमंत संतुस्ट होतील या पद्धतीची पाठविने. श्रीमत दादासाहेबाकडे व त्याचे मुत्सदी यासी पत्रें लिहीत जावी. तैसेच श्रीमंत रावसाहेबास व मुत्सदियासी वरचेवर पत्रे तपसीलवार लिहीत जावी. राा दादा फडनीस याजला सविस्तर वर्तमान ममतापुरसर लिहिणे. आमचा दाखला सर्व पत्री लिहीत जावा. मागाहून सर्वाचे जाब घेऊन पाठऊ. राा चिंतो अनंत याची फर्मावीस पाठविली, त्यासी नासिकास गेल्यावरी दोन्ही कमले सरजामसुधा पावती करू. आपले दोन चार मतलब राहिले, त्याची समयोचित विनंती करून आज्ञा होईल त्याप्राा लिहू. राा आपाभट खरे याची पनासा हजाराची वरात महद

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

प्रयत्ने करून घेऊन पाठविली आहे. ते रााँ माघ वद्य प्रतिपदेस देऊन कबज घेऊन सत्वर पाठविणे. त्याचा बोभाट येऊ न देणे. बोभाट आल्या संकट पडेल. आधी आधी देणे ! बाकी राहिली रुपये व दरबार खर्च बाा यैसे पाठऊन द्यावे. येथे श्रीमंताची मर्जी परम नाजूक आहे. खोटे तिलमात्र कार्यास येत नाही. याजकारितां वारंवार लिहितो. जेणेकरून आमची व राा बाबाजीपंताची स्थीत राहे यैसे केले पाहिजे. राा भाऊसाहेब खरे आहेत म्हणून आनुबाई घोरपडी भाऊसाहेबाची आत म्हणत होती. त्यावरून तोतियासी किल्यावरून येथे आणून अनुबाईचे घरीच ठेविला. त्याजला सागितले की, तुम्ही वलखा. त्यावरून पंधरा दिवस त्याचे घरात ठेऊन त्यानी चौकसी बहुत केली. क्रित्रिम प्रकार त्याचे ध्यानास आला. तोतिया बोलला कीं, जनकोजीस आणा तो सागेल. त्यावरून जनकोजीचे नावे तोतिया होता तो आणिला. दोघे येक जागा करून पुसिले. तेव्हा सर्व खोटा प्रकार सर्वाच्या ध्यानास आला. दोघेहि खरे नव्हेत. तेव्हा अनुबाईने तोतिया भाऊस बाहेर काहाडून दिल्हा कीं, हा लटका. भाऊसाहेब नव्हे. मग श्रीमती दुसरे दिवसी प्रात:कालापासून त्रितीय प्रहरपरियेंत बुधवार पेठेच्या हवदापासी उभा केला. कारण की, सर्वत्र लोकानी खरा खोटा मनास आणावा, म्हणून उभा केला होता. सर्व जनाने खोटा केला. दुसरे दिवसी पायात बेडी होतीच तैसाच खिजमतगार वगैरे यांनी मारीत तोफखानात हवाला केला. श्रीमताचे चितात येक आंग हक+ करून सोडून द्यावा. तोतिया जनकोजी याची बाइको व माय व भाऊ आणिले. त्यानीं वळखिला कीं, हा रघोजी थोरात आमचा भाऊ. बाईकोने सर्वानी आपला म्हणाले. जनकोजी नव्हे. यैसे सर्वत्र मुखी खरे करून श्रीमंती त्याजला सजा पोहचाविली. दोन्ही कान व नासिक समग्र घेतले. व्यंग करून सोडून दिल्हा. त्याने दुसरे दिवसी विहीरीत घालून घेतले. मृत्य पावला. श्रीमतास कलल्या त्याचे दहनास आज्ञा दिल्ही. यैसे वर्तमान जाहाले. कलले पाहिजे. बहुत काय लिहिणे हे विज्ञापना. आंबसोल पका दोन सेर व साबूचे दाणे सवासेर पाठविले ते घेऊन उतर पाठविले पाहिजे. हे विज्ञापना. मातुलाचा बालभोग (?) जरूर ठिकाणी लाऊन लिहिला पाा. फार उपयोगी पडेल. वडिलाकडील हिसेबहि पाठविला. त्या प्रांतास येतील आपण भेटून कृपा करून घ्यावी.

+हक करणें=तोडणें.

1802

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

आपण तर येकनिष्ट त्याचे चरणी. परतु त्याचे मनात बहुत कलुश जाहले आहे, याजकरितां लि॥ असीहि पत्रें लिहीत जावी. वाचोत न वाचोत लिहीत जावी. ही विज्ञापना.

¶*The writer and the addressee cannot be ascertained. The paper contains news about the pretender being kept with Anubai Ghorpade for a fortnight for identification. He was declared false by all and was exposed in the market place for a whole day for all to see.*

No. 34] [*Oct. 1765*

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री दादा स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी. जयनगर पा[१] सुलतानपूर येथे भाऊसाहेब म्हणोन निर्माण जाले आहेत. जयनगरकर गोसावी याणी बहुत प्रकारे मुदारत[२] करून ठेविले आहेत. सुलतानपूर परगण्यांतील कितेक लोक भेटीस जातात, भेटून येतात, कितेक खुणामुद्रा सांगतात, त्यावरून भाऊसाहेब खरे असे लोक म्हणतात. कोणाजवळ बहुतसे भाशण करीत नाही. बोलणे तर ग्वालेरी बोली बोलतात. लेखणी धरून हस्ताक्षर लिहीत नाही. आम्हीहि येथून रभाजी जमातदार शहाणा माणूस या गोष्टीचे शोधाकरितां रवाना केला आहे, तेहि एका दो रोजा येतील. नंदुरबारास वगैरे एका दो जागा बातमीस पत्रें देऊन पाठविले होते, तेथूनहि जाबसाल आले कीं, लोक भाऊसाहेब म्हणतात, सत्य मिथ्या कोणी म्हणावें? बेरोजगारी पोटभरू लोक पाच च्यारसे पाईचे माणूस ठेविलें व से दीडसें स्वार ठेविले आहेत, आणिखीहि ठेवितात. श्रीमंत पंतप्रधान याचे नावाचे सिके नवे केले. आजच जयनगराहून जमीदाराचे नावे पत्र घेऊन जासूद आला. तेच पत्र बजिनस सेवेसी पाठविले आहे. त्यावरून ध्यानास येईल. बळवंतराव कृ (ष्ण) कोकणस्त गृहस्त आपले परगण्यांत राहतात. पूर्वी सेपनांस स्वाराची सिलेदारी करीत होते, प्रस्तुत घरीच आहेत, त्याणी आपला कारकून भाऊचे नावें पत्र लेहून पाठविला होता. त्यानी जेनगरास जाऊन भेटून भाऊचे नावचे पत्र बळवंतराव यास पाठविले व चिमणाजीपंत कारकुनानी बळवंतराव यास लिहिले आहे, त्या पत्राच्या नकला करून सेवेसी पाठविल्या आहेत. सारांश या प्रांती ढोंग निर्माण जाले आहे, हे वर्तमान श्रीमंतास निवेदन करून याचा बंदोबस्त होय तो अर्थ केला पाहिजे. या गोष्टीची उपेक्षा करून लस्कर पुढें जाईल तर या

---

१ तालुके शहादें. २ बर्दास्त.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

प्रांताची खराबी होईल. नंदुरबारकर कमाविसदारांनी व सुलतानपूरकर कमाविसदारानी च्यार पाचसे प्यादे ठेऊन आपले ठाण्याठुण्याच्या बंदोबस्त्या करून आहेत. आमचे येथील सिबंदीचा भरणा सेवेसी विदितच आहे, यास्तव या गोष्टीचा बंदोबस्त लौकर जालिया उत्तम आहे. गडबड जालियास किल्याकोटाचे बंदोबस्तीस माणसे ठेवावी लागतील. त्यास जशी आज्ञा होईल त्याप्रमाणें वर्तणूक केली जाईल. बहुत काय लिहिणे लोभ असो दीजे हे विनंती. नंदुरबारकर कमाविसदार भिकाजीपंत याचे पत्र व प्रकाशास चांदो मोरेश्वर याचे पत्र आले ते पाा आहे. हे विनंती.

¶*News-letter addressed to Raghoba Dada giving details of the pretender and advising prompt measures against him.*

No. 35] [*6-4-1766*

पौ छ २५ सवाल सीत
चैत्र मुाा सिमथर

श्री

पुाा श्रीमंत राजश्री दादासाहेब
स्वामीचे सेवेसी.

विज्ञापना ऐसी जे:—आम्ही वीसनगरास दाखल जाहाल्यानंतर राा दमाजी गायेकवाड यांजकडोन आज येक मासपर्यंत भांनगडीस ग्रहस्त दाहा पांच वेल आले. त्यास आंम्ही टालाटालच करून जाबसाल करणे ते केले. सेवटी फारच त्याजकडील आग्रह जाला कीं, तुंम्ही आंम्ही समक्ष बोलोन ठराव होणे तो होईल. त्यावरून छ १२ सवालीं गायेकवाडांचे लस्करांत जाऊन राा दमाजीबावा यांची भेट घेतली. भेटीअंती कितेक प्रकारें भाषण जाहालें. त्याचा आशय मनास आणितां आंम्ही बाबीस सोडोन द्यावें. त्याणीं आम्हांस च्यार लाख रुाा कर्ज सरकारांत रसद भरावयास द्यावे. कर्जास ऐवज आंम्ही मामलतीमध्यें लाऊन द्यावा. याप्राा त्यांचा मनोदय. त्यास बाबीचा आशय पाहातां सिदपूर व वडनगरचा किला सरकारांत द्यावा. सर्व प्रकारें आमचे साहित्य करून गायेकवाडाचें पारपत्य करावें आणि येथोन उधलोन लावावे. ऐशास येथें प्रसंग बनेल तैसे करीतच आहों. परंतु दोन्हीं प्रकार सेवेसी लिहिले आहेत. यामध्यें कोणती गोष्ट करावी ? कोणाचा पक्ष धरावा ? ते अविलंबे आज्ञा करावी. त्याप्राो वर्तणूक करूं. वरकड स्वामीचे आगमनाचा विचार या प्रांतें जाहाल्यास दकारेयांचे पारपत्य होऊन च्यालीसपंनास लाख रुाा सरकारांत मिलतील व मातबर

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

जागे व प्रांत सहजांत हस्तगत होईल. येविसीं आज्ञा ते सिरसा. स्वामी हिंदुस्तानात जाणार यास्तव येक वेल हे प्रांते येणे होऊन स्वामीचे चरण पाहावे हा निजध्यास लागला आहे. त्यास धणींच कृपालु होऊन इकडे यावयाचें केलें तर उतमच जाहालें. नाहीं तेव्हां इकडील बखेडा निर्गमात आल्यानंतर सेवेसी येऊन दाखल व्हावे हा सेवकाचा निश्चये आहे. दैवयोगानरूप घडोन येईल तो सुदिन आहे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*The writer communicates his interview with Damaji Gaikwad to Raghoba Dada and requests him to pay a visit to Gujarat to settle affairs in that quarter.*

No. 36] [*10-4-1766*

श्री

चिरंजीव राजश्री राव यांप्रति रघुनाथ बाजीराव आसीर्वाद उपरी. येथील कुशल जाणोन स्वकुशल लिहीत असिले पाहिजे. विशेष :—खासा स्वारी माळव्यात आलियावर भूपाळकराकडे नजरेचे यैवजाचा वगैरे फडशा करून घेतल्याचे वृत पेसजी सविस्तर लिहिलेच आहे. त्या उपरांत दरकूच झांसीस येऊन पोहचलो. वाटेस खेचींचा वकील हजूर येऊन पुन्हा तेथील राज्यास आणावयाकरितां गेला आहे. राजाहि येणार; आलियावर तेथील निर्गत होईल. वोडसेकराकडे सरकारचा ऐवज मागील बाकीचा येणे. त्याची तोडजोड राजश्री मल्हारजी होळकर यांणी कागदीपत्री मात्र केली होती. तेथील विचार मनास आणितां त्याजमध्ये किमपि जीव राहिला नाही. तेव्हा येक लक्ष रुो करार केले. त्याचे हती घोडे जवाहीर आले. राजश्री मल्हारबा व शिंदे यांची फौज चमेलपार जाऊन * * * * * करीत असतां त्यासी यासी * * * * * फौज थोडीसी कचकरली. चमेलवर आली. खासा स्वारी इकडे आलीसी कळलियावर उभयता सरदार हजूर फौजसुधा येत आहेत. दों चौ रोजात येऊन पोहचतील. भेटी जाहाल्यावर लेहून पाठऊ. पादशा कुऱ्यास आहे. थोडेसे फिरगी त्याजपासी आहेत+. त्यात अवसान दिसत नाही. स्वारीची सलाबत जाठ रोहिले पठाण आदिकरून सर्वांवर फौजेची तोफखानियाची बहुत पडली आहे. श्रीसत्ता आहे तर सर्व गोष्टी मनोदयानरूप घडतील. शीख जाटास सामील जाले होते. ते गुरूचे कढईकरितां आपले देशास गेले.

\+ चिन्हांतला हा मजकूर खोडला आहे.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

जाठापासी थोडेसे पाच सा हजारमात्र राहिले आहेत. इकडील राजेरजवाडे काही वकील आले; काही येत आहेत. मागाहून सविस्तर लिहिले जाईल. रा छ २९ सवाल बहुत काय लिहिणे.

¶*Raghoba Dada informs Madhaorao of his doings in north India and the condition of things in that section.*

No. 37] [*6-7-1766*

पौ छ ६ सफर
आखाड शुा ७ त्रितिय-
प्रहर इंदुवासर.

श्री

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य
राजश्री मल्हार जगजीवन गो

सेवक माधवराव बलाल प्रधान नमस्कार. सुा सबा सितैन मया अलफ. तुम्हीं कोणे जागा जाऊन पावलेत, काये वर्तमान ? तुम्हांस निरोप दिल्हा तेव्हा आज्ञा केली कीं तुम्हाबराबर स्वार जमा किती होतील ते व गाडदी व हशमी लोक तुम्हाजवल येऊन पावतील त्याची हजीरी घेऊन वरचेवर पाठवणें. नवे खानदेशी प्यादे तुम्हांस ठेवावयास सांगितले होते ते ठेविले की न ठेविलें, तैसेच बरानपुरास बातमीस पुढें माणसे पाठऊन, नारो कृष्ण काये तरतूद करितों ते बातमी आणून लेहून पाठवित जाणे, म्हणोन आज्ञा केली असता सारेच गोष्टीचे तुम्हांस विस्मरण जाले. अपूर्व आहे. अत:पर स्वार व गाडदी व हशम याची गणती पाठवणें. नवे खानदेशी प्यादे ठेविले कीं नाहीं, किती ठेविले ते लिहिणें. नारो कृष्णाची बातमी रोजाचा रोज येईल ते हुजूर लेहून पाठवणें. नावा चाकदे(वा)वर जाणे. मातबर जागाजागाच्या जमा करून बहुत खबरदारीने मातबरीने पार उतरून पारपत्य करणे. नारो कृष्णानी जमेत किती जमा केली ते लिहिणे. रा माधवराव कदम यांस नावेविशीं पत्र लिंहिले ते त्याजकडे पाठवणे. नावा आणवणे. जाणिजे, छ २८ मोहरम बहुत काये लिहिणे.

लेखन
सीमा.

¶*Peshwa Madhaorao reprimands Malhar Jagjivan Panshe for failing to execute the writer's orders to raise troops and proceed against Naro Krishna.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 38] [*16-7-1766 ?*

श्री

राजश्री तात्या स्वामीचे सेवेसी विनंती उपरी. येथील कुशल ताा छ ८ सफर सौम्ये वासरे त्रितीये प्रहर जाणोन स्वकीयें लेखन केलें पाहिजे विशेष. आपले लस्करचें व श्रीमंताचें कूचमुकामाचें वर्तमान नित्यानित्य लिहून पाठवीत जावें व आधिकोतर होईल तेव्हां तेहि लिहीत जावें म्हणोन दोन च्यार वेला विनंती लिहिली. परंतु आज चारपांच रोज वर्तमानच कलत नाही. याजवरून आम्हीं विनंती लिाा. तीं पत्रें आपल्यास पावलीं न पावली कलेना. या उपरीं दररोज कूचमुकामाचें वर्तमान नित्य एक पत्र लिहून पाठवीत जावें व अधिकोतर होईल+ तेव्हा दुसरे पत्र ल्याहावे. सारांश येथील चिमणाजी गोविंद कारकून पाठविला म्हणऊन लिाा होते. परंतु तो दुखण्या पडला. आपले जवलील एका कारकुनास नेहमी सांगोन नित्य दिनचर्या रावतांची डाक आहे याजबाा लेहून पाठवावे. पुढे डांकेस अधिक राऊत लागतील ते आपण देवावे. सारांश, नित्य वर्तमान जरूर एक चिठी लांब ल्याहावयाची नाही. दोहोकडील कूच मोकामाचे वर्तमान कलावे. विशेष होईल ते कलावे. येथे चिंतो विठल व विसाजी केशव व बाबूजी नाईक उदईक गुरुवारी माचीस बोलावयासी श्रीमंताकडून आले ते येतील. कृपा केली पाहिजे हे विनंती.

¶*Naro Appaji to Haripant Tatya asking daily reports of the Peshwa's movements.*

No. 39] [*22-7-1766*

पाो छ २४ सफर येकादशी

श्री

पुरवणी राजश्री मल्हार जगजीवन
गोसावी यांसी

सुाा सबा सितैन मया अलफ

बरानपुरास झुंझ भांडण पडेल, खर्चास यैवज असावा म्हणोन लिहिलें तें कळलें त्याजवरून रुपये.

मानाजी निकम याचे निष्ठेचा अर्थ लिहिला तो कळला; येविशी तुम्ही पहिलें लिहिलें त्याजवरून त्यास समाधानपत्र पाठविलेंच आहे. देणें.

+ येथून पुढें नारो आपाजीचें हस्ताक्षर दिसतें.

1807

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

१०००० परगणे जामनेर निसबत
बाळकृष्ण नारायेण.
१०००० परगणे जळगाव निसबत
जगनाथ गणेश.
———
२००००

येकूण वीस हजार रुपये देऊन सनदा तुम्हाकडे पाठविल्या आहेत, त्याप्रमाणें यैवज आणवणें.

बाबूराव निकम व हैबतराव जाधव व हरी दामोदर व खंडेराव जाधव हीं पथकें मागें राहिलीं होतीं व भोइटे मिळोन तीनशें स्वार आले आहेत. सटवोजी जाधवराव याचेंहि पथकें येत आहे म्हणोन लिहिलें तें कळलें. सारे लोक तुम्हाजवळ जमा जालेच असतील.

जाणिजे. छ १४ सफर. बहुत काय लिहिणें ?

¶*The Peshwa sends money and forces for the help of Malhar Panse in his endeavour to capture Burhanpur from Naro Krishna who was holding it on behalf of Raghoba.*

No. 40] [*22-7-1766*

श्री

पुरवणी राजश्री मल्हार जगजीवन
गोसावियास,

सुा। सबा सितैन मया अलफ शहर बरानपूर येथील गुता सत्वर उरका असा प्रकार आहे. तीर्थरूप राजश्री दादासाहेबी राजश्री नारो कृष्ण यास पत्र सादर केले कीं शहर हवालीं करणें. त्याजवरून त्याणी तुमचे हवालीं शहर केलेंच असेल. बरानपूरचा गुंता उरकतांच तुम्हीं लोकांस निरोप देणें. सिबंदी सहसा न चढवणें. तीर्थरूपाचें पत्र आम्हांस येऊन पावलें, अतःपर गुंता न पडावासे आहे. तुम्ही वर्तमान वरचेवरी लिहीत जाणे. शहरचा गुंता उरकला म्हणजे नारो कृष्ण यास घेऊन येणे. जाणिजे छ १४ सफर.

¶*The Peshwa orders Panse to disband his troops as soon as Burhanpur is captured and return to Poona with Naro Krishna.*

No. 41] [*22-7-1766*

पो छ २४ सफर

श्री

अखंडित लक्ष्मीआलंकृत राजमान्य
राजश्री मल्हार जगजीवन गोसांवी
यांसी

सेवक माधवराव बलाल प्रधान नमस्कार. सुा। सबा सितैन मया अलफ. तुम्हीं विनंतीपत्र छ २७ मोहरमचे पाठविले ते छ ८ सफरी प्रविष्ट जाहालें.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

आजी चांगदेवाहून कूच करून तापी उतरून गेलो. पुढे कासीपंत च्यारसे स्वार व महमद इसफ रा। केले ते बहादरपुऱ्यावर गेले. रा। नारो कृष्ण दरवे यानी शहरची मजबुदी करून लडावें या विचारात आहेत. सेट्याजी आइतोले याचे पत्र व कारकून आम्हाजवळ आला ; दोन दिवस तापी उतरू नये, आम्ही नारो कृष्ण यांस समजाऊन सांगतो म्हणाले, व मा।रनिलेचे पत्र आले तेच सेवेसी पाठविले असे त्याजवरून विदित होईल म्हणोन लिहिले ते कलले. ऐशांस तुम्हीं तापी उतरून गेलेस हे उतम केले. सेट्याजी आइतोले याचा प्रकार दुलग. केवल त्याचा भरवसा धरावासा नाहीं. तुम्ही बहुत खबरदारीने चौकबंदी करणे. शहरातील फोडाफोड करून नारो कृष्णांस धरून बाहेंर काढणे. तुम्हीं सर्व हुनर करणें ते करीतच असाल ; कारणे सावकारावर नारो कृष्ण याणीं तसदी फार करून पहिले तीस हजार रु॥ घेतले ; हाली वीस हजार घेतले. रयेत खराब केली म्हणोन लि॥ तर हे गोष्ट तुमचे अनुकूलतेची आहे. सर्वास दिलासा देऊन फितुर करऊन काम करणे. जाणिजे छ १४ सफर. बहुत काये लिहिणे.

लेखन
सीमा

¶*Peshwa Madhaorao orders Malhar Panse to do his best to restrain Naro Krishna and capture Burhanpur.*

No. 42] [*28-7-1766*

+श्री

राजश्री शेट्याजी आइतोले गोसावी यांसी

ॐ अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य स्नो। रघुनाथ बाजीराव आशीर्वाद. सु॥ सबा सितैन मया व अलफ. तुम्ही विनंती पत्र पाठविलें ते प्रविष्ट जालें. श्रीमंत राजश्री राऊसाहेबानी नारो कृष्णाचे पारपत्यास मल्हार जगजीवन पाठविले ते येत आहेत. पुढें कांहीं गाडदी * * * त्यास जाजती सिबंदी ठेवणे लागले कांहींच नाहीं. मजला राऊसाहेबीं पत्रें पाठविलीं त्याच्या नकला पाठविल्या आहेत. पुढें आज्ञा कर्तव्य ते करावी म्हणोन लिहिलें तें कळलें. ऐशास खासा स्वारी लांबली याजकरितां नारो कृष्णानी आपले मतलबाकरितां चिरंजीवाचेच होऊन राहावयाचे होते. दहा वीस हजार तोटा आला असता तरी चिंता नव्हती. पुढें खासा स्वारी देशी येती तेव्हां जशी आशेर मुल्हेर

+ या पत्राआधी नंबर ५२ चें पत्र वाचावें.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

वगैरे किले खासगीखाली आहेत तसे शहरहि खासगीखाली ठेवावयाचे मनांत होते. परंतु मारनिलेनी तसें न कले. हली येविसीची पैरवी[१] हुजरून व्हावी तर सध्याच ग्रहकलह होऊन मातबर पेच पडणार. बहुत नुकसानी होऊ सकणार. याजकरितां शहर द्यावे हेच उचित जाणोन नारो कृष्णाकडे पत्रे व खिजमतगार पाठविले आहेत. त्याचे अबरूस ढका न लागावा येविसी चिरंजीवास लिहिलें आहे. अबरूस ढका लागणार नाहीं. तुम्हीहि नारो कृष्णा * * * शहर खाली करून देवणे * * * हर देऊन खासा स्वारी येईतोपर्यंत नाशकास जाऊन राहावें. जाणिजे छ २० सफर बहुत काय लिहिणे.

¶*Raghoba orders Shetyaji Aitole to inform Naro Krishna to hand over the town of Burhanpur to the Peshwa's commanders.*

No. 43] *[5-8-1766*

छ ३ रावल श्रावण
सुा सबा

श्री

अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य
राजश्री मल्हार जगजीवन यांसी

शेवक माधवराव बलाल प्रधान नमस्कार. सुा सबा सितैन मया व अलफ. शहर बऱ्हाणपूर येथील त्रिंबक नारायेण यांजकडील कलमे.

नारो कृष्ण यांजकडील तह होऊन शहर हस्तगत जाहालें म्हणजे ठाण्यातील जकिरा वगैरे याची मोजदाद करून ठाणें जकिरासुद्धां त्रिंबक नारायेण यांचे स्वाधीन करणे.

कलम
१

नारो कृष्ण यांचे फितुरांत सिलेदार व प्याद्याचे जमातदार ऐसे मिलोन सरकारचे फौजेसी झुंजोन सरकार नुकसानी केली सा ठाणे हस्तगत जाहालियावर दरोबस्त सिलेदार व जमातदार यांची घोडी सरकारांत लाऊन पागा त्रिंबक नारायेण यांचे हवाली करून चंदी व खासदार बाजे लोक यांचे रोजमरें याची खर्चाची नेमणूक करून देणे; व शहर मजकुरी

---

१ तरतूद.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

हती येक सिलेदारांचा आहे तोहि सरकारांत लाऊन मारानिलेचे हवालीं करणे. येणेप्रो कलम १

येकूण दोन कलमे करार केली असेत; तरी सदरहू लिहिल्याप्रो करणे. जाणिजे. छ २८ सफर. बहुत काय लिहिणे?

लेखन सीमा

¶*Terms of surrender of the town of Burhanpur communicated by the Peshwa to his commander Panse.*

No. 44] [*1767?*

श्री

चिरंजीव राजश्री राव यांसी आसीर्वाद उपरी. इकडील वर्तमान तरी गोहदेहून कूच करोन जाठाचे शहावरी चालिलियाचा प्रकार सविस्तर पेशजी आपणास लिहिला आहे, त्यावरून कलले असेल. गोहदेहून ढवलपूरचे रोखे चालिलो. तेव्हा जाठानी महंत रामकिसन बैरागी व उमरावगीर गोसांवी यास हुजूर पाठविलें. रा सुलतानजी लांबहाते यासहि सोडून त्याजबा पाठऊन दिल्हे. महंत व गोसावी यानी कितेक प्रकारें आर्ज करून निरोप घेऊन गेले. तदोतर स्वारी करोली प्रांते आली. तेथील संस्थानिकाचा कुवर व कारभारी येऊन मुलाजमत केली. खंडणीचा गुता तीन लक्ष रुपयावरी उरकोन दिल्हा. आजपरयेत कोठे रुपया मिलाला नाही. सात आठ महिने गोहदेस लागलो. मुल्क मारून ताराज केला. मोर्चेहि लाविले. त्यात हाल राहिले नाहीत. व आम्हीहि खर्चाचे पेचात आलो; तथापि त्याणी दम धरिला. सेवटी ते सोडून इकडे यावे लागले. पुढें मनसबा ठरेल तो लेहून पाठऊ.

¶*Raghoba to Madhaorao, informing the latter of his doings in north India and of his difficulties caused by want of funds.*

No. 45] [*1767?*

श्री

विज्ञापना विशेष. छ २० जिलकादचे व छ २७ रोजचे आसीर्वादपत्रें आली, त्यात आज्ञा आहे त्याप्रमाणे वर्ततो. राजश्री सुभेदाराचे येणे अद्याप होत नाही

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

आणि लोक मनस्वी भाशणे करितात जे, श्रीमंत मागे फिरले, साठ सतर हजार फौज समागमे आहे, यांची मसलत फसली, पेचांत आले, असे कितेक प्रकारे बोलतात. आणि राजश्री विसाजीपंताचे सुवर्णदुर्गाहून पत्र आले, त्यात लिहिले आहे की, गुहागराहून झाडून माणसे आणली आहेत. हे वाचून चिताने कल्पना अनेक घेतल्या असा प्रकार. माणसे आणिली तेव्हा येथील माणसांचा काये विचार करावा हे आज्ञा काहींच नाही. यास्तव मुजरद अबदुला सेवेसी पाठविला आहे. तर साद्यंत कसे लिहिले पाहिजे, कोणे रीतीने वर्तावे ते आज्ञा असावी, त्याप्रमाणे वर्तन. देशमुखीच्या संदा पाठविल्या म्हणौन पत्रीं आज्ञा; परंतु अद्याप आल्या नाहीत. तात्या, जो विचार करणे तो कालदेशवर्तमान पाहून पका करावा. सारांश, जीव राहिले म्हणजे सर्व दैलत मिलऊ. वडिली शरीरास फार जपावे. मला तो, बाजारी वर्तमाने यैकितो येणेकरून, काहीच सुचत नाही; तर अधिक-उणे वरचेवर लिहून आज्ञा कर्तव्य ते करीत जावी. त्याअन्वयें वर्तत जाईन. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना. पत्र वाचून फाडून टाकावे, ठेऊ नये. येथील हालीचे कारभारी आहेत त्यांचा मजकूर आहे की, राजश्री विसाजीपंत याचें पुत्राचे हातचे पत्र की मामलत याचे हवाली करणे, असे असलियाविना हवाली करणार नाही असे भाशण करितात आणि लोक लोकपाले यासी (?) खलबते करितात चौकी पाहारे दाहरावर (?) भरणे करीत आहेत असे वृत आहे. वडिलास कळावे हे विज्ञापना.

¶*The writer and the addressee are unknown. News-letter containing evil reports about the failure of Raghoba's expedition into the north.*

No. 46] *[1767*

श्री

पुरवणी राजश्री नारोशंकर राजेबहादर स्वामी
गोसावी यांसी

विनंती उपरी. तुम्हास निरोप दिल्हावर माहादजी सिंदे याकडून बातमी आली त्यात माार लिाा आला जे तुम्ही मशारनिल्हेस लिहिल्याप्रमाणे यैवज वगैरे गोष्टी सर्व कबूल करून तूर्त पाच लक्ष रुपये तुम्हाकडे रवानगीची तजवीज केली आहे तो यैवज तुम्हास येऊन लौकरच पावेल. वरकडहि यैवज येईल. कोणे-हिविसी मशारनिलेचा गुंता नाही. कराराप्राा आमलात येत आहे, ह्या मजकुराची पत्रे व यैवज रवाना जाल्याची पत्रे मशारनिलेचीच तुम्हासहि आली आहेतच. सारांश सिंदे याकडील लढा नाही. तुमचे जाणे पथकसुधा याच कार्याकरिता

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

मुख्यत्वे; म्हणौन तुमची सारीच फौज तुम्हासमागमे योजिली होती. आतां सारी फौज नेणे. दरकार नाही. यास्तव तुम्ही चारपाचसे स्वारानसी हिंदुस्थानात सिंदे याजकडे जावे आणि बाकी फौज झाडून त्यात येक चांगला सरदार देऊन हजूर चाकरीस पाठवणे. येथे मसलतीचे दिवस. आधी तरी तुम्हीच असावे परंतु येका कामात गुंतलेत. अस्तु. फौज तऱ्ही यावी म्हणजे तुम्हीच असिल्याचे फल येते. दुसरा प्रकार येथे यैवजाचा वोढा कैसा आणि मसल(त)सीर हे तुम्हास ठाऊकच आहे. यास्तव निरोपसमईच समक्ष सांगितलेहि आहे की हरतऱ्हेने पांच लक्ष रुा पाठविणे. त्याप्राो तरतूद कराल हा भरवसा होता. सांप्रत तरी सिंदे याकडून पांच लक्ष रुपये आलेच आहेत तरी तो यैवज आधी मसलतीचे उपयोगास पाठवणे. या कार्यास अनमान करावयाचा समय नसे. तुम्ही येकनिष्ठ सेवक जे रीतीने तुमचा उपयोग खावंदकामास पडेल तीच गोष्ट करावी व कराल निशा आहे. यावेलेस तुम्ही यैवज पाठवावा म्हण (आण ?) फौजनसी व द्रव्यानसी तुम्हीच सेवा करून दाखविलीत. खुद जातीने यैवज व फौज जलद हजूर आल्याने सिंद्याचे कामात कोणेहीविसी उणे पडत नाही. हा यैवज तुम्ही क्षेपनिक्षेप हजूर पाठविणे. तुमचा यैवज तुम्हासी लौकरच पावितील (तुम्हास सिंदे लौकरच पावितील ?) त्याची तरतूद केली आहे. जरूर लिाप्रोा करण.

¶*This is probably Peshwa Madhaorao's letter to Naro Shankar mentioning how Mahadji Scindia was estranged from Raghoba, and asking money to be remitted at once.*

No. 47] *[1767 ?*

(पहिलें पान मिळाले नाहीं दुसरे पानापासून मजकूर,)

* * रून चितातील सर्व काळजी जाऊन उत्साहशक्तीचे पुष्टिवर्धन जाहले. श्रुतीहि अन्वर्थकच येतद्विषई आहे. ॥ त्रियंबकं यजामहे सुगंधिं पुष्टिवर्धनं ॥ अर्थ विदितच आहे. श्रीमंत स्वामीकडील वृत्त तरी सिंदे व होळकर या उभयता सरदारास हिंदुस्थान प्रांताचे बंदोबस्तास ठेऊन खासा स्वारी गुजराथ प्रांते जाऊन आनंदवलीस जाणार. राा तुकोजी होळकर याजला सरदारीची वस्त्रें दिल्ही. दहा लक्ष रुपये नजर ठराविली. व नवी जागीर होळकरासी दिल्ही होती त्यापैकी तीन प्राो मात्र त्याजकडे ठेऊन बाकी सिरोज आदिकरून नवी जागीर सरकारांत ठेविली. मालजी होळकर दिवंगत जाहले. अहिल्याबाई संग्रहातील पैका राा गंगाधरपंत तात्या याजला देत नाही. मुलकाचा पैसा घ्यावा आणि सरकारची नजर देऊन फौजेस पैका द्यावा हा प्रकार होळकराचे मंडळाचा आहे. सिंद्याकडील राघो राम व बाजी नरसिंह व राघो मल्हार पागेनीस हे

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

त्रिवर्ग कैद करून सिंद्याचे कारभाराची वस्त्रें रा। अवचितराव गणेश यास दिल्ही. त्यास पुन्हा त्रिवर्गांचे मणात आहे कीं दहा लक्ष रुो सरकारात देऊन कारभारी व्हावें ऐसे आहे. त्यास दृढप्रयत्नी आहेत. निश्चय ठरोन पत्रे आलियावर सेवेसी लेहून पाठऊं. दोन्ही सरदाऱ्या आहेत. त्यास फौजेस पैका वाटून लोकांचा जमाव करून दोन्ही सरदार फौजेसुधां जाठाचे शहावरी चेर्मण्वती तीरास येणार. अंतरवेदीतील रोहिले व जवाहीरमल याची फौज चमेल उतरोन पंधरा हजारपावेतो जमाव कछवाधार प्रांते आली. झासी तालुकेयाचे मेड्यावरी आली होती तेणेकरून मुद्रक तजावजा जाहला, व किलेयाचे बंदोबस्तीस जाजती सिबंदी व जकीरा करावा लागला. असो श्रीमंताचे पुण्यप्रतापिकरून जाट रोहिले याची फौज चमेल उतरोन आपले मुलकांत गेली; परंतु चमेल व यमुना मात्र दरम्यान. ते मड्यावरीच आहेत. मार्ग पाहोन गेले याअन्वये * *

(यापुढील पाने नाहींत.)

¶*A mutilated letter communicating details of Raghunathrao's movements in the north.*

No. 48] [*26-10-1776 ?*

+पौो छ १४ रमजान सबा

×श्री

शेवेसी भीमराव येसवंत कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ताा छ १२ रमजानपर्यंत मुकाम मौजे नेसावे ताा नाणे मावल यथास्थित असे विशेष. छ ९ रमजानी तोतयाचे लस्करचा गोट लुटला. त्यात दौलतगीर गोसावीयाचा रुमाल धोंडजी सिंदे याजकडे आला. त्यात सिलेदाराचे वगैरे राजकारणी कागद सांपडले, ते फेरिस्त घालून शेवेसी पाठविले आहेत. त्याज वरून विदित होईल. मागील कागद भाऊसाहेबाचा श्रीमंत राजश्री दादासाहेबाचे नावचा रुमालात सापडला. त्याजवर भाऊसाहेबाचे हातच्या पाचसा वोली आहेत. तो कागद येथे ठेविले असे. तशा तऱ्हेचे अक्षर काढावे या अर्थे कागद बालगिला होता असे दिसते. शेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Bhimrao Yeshvant Panse informs Nana Fadnis that he attacked the camp of the pretender of Bhausaheb. Among the papers that he secured in the loot there is one letter written by Sadashivrao to Raghunathrao kept by the pretender with an intention of imitating Bhau's handwriting.*

+ पैवस्ती नाना फडणिसांच्या हातची. × सदरहू पत्र स. मा. कारकीर्दीतील, आहे चुकून येथें छापलें गेलें आहे.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 49] [21-6-1767

पौ छ १७ सफर

श्री

विज्ञापना राजकी वर्तमान तर श्रीमंत जेस्ट वद्य दशमी रविवार आनंदवलीस दाखल होतील. आजी मंदवारी पंचवटिकेचा मुकाम. श्रीमंत रा। माधवराव पेशवे यानी रा। गोविंद सिवराम श्रीमंत दादा साहेबाकडे पाठविले की त्याजला परभारा पुण्यास घेऊन येणे. श्रीमंत दादासाहे (बा) चे विचारास न आले. आनंद-वलीस आले. रावसाहेब येतील यैसे दिसते. चित शुध नाहीं. ते हे येक जाहाल्यावर काय ठरत तोहि दरबार अर्जिविली पाहिजे. सर्व सरदाराची सूत्रे रावसाहेबाकडे आहेत. रावसाहेबाची पत्रे सर्वास गेली. त्यानी मायेत सर्वास घेतले आहे. रा। गंगाधरपंत तात्या रा। तुकबास आज्ञा देऊन (?) आपण याजसमा-गमे तापीपावेतो आले. तेथून दादासाहेबाची आज्ञा देवदर्शनास जातो म्हणून आज्ञा घेऊन गेले. ते रावसाहेबाची भेटी घेऊन, त्याचे मानस ध्यानास आणून त्याचे समाधान द्रव्यद्वारा करून, मग माघारे जावे या अर्थे आले आहेत. भेटी जाहल्यावरी मागाहून सर्व लिहू. आजी वर्तमान आले की, रावसाहेब टोक्या सिंव्हस्ताकरिता आले आहेत. तेथून मागती पुण्यास जाणार. लेख कोठे आला नाही. रावसाहेबाची मुल्खगिरी उतम प्रा। जाहली. दादासाहेब आनंदवलीस गेल्यावरी काय विचार करितील पाहावा. गायकवाड भेटीस न आला. रुा। पाठविले नाहीत. म्हणून त्याच्या मुलकाची जप्ती करणार. दबाव टाकिला आहे. माधवराव बांडे व सकाराम हरी याजला जप्तीचे काम सांगणार बोलतात. निश्चये जाहाला नाही. आम्ही निरोप नानासाहेबास मागितला. बहुत श्रमी तुम्हावरी. परदरबार खर्चाचे रुा। आवचितराव याजपासी पाठविले. त्याने आम्हांस न पुसता दिल्हे. आम्हांस मागती देणे आले. कोणकोणते गुणाणवाद सांगावे. तुम्ही आपले पोट तरी भरा. आम्हास काही देऊ नका. बहुत बोलिले. तैसेच मातुश्रीची आज्ञा घेतली. त्यांचा क्रोध पत्री लिहिता पुर्वत नाही. भेटीनंतर निवेदन करू. वडिलापेक्षा त्याचा क्रोध पाहिला. येदा मामलत वारून रसदेचा भरणा वडिलाचे मारफतेने करावा. यैवज वडिला-पासीच पाठवावा. मामलतचा बंदोबस्त करून वडिलाची भेटी घेऊन, त्याचे मनातील किलमिश काहाडावे; त्याचा आसिरवाद घ्यावा. मामलत न करितां अल्प किमपिहि शोभा नाही हे आपलेहि मन जाणते. धाडधाकडा होऊन जे

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

करणे ते त्वरने करावे. ताकीदपत्रे चौ पाचा दिवसात घेऊन पाठवितो. दुसरा कोन्ही शाहाणा इतबारी मातबर पाठविला पाहिजे. येकास येक बोलावयासी कितेक कामकाज पडल्या पाहिजे. आमची असामी वकिलात पडली याजकरिता लिहिले आहे. उतर अक्षरशा ध्यानात आणून लिहिले पा. रा चिंतो विठल याचे पाच हजार देणे ते दिल्हे. (पुढील एक बंद गाहाळ. या बंदाच्या कडाकोपऱ्यास पुढील मजकूर आहे.) त्यावरून लिहिले आहे. तर जैसे आसेल तैसे उतर लिा. तात्याची कृपा तुम्हावरी आहे, तैसी चितोपंत दादाची आहे. दादानी तुम्हावरी शंभराची चिठी केली, ते रुा जरूर द्यावे. हे विज्ञापना.

¶*A mutilated news-letter describing the attitude of Raghoba after his defeat by Madhaorao and the strained relations between them.*

No. 50] [*27-6-1767*

पो छ १६ सफर

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य

राजश्री विश्वासरावजी स्वामीचे शेवेसी

पोष्य बाजी गोविंद सां नमस्कार विनंती. येथील कुशल ताा छ २२ मोहरम पावेतों मुाा वण पाा मजकूर वर्तमान येथास्थित असे विशेष. अलीकडे पत्र येऊन वर्तमान कळत नाहीं तर ऐसे नसावें. हरघडी पत्र पाठऊन संतोषाचे वर्तमान ल्याहावें. वरकड इकडील वर्तमान तर श्रीमंत देशास आले. छावणी आनंदवलीस करावी हें मानस आहे. श्रीमंत रावसाहेबहि हैदर नाईकाचे खंडणीचा गुता उरकून पुण्यास आले. आपणाकडील मामलतीचा रसदेचा साल मजकूरचा ठराव राजश्री अवचितरावजी व गोंविद रघुनाथ याचे विद्यमाने करारमदार होऊन आलाहिदा सनद सरकारची आहे त्यास सरकारांत ऐवजाची ओढ आहे, याजकरितां निकडीनें ततूर्द करून कराराप्रमाणें ऐवजाचा भरणा होऊन येई ते करावे. जर आपण ऐवज पाठवावयासी दिसगत लावितील तर मामलत परिछिन ठेवण्याची मर्जी श्रीमंताची नाहीं. येविसी तपसिलें गोविंद रघुनाथ लिंहितील त्यावरून कळेल. हर तरतूद करून आधी ऐवज पाठऊन द्यावा. बहुत काय लिहिणे. लोभ असो दीजे हे विनंती.

पोष्यांकित माहादाजी नारायण परचुरे कृतानेक सिरसाष्टांग नमस्कार विज्ञप्ति विशेष. वर्तमान पूर्वी पत्रावरून शेवेसी श्रुत जाहले असेल. श्रीमंत राजश्री बाजीपंत आणा याणी आमचा बहुत सांभाळ केला. घरी खर्चास बेगमी करिती. आपण

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

सेवकावरी कृपा करून माफ माहलीचे वतनाचा ऐवज राजश्री आणास प्रविष्ट करावा. सेवेसी बहुत काय लिहावे. सेवक पदरींचे असो. कृपा निरंतर असो दिल्ही पो. हे विज्ञाप्ति.

¶*Baji Govind to Vishwasrao (Laxman) requesting immediate payment of the dues agreed upon by the addressee; otherwise the Peshwa would get offended.*

No. 51] [*1-7-1767*

पौ छ २४ रौवल

श्री

राजश्रियांविराजित राजमान्य राजश्री
विश्वासरावजी स्वामीचे सेवेसी

पो त्रिंबकराव सिवदेव कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल तागाईत आषाढ शुध्ध पंचमी मुकाम मौजे वोढे पाा नासिक वर्तमान येथास्थित जाणून स्वकीये कुशल लेखन करीत असिले पाहिजे. विशेष. स्वामीनी कृपाकरून बहुतां दिवसीं स्मरणपूर्वक सांभाळपत्र पाठविले ते वांछितकालीं पाऊन दर्शनातुल्यें संतोष होऊन लिहिले वर्तमान सविस्तर अवगत जाहाले. इकडील वर्तमान श्रीमंत कर्नाटकातून पैठणास आले. सिहस्थविध करून पुण्यास गेले. श्रीमंत राजश्री दादासाहेब ज्येष्ठ वद्य दशमीस आनंदवलीस दाखल जाहाले. उभयेतां श्रीमंताच्या भेटी हा कालपर्यंत जाहाल्या नाहींत. जें वर्तमान नवल विशेष होईल तें मागाहून लेहून पाठऊं. बादबरसात हिंदुस्थानांत फौजाहि येतील. सर्वाचीं पारपत्येंहि उत्तम प्रकारें होतील. वरकड सविस्तर अर्थ राजश्री गोविंद रघुनाथ लिहितील त्यावरून कलो येईल. आम्ही काही स्वामीविरहित नाहीं. आम्हांयोग्ये काजकाम असल्यास लिहीत जावें. अधिकोत्तर लेखन करावें तरी उपरोधिक असें. बहुत काय लिहिणें, लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Trimbakrao Shivdev Odhekar writes to Vishwasrao Laxman of Zansi that the Peshwa had just returned to Poona from Karnatic but, till then, no interview had taken place between him and Raghunathrao who was at Anandvalli.*

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 52] [*27-7-1766*

श्री

राजश्री सेऱ्याजी आइतोले गोसावी

यांसी

ॐ अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्री रघुनाथ बाजीराव आसीर्वाद. सुा सबा शितैन मयां व अलफ. तुम्ही विनंतीपत्र छ १२ मोहरमचे पाठविले ते प्रविष्ट जालें. त्यांत खुलासा कीं श्रीमंत राजश्री रावसाहेबानी नारो कृष्णावर इत्राजी करून पारपत्यास मल्हार जगजीवन पाठविले ते येत आहेत. पुढे काही गाडदी आले म्हणोन ऐकिले. त्यास जाजती सिबंद ठेवणे लागले. मोल्हेरीवरहि राऊसाहेबी इत्राजी केल्याची बातमी आहे, तेव्हा सावध न होता परिणाम कसा लागेल. सावधच आहे. चिंता नाही. राऊसाहेबी पत्रे पाठविली त्याच्या नकला पाठविल्या आहेत. पुढे आज्ञा करणे ते करावी म्हणोन लिहिले ते कलले. ऐशास खासा स्वारी लांबली, यास्तव नारो कृष्णानी आपले मतलबाकरितां चिरंजिवाचेच होऊन राहावयाचे होते. दाहा वीस हजार तोटा आला असता तरी चिंता नव्हती. पुढे खासा स्वारी देशी येती तेव्हा जशी अशेर मुल्हेर वगैरे किले खासगीखाली आहेत तसे शहरहि खासगीखाली ठेवावयाचे मनांत होते परंतु मारनिलेनी तसे न केले. हाली येविसीची पैरवी हालीं हुजरून व्हावी तर सध्याच ग्रहकलह होणार; जाला म्हणजे मातबर पेच पडोन बहुत नुकसानी होऊ सकणार. याजकरिता शहर द्यावे हे उचित जाणोन नारो कृष्णाकडे पत्रें व खिजमतगार पाठविले आहेत त्याचे अबरूस ढका न लागावा येतंनिमित्य चिरजिवासहि लिहिले आहे. अबरूस चिंता नाही. कदाचित् अबरूपर्यंत गोष्ट येऊन पोहचणार, तेव्हा शहरांतच राहून बरे म्हणवावे हे जर ठीक असिले आणि मारनिलेत हिंमत असिली तरी तसेहि करावे; परंतु आमचा पुस्तपन्हा आहेसा कोणास कलो न देता जसे चिरंजिवानी पुरंधरचे आंत येक व बाहेर जाहिराणा येक दर्शविला होता तसें करावे. परंतु खासा स्वारी चैत्र वैशाखांत देशी येई तोपर्यंत सिबंदीचा खर्च भारी बसेल तो संभाळून कोणी जुजावयास येईल त्यासीं पुरीं पडोन दंम धरून राहातील ऐसा हिया व खातरजमा असली तरी तैसे करावे. परंतु आमचे आंग येकंदर न दाखवावे. खासा स्वारी देशीं आलियावर काही चिंता नाही. शहर खासगीकडे ठेविलें जाईल. तुम्ही नारो कृष्णाची कुमक केली आणि

सांव-
पंकजलीनस्य
मुद्रेयमपराजिता।
बाजीरायतनूजस्य
रघुनाथस्य राजतां।

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

जाहिराणा जाला तरी आम्हीच आज्ञा केली ऐसे होईल. उघडच अर्थ आहे. ते बहुतच फटकाळ. जाहीराणां न होतां, गुप्त कुमक केलीत तर कार्यास येईल; परंतु चिरंजीव बातमी बहुत राखितात. ते सांभाळून गुप्त कुमक होईल तर करणे. फौज आली तिजला सामील व्हावे म्हणौन चिरंजिवानी तुम्हास लिहिलेच आहे. त्यास सामील न जाले तर ठीक नाही, यास्तव सामील बाह्यात्कारी होऊन चिरंजिवाची मर्जी राखणे. गुप्त प्रकार निराळाच करणें; नाहीं तर नारो कृष्णाची कुमक न करणे; व त्याचे फौजेसहि सामील न होणे. उगेच किल्यावर बसणे; परंतु नारो कृष्णास लिहिल्याप्रो हिया असिला, दंम धरून राहावयाचें सामर्थ असिले, तरच करावे; नाही तर शहर चिरंजिवाचे स्वाधीन करून खासा स्वारी देशीं येई तोपर्यंत माारनिलेनी नासिकास जाऊन राहावे. ह्या पत्राची नकल लेहून नारो कृष्णाकडे गुप्त पाठऊन त्याजला दाखऊन पुन्हा आपल्याजवळ आणून ठेवणें. हे पत्र फारच गुप्त ठेवणें. कोणांस न दाखवणे. नारो कृष्ण +याणी चिराजिवाची मर्जी रक्षून शहर युक्तीने रक्षावयाचे होते; परंतु गोष्ट तसी न केली. फाईस (?) केले येणे करून चिरंजिवास विषम दाटून तगीरी केली. येथून कुमक करावी तरी ग्रहकलहामुले मागे नास जाहाले, दौलत खराब जाहाली, तसी पुढे होणार, यास्तव तूर्त शहर हवाली करावें हेच उतम आहे. त्याचे आबरूस धका देऊ नये येविसी चिरंजिवास लिहिले आहे. देणार नाहीत. तुम्हास सविस्तर कलावे, सबब लिहिले असे, जाणिजे छ १९ सफर ×

लेखना
वधि

¶*Raghunathrao to Setyaji Aitole, ordering him to request Naro Krishna to hand over the town of Burhanpur to the Peshwa. The latter half of the paper proves how Ragoba was artfully contriving to make difficulties in the way of the Peshwa.*

No. 53] [*24-7-1767 ?*

श्रीगजानन.

सेवेसी बापूजी कृष्ण साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल ताा छ २७ सफर मुकाम शुक्लेश्वर येथास्तित आसे विशेष. सरकारवाड्याचे काम च्यार दिवाली व चौसोपी व घर व बंगले इतके आज्ञेप्रमाणे काम सिध जाले. पुढें

\+ यापुढील मजकूर खाशाच्या हातचा.

× हें पत्र ४२ नंबरच्यें पत्राआधीं वाचावें.

1819

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

पुण्यास यावयाची आज्ञा जाली पाहिजे म्हणौन येथे आहो. किरकोल आठा चौ दिवसाचे काम आहे. ते इतक्यात होईल. पुढें काम तूर्त नाहीं. याजकरिता पुण्यास यावयाची आज्ञा काय ती करावी; त्याप्रमाणे करू. श्रीमत राजश्री दादासाहेब या मार्गे करून आनदवलीस गेले. वद्य १० मगलवारी येथे स्वारी आली. श्रीमंतानी वाडा सपूर्ण हिंडून पाहिला. दुसरे दिवसी प्राथकालीं भोजन येथेच करावे यैसी श्रीमंताची मर्जी होती. भोजनाची तर्तूद करणे म्हणौन आज्ञा केली होंती. मागती दिकत निघाली की, वास्तुशाती जाली नाही. यामुळे तो मनसुबा राहिला. त्यास मातबर इमारत. प्रथम काम जाले त्या तागाईत वास्तुशाती नाही. यास्तव सूचनार्थ लिहिले आहे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*This appears to refer to the building of the palace of Raghunathrao at Kopargaum.*

No. 54] [*24-7-1767*

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री

सदासिवपंत स्वामीचे शेवेशी

पो कासी बलाल सां नमस्कार विनंती. येथील कुशल ता छ २७ माहे सफरपर्यंत यथास्तित जाणून स्वकीये कुशल लिहीत असिले पाहिजे. विशेष :— श्रीमंत राजश्री दादासाहेबाची स्वारी अजनेरीहून श्रीत्रिबकास येणार, म्हणौन आइकले. येशास अजनेरीस मुकाम कितीक होणार? साहित्य जाले पाहिजे. श्रीत्रिबकेश्वरी तो साहित्याची तरतूद जालीच आहे. परतु अजनेरी येथे वस्ती मोडकी आणि पर्जनकालचे दिवस. आइत्ये वेलेस सरजाम होणार नाही. याकरितां सूचनार्थ लिहिलें आहे. तर अजनेरीस साहित्याची तरतूद करावी की काय? अजनेरीस त्रिबकास मुकाम किती होतील? सविस्तर लिहिले पाहिजे. आपणास आबे सुमार १०० शभर डाली भरून पाठविली आहे घेऊन उतर द्यावे. बहुत काये लिहिणे लोभ करावा हे विनती.

¶*Kasi Ballal to Sadashivpant communicating the inconvenience that Raghoba would feel at Ajner if he were to stay there in the rains.*

No. 55] [*27-8-1767*

पो ४ जोवल

श्री

सेवेसी विज्ञापना. ता छ २ राकर त्रितीय प्रहर क्षेम असे. स्वामीनी पत्रें माझीं व लोकाची पाठविलीं तीं पावलीं; परंतु पाचा रोजीं पावलीं. यावरून

1820

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

संदेह पडला कीं जासुदानीच दिवसगत वाटेस लाविली किंवा तेथें कागद तयार होऊन जासुदाजवळ द्यावयास दिवसगत लागत्ये. याजकरितां रवानगीची तेरीख लाखोट्यावर ल्याहावयास आज्ञा केली पाहिजे. पुणेंयाहून दिडा दिवसांत कागद यावा तें कांहीच नाहीं याजकरितां विनंती लिहिली आहे व येथील प्रकार तर तेथून साहुकार येऊन यैवजाची विल्हे होईल तेव्हां किल्याच्या चिठ्या हातास येतील. कळावें; येव्हां येकहि मनसबा पुढील समजत नाहीं. याजउपर कळेल तो सेवेसी लिहीन. येथें लस्करावर प्रजन्य भारी आहे. सेवेसीं श्रुत व्हावें. राजश्री नारो शंकर निरोप घेऊन रामसेजेस गेले; परंतु फिरोन खालीं यावयास दिकतीची गोष्ट सांगोन वरतेच राहिले. त्याचे मानस कीं आपला कोणी न जावें असें आहे; परंतु येथून कसें होईल पाहावें. यापुढें होईल तें सेवेशीं लिहीत जाईन. पकें वृत्त याप्रमाणें ठरलें. श्रीमंत राजश्री दादासाहेबांनीं श्रीमंत रावसाहेबास द्यावे.

१ तालुके सातारा, १ चंदन, १ ताथोडा, १ नगर, १ तालुके सिवनेर सारे किले सुद्धां, १ किले आशेर.

येणेंप्रमाणें त्याणी द्यावे व रावसाहेबीं त्यास ज्याजती पेशजीचे त्रिंबक व धोडप मुल्हेर वगैरे आहेत त्याखेरीज तालुके कावनई व भास्करगड येणेप्रमाणें व दाहा लक्षाचे भरतीची जाहागीर व किल्याचा सरंजाम याप्रमाणें ठरलें आहे कळावें. यापुढें होईल तें सेवेसीं लिहिन. श्रुत होय हे विज्ञापना. सरकारचा लाखोटा पावता करितों हे विज्ञापना.

सेवेसीं माहादाजीं विश्वनाथ लिमये साष्टांग नमस्कार विज्ञापना. इकडील सविस्तर राजश्री बाबूरायानी लिहिलें आहे यावरून विदित होईल. मी पांच सात पत्रें पाठविलीं परंतु स्वामीनी कृपा करून येकाहि पत्राचें उत्तर पाठवावयासी आज्ञा न केली ऐसें न करावें. सदैव पत्रीं सेवकाचा सांभाल केला पाहिजे, पदरीचा असे. अवकृपा कां ती कलत नाहीं. असो, दैव आमचे ! ईश्वर इच्छा प्रमाण हे विज्ञापना.

¶*Negotiations going on between Raghunathrao and Madhaorao on the question of the former delivering up certain forts.*

No. 56] [*13-9-1767*

श्री

सेवेसी विज्ञापना. ताा छ १९ रााखर क्षेम असे विशेष. कटोरे याचे पूर्वेस मुक्काम आहे. उभयतांचा मुदपाक एक आहे. अद्याप कांहीं बोलणें जाहलें (नाहीं).

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

श्रीमंत राजश्री दादासाहेबाचा विचार जे जे बोलणे ते तुम्हाकडील जे विश्वासू व राजश्री बापू अगर (राजश्री) गोविंद शिवराम याणी आम्हापाशी बोलावे. आणि श्रीमंत रावसाहेबाचा विचार तर जे बोलणे ते रुबरु उभयतां श्रीमंतांनीं बोलावे. असा मजकूर रावसाहेबाचे चित्तांत आहे. दादासाहेब म्हणतात जे, रुबरु जाहाल्यानें मजा राहणार नाहीं. रावसाहेबाचा आग्रहच आहे कीं, मध्यस्त कोणी नसावा. त्यावर आज उभयतांनीं बोलावें याप्रमाणें निश्चयात आहे. दोहो तिही ग्रहस्ताकडे आज्ञेप्रमाणें जाऊन पुसिले, ते म्हणतात जे, एकहि ठीक नाहीं. आज कांहीं बोलणें जाहाले म्हणजे सांगूं. याप्रो आहे. आज्ञा कीं, दिनचर्येंचे वृत्त लिहावे, त्यास जसे असेल तसे लिहीन. गंगोबा येथून दोन कोशावर राहिले आहेत. चांदवड प्राांयांत हल्लींचा मुक्काम आहे. ताकीदहि मुलकात नाहीं. दादासाहेबाचा राग त्याजवर आहे याजकरितां तेहि दूरच आहेत. मग पहावे. राजश्री नारो शंकर याची व श्रीमंत रावसाहेबाची अद्याप भेट नाहीं. प्रथम भेटी समई त्यास दादासाहेबी बलाविले नव्हते, त्याजवर त्याणी येऊन भेट घ्यावी ते न जाहाले. त्यावर राजश्री गोपालराव गोविंद याणी मधस्ती करून उद्यां रावसाहेबाची भेट घ्यावी याप्रो जाहाले आहे. लौकिकांत आइकणियांत आहे जे सुध्धा[१] प्रकार होईल असे नाहीं; परंतु आज उद्यां काय ते निश्चयांत येईल. मग सेवेसी लिहीन. राजश्री सखारामपंतबापू कटोरे (अपूर्ण).

¶*A mutilated news-letter addressed probably to Nana Fadnis describing the overtures that were being made to adjust the dispute raging violently between Peshwa Madhaorao and his uncle. The handwriting suggests the writer to be Baburao Krishna Apte.*

No. 57] [*14-9-1767*

पौ छ २२ राखर सन समान

श्री

सेवेसी विज्ञापना. ता छ २० राखर क्षेम असें विशेष. आपलें आज्ञापत्र आलें तेथें आज्ञा कीं, फार दिवसगत लागली. श्रीमंतांची आज्ञा होती तर लवकर जातेत यैशास माझी वळख श्रीमंतांपाशीं नाहीं. सर्व प्रताप आपल्या पायाचा आहे. वलखहि होऊन मला कोणी अधिकोत्तर दिल्हें नाहीं स्वामीची मर्जी मात्र मला रक्षणें. इकडील बातमी वरचेवर स्वामीस पोहोंचविलीच आहे; आणि स्वामीची मर्जी खटी आहे. असो. मर्जी रक्षूनहि अवकृपा होते. याजउपर सेवकाचा उपाय

---

१ सुधा=सरळ.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

काय ? आपण श्रीमंतास पत्रें लखोटे दोन पाठविलें तें पावतें केलें. वड्याळाचा जाब उद्यां पाठवितों अद्यापपर्यंत कांहीं बोलणें झालें नाहीं. आपणाकडील राजश्री तात्या मात्र जाबसालांत आहेत. तेहि निश्चयाचा मजकूर कांहीं सांगत नाहीं. मर्जीप्रमाणें वांट उतरोन व्हावें असें दिसत नाहीं. तिकडील कारभारी याचेंहि गणांपुढें चालावयाचेंहि डौल दिसत नाहीं. आज्ञेप्रमाणें सर्वांकडे जातच असतों परंतु निश्चय जाहाल्याविना समजत नाहीं. डेरे मात्र येक जागां आहेत. राहाणें शेझारीप्रमाणे आहे. निखालसतां नाहीं, कांहीं बोलणेंहि जाहालें तरी रुष्टपणांतच आहे, पक्कें जाहाल्याखेरीज काय ल्याहावें ? येथून स्वामीस सर्वाचीं पत्रें जातच आहेत. परंतु आढलेल गोष्ट ती वरचेवर लिहीन. सकारनामक कान पाडून आहेत. उभयतां श्रीमंतांचा चित्तशुद्ध दोघांचीच गांठ पडल्यास सुधी आहे. परंतु गांठ सुटल्यावर मग ठिकाणीं बुद्धी वडिलांची राहूं देत नाहीं. मी कचें वर्तमान सेवेसी लिहितों. यांत कांहीं कम जवाद (?) ही येतें. सेवेसी विदित व्हावें हें विज्ञापना.

¶*News-letter (by Baburao Krishna) describing the struggle between Madhaorao and his uncle Raghoba.*

No. 58] *[15-9-1767*

पो छ २८ रविलाखर

सन समान

श्री

सेवेसी विज्ञापना. ता. छ २१ राखर दोनप्रहर क्षेम असे. यानंतर आज मंगळवारीं श्रीमंत राजश्री दादासाहेब याकडील पक्ष जाहला. पक्षाचे दिवसीं कारभार न जाहला. व त्याचा नियमहि जाहला आहे; सोमवारीं कांही कारभार करू नये. याप्रमाणें कालचा दिवस गेला. याजउपर काय निश्चय होईल तो लिहीन. राजश्री बापूकडीलहि पक्ष कालच जाहला. ते कटोरियासच आहेत. लस्करांत येऊन जाऊन असतात. व उभयता श्रीमंत एके जागा जाहल्यावर थोरला स्वयंपाक दोनरोज एकेजागा जाहला. सामान दादासाहेबाकडील. तिसरे दिवसीं वाकनीस श्रीमंत रावसाहेबास पुसावयास गेले त्याणी दादासाहेबाकडे पाा. ते बोलिले जे, पहिले चालते त्याप्रमाणेच करावे. त्यावरून विभक्त स्वयंपाक होऊ लागले. कळावे; व आज बाजारी आइकणेयात आहे जे, सातारा, नगर, सिवनेर त्याणी द्यावी. त्यांसहि मोबदला याणी कांही द्यावें. त्या ऐवजी सोलापूर द्यावें असी ध्वनी आहे. निश्चयांत येईल ते खरें. सकारनामकाचे बहुतसे

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

मन कारभारात दिसत नाहीं. आज्ञेप्रमाणे पुसावयास गेलो तर निश्चय जाहल्या खेरीज काय सांगावे ? असे म्हणतात. कळावें. राजश्री गोपाळराव व राजश्री गोविंद सिवराम व राजश्री मोरोबादादा ऐसे एकविचारात आहेत; ऐसे आइकण्यांत आहे. सकारनामक याचे मतें या कारभारांत नसावें. परंतु दादासाहेबांच्या बोलण्यात आहे कीं, मला बापू बुडीवणार नाहीं. यांत काय अर्थ तो स्वामीनी समजावा!! दिनचर्येचे वृत्त सेवेसी लिा आहे. ठराव होईल तो खरा. घड्याळाचा मजकूर तर येथूनच घड्याळ पाठवावे असे जाहले आहे. जर मिळाले तर पाठवितो. नाहीतर उत्तर घेऊन पाठवितो. व एक तरवारहि निजामअलीकडे पाठवावयाविसी आपणाकडे श्रीमतांही पाठविलीच आहे. ती पावलीच असेल. उद्यां होईल ते लिहून पाठवीन. बारीक मोठे वृत ल्याहावे लागतें. स्वामीची आज्ञाच आहे तेथे कागद वेगळे वाटेने ठेवावे. दरबारी रुमाल राजश्री नारोपंताजवळ असतो त्यात न ठेवावे. रिकामी पंचाईत पडेल. सूचनार्थ विज्ञप्ती लिा आहे. मला स्वामीची आज्ञा ते प्रमाण. चाकरी एकनिष्ठेने करितो. जे घडेल ते घडो. हे विज्ञाप्ति.+

¶*The paper discloses the efforts that were made to effect an adjustment of the quarrel between the Peshwa and his uncle.*

No. 59] [*17-9-1767*

पौ छ २९ रबिलखर

श्रीहरी

सेवसी विज्ञापना. छ २३ राखरीं पत्रे सेवेसीं रवाना केलीं; तीं पावलींच असतील. त्यांस तेविसावे तेरिखेस फारच गडबड पडिली होती. मग सखाराम बापूनी मध्यस्त पडोन उभयतांसहि समजून सांगितले. पहिल्या बोलण्यांत श्रीमंत दादासाहेब बोलिले कीं, सातारा, नगर, सिवनेर, धोडीप, वगैरे खेरीज त्रिंबक, मुल्हेर, आशेर व किरकोळ बारा ठिकाणें आम्हांकडे राहूं देणें. वरकड तुम्हांस देतों. त्यावर श्रीमंत रावसाहेबानी परिछिन नाइकिलें. तेव्हां दादासाहेबहि बिथरले. तेव्हां प्रथम भेटीचे वेलेस करार होता कीं, जर उभयतांचें न बनलें तर दादासाहेबानीं आनंदवलीस जावें आणि रावसाहेबानीं पारनेरेयास चालीस कोश या ठिकाणाहून जावें; असा होता. त्याप्रमाणें करावें असें काल ठिकाणी ठरलें.

+ माधवराव व रघुनाथराव यांच्या भांडणाची तडजोड चालू होती, त्या वेळचें पत्र नाशकाहून पुण्यास.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

परंतु गंगेचा उतार मोडला. तेव्हां रावसाहेब बोलिले कीं, आम्ही चांदवडचे रोखें चालीस कोश जातों. आपण आनंदवलीस जावें. मग ज्याचे कपालीं राज्य असेल त्याणें करावें. हेंच काल सकाळा ठरलें होतें. उपरांत मध्यस्तांहीं उभयतांसहि निक्षूणपणें सर्व कारभारीहि मिलोन रात्रीं मध्यरात्रपर्यंत जागत बसोन निश्चय केला जे, कलह करूं नये. रावसाहेबांसहि बहुत प्रकारें सांगोन ठरविलें जे, त्रिंबक, धोडप, मुल्हेर, आशेर हीं मात्र ठिकाणें दाहा लक्षाची जागीर दादासाहेबांकडे रहावी. वरकड सर्व देखील हिंदुस्थान गुजराथ सर्व याचा बंदोबस्त श्रीमंत रावसाहेबीं करावा. दादाहीं स्वस्थ राहावें असें रात्रीस निश्चयांत मध्यरात्रीस आले. तेव्हां मुकाम करावा असें ठरलें. आणि छ २४ तेरिखेस मुकाम जाहला. याप्रो आज प्रात:कालीं कलतांच सेवेसी विनंती लिहिली व राजश्री कृष्णरावजीनी याच प्रमाणें आज प्रात:कालीच ठरलें; यैसे सांगितलें. कलावें. हा ठराव राजश्री गोविंद सिवराम वगैरे मुत्सदी याच्याने ठराव प्रथम नच जाहला. मग सर्वांस बापूनी घेऊन हा प्रकार केला. कलावें. यप्रो जाहलें. याजउपर जें होईल तें लिहीन. आशेर किला रावसाहेब मागतच आहेत. परंतु तो न दिल्हा तरी तुटावयाचें दिसत नाहीं. विदित व्हावे. भेटीसमईचें वृत्त दिसगत लागोन न पोहचलें म्हणून स्वामीची इतराजी जाहाली. त्यास स्वामीचा सेवक चाकरीस चोर व्हावयाचा सर्वथैव नाहीं. काम जसे ज्यासमइ असेल त्या समईं आम्ही धनी आज्ञेखेरीज घेणार नाही. आलीकडे स्वामीची आज्ञा काहींच न आली. अवकृपेतच असलों तर मग स्वामीकार्य पुर्ते करून उत्तर प्रांत पाहाणें लागेल. स्वामीपासून कांहीं लौकिकी ऊर्जित करून घ्यावे असा हेत आहे. आणि प्रालब्धानरूप इतराजीत आलों. ईश्वरस्वरूप आपणच आहेत. असो. श्रीमंत रावसाहेब निजतात तेथें पलंगाजवल राजश्री गोपालराव गोविंद निजत असतात. कलावे. वगैरे सिलेदार पाटणकर व मोठे मोठे पनास साठ आसामी असतात. कलावें. हें पत्र आज छ २४ राखरचें असे. सेवेसी श्रृत व्हावें हे विज्ञापना. सर्व ठिकाणे रावसाहेबांकडे जाहालीं. यैसें जाहल्यावर मग श्रीमंत दादासाहेबाचे स्वारीचें कर्ज असेल ते वारावें असेहि आइकणियांत आहे. आज तिसरे प्रहरीं पका निश्चय व्हावयाचा आहे. तो कलल्यावर लिहीन हे विज्ञापना.

श्री

पुरवणी विज्ञापना

सविस्तर विनंती लिहिली आहे या प्रो जाहल्यावर मग उभयतांनीहि आनंदवलीस जावें असें आहे, विदित होये, कुरणाच्या कामावर तेथें सदाशिवपंत

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

ठेविले आहेत. त्यास बाबाजी मोऱ्या कांहीं लबाडी करितो ; म्हणून त्याणी मला लिा आहे. आपण त्यास ताकीद करविली पाा बेकैदी वर्तणूक आम्हांकडे नाहींच. मग उगीच लबाडीत कारण काय ? हे विज्ञापना.

¶*News-letter to Poona describing the terms of adjustment arrived at in personal discussion by Madhaorao and his uncle owing to the mediation of Sakharam Bapu who composed the dispute.*

No. 60] [*18-9-1767*

पौ २७ रबिलाकर

प्रहरात्र सुा समान

श्री

सेवेसीं बाबूराव कृष्ण साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ २४ राखर दीड प्रहर रात्र आवसीची. क्षेम असे. विशेष. आज सकाळा पत्र सेवेसी पाा तें पावलेंच असेल. हलीं राजश्री मोरोबा दादा यांहीं लाखोटा दिल्हा; तो रवाना केला आहे. संध्याकालचा निश्चय ठरला नाहीं. परंतु श्रीमंत राजश्री दादासाहेबाची राहुटी आज दोन प्रहरीं मुहूर्तेंकरून कटोरियास दिल्ही आहे. कावनई च्यार किले व धोडिप तालुका व त्रिंबक इतकीं मात्र त्याकडे ठेवावीं आणि त्याणी स्वस्त असावें असेंच ठरत आहे. वरकड स्थलें हस्तगत होत तों उभयतां श्रीमंत येकत्रच असतीलसें दिसतें. व श्रीमंत रावसाहेब दादासाहेबास घेऊन पुणेयास येणार असाहि डौल आहे. विदित व्हावें. डाकेची याद मागेंच पाा आहे. डाक दाहा कोशावर बसत आली आहे. दोन तीन जोड्या आणखीं असल्यावर लवकर कागद पोहचतात. तेथून आल्या तरी उत्तम. नाहींतर येथून घेऊं. आपली आज्ञा असेल त्या प्राो करीन. सेवेसी श्रुत होये. हालीं सर्व बोलण्यांत राजश्री बापू. त्यामागून राजश्री गोविंदराव तात्या असे आहेत. यथाबुधीनें शोध करून लिहित आहें. श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Baburao Krishna to Nana Fadnis : sends news of the negotiations between Madhaorao and his uncle.*

No. 61] [*19-9-1767*

पो छ २८ रबिलाखर

सनसमान प्रहरात्र

श्री

सेवेसी बाबूराव कृष्ण विज्ञापना. ताा छ २६ राखर क्षेम असे. विशेष. काल छ २५ रबिलाकरीं कराराच्या यादी ठरावित होते. सारांश ठरावांत आलें जे,

1826

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

वीस ठिकाणें श्रीमंत राजश्री दादासाहेबांकडे व पेशजींचे जागिरीखेरीज पांच लक्षाची जागीर द्यावी. किले वीस तालुके धोडाप, कावनई, त्रिंबक, मुल्हेर मिळोन वीस ठिकाणें द्यावी व हालीच्ये स्वारींचें कर्ज व खासगीचें असेल तें वारावें आणि गुजराथ, हिंदुस्थान, वरकड सर्व कारभार श्रीमंत रावसाहेबांहीं करावा. येणेप्रो यादी परस्परें काल लिहिल्या. यैसें आहे. करार * * * आहे. व श्रीमंत दादासाहेबीं आनंदवलीस राहावें व श्रीमंत मातुश्री बाईनीं * * पुरीं राहावे. श्रीमंतांहीं स्वारींहून * * जेव्हां आनंदवलीस यावें (तेव्हा) दादां साहेबाचे पायावर डोई ठेऊन, मोसबा (मनसबा?) सर्व विदित करावा. हें सर्वहि समजाऊन निश्चयांत आणिलें. उभयतांहि आनंदवलीस जाऊन मग तेथें दसरा करून पुढें जावें; असें ठरत आहे. सर्व कामें स्थलें हस्तगत होत तों कांस सोडितां नये. कळावें. बहुतकरून रावसाहेबीं येकांतीच प्रथम भेटीपासून तीनच्यार वेल गांठ घातली. उपरांत मध्यस्तहि पडले. फार मेहनत बीते[1] बसावयास लागली. कलावें. स्वामीचे आज्ञेप्रो सर्व ठिकाणी व बारिक बारिकहि शोध करून विनंती लिहितच आहें. कृपा करणार स्वाम आहेत. येथूनहि सरकारचें व लोकांचें अगत्यवादाचे कागद श्रीमंत रावसाहेब व राजश्री मारोबा दादा देतात. ते स्वामीकडे रवाना करीतच आहे. हालीं येक लाखोटा सरकारचा व येक वो राजश्री बाबा वैद्य याचा लाखोटा श्रीमंतांहि दिल्हा तो सेवेसीं रवाना केला आहे. मला आज्ञापत्र वरचेवर आलें पा। व तेथून लाखोटा रवाना होईल त्यावर रवानगीची तेरीख लिहिवली पाहिजे. म्हणजे येथें किती रोजांहीं कागद पावतो तें कलेल. स्वामीचे चरणासिवाय दुसरें जाणत नाहीं. राजश्री भिकाजी नाईकहि सागत असतात. डाकेच्या जासुदानी जलद पत्रें पोहचाविलीं तर डांकेच्या जासुदास कांहीं बक्षिस देऊं; या प्रमाणें बोलिलों आहे. विदितं व्हावें. आजच रविवारीं उभयतांचें कूच्य होऊन आनंदवलीस लस्कर गेले कलावें. मलोजीस येथून रवाना केला आहे. हा तलानी ठाण्याने बसवीत आपणापर्यंत येईल. हे विज्ञापना. आज प्रातःकालींच लाखोटा येक सरकारचा आला. तोहि रवाना केला आहे. हे विज्ञापना.

¶*Baburao Krishna Apte informs Nana Fadnis at Poona that the Peshwa and his uncle have proceeded to Anandvalli together.*

---

१ जम.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 62] [28-9-1767

श्रीशंकर

यादी कलमे तीर्थस्वरूप राजश्री दादा-
साहेबाकडील सुाा समान सितैन मया आलफ

भोसले गायेकवाड वगैरे सरदार व कमावीसदार याणी आमचे हिमायेतीनें तुम्हासी वाकडी गोष्ट सागितली आसेल. वर्तनूक वाकडी केली आसेल. ते सर्व माफ करावी. पुढें मातबर आन्याय पारपत्यायौग्य त्याजपासून घडोन आल्यास सुखरूप पारपत्य करावे. मागील आन्यायावर पारपत्य न करावे कलम १

मागील आन्याय चितात आणौन कोनाचेहि वाईट करणार नाहीं. पुढें मातबर आन्याय पारपत्याजोगा जाल्यास पारपत्य आज्ञे प्राा करूं. येणे प्राो करार

होळकरानी लबाडीने परगणे रेवातीरचे वगैरे खराब केल्यास तोटा येईल तो चौपट गुनेगारीचे रुपये त्याजपासून देवावे. कलम

रेवातीरचे वगैरे परगणे यासी होळकरानी लबाडीने खराब केल्यास तोटा येईल तो होळकरास ताकीद करून देविला जाईल व पारपत्यहि केले जाईल. करार

यैवज ठैराऊन मुदतीस बोलल्या प्राा लाऊन द्यावा. कलम १

खासगीच्या परगणियांत सरकारच्या फौजा आथवा सरदाराचे फौजेने वाटेने पायेमालीमुळे तोटा आला तर तोटा भरून द्यावा लागेल. किरकोळी हाजार पाचसे आसिला तर आम्हीच मागनार नाही. मातबर तोटा येक हजारावर जाल्यास द्यावा लागेल. कलम १

खासगीचे परगणियातून फौजाचा मार्गच नाही. तथापि सर्व सरदारास ताकीद की, उपद्रव न व्हावा या विसी होईल. कदापि उपद्रव लागणार नाही. येक हाडेमात्र मार्गावर आहे. त्यासहि उपद्रव न व्हावा. याविशई जैसा बदोबस्त करावयाचा तैसा होईल. तथापि रस्त्यामुळे थोडा बहुत उपद्रव लागल्यास क्षमा करावी. फारच नुकसानी जाल्यास जो नुकसानी करील त्या करवी भरऊन देऊ. येणेप्रा. करार

दमाजी गायकवाड व भोसले व होळकर, सिंदे वगैरे मातबर सरदारांची रवानगी हिंदुस्तानांत केली तरी त्याणी येथील आज्ञा घेऊन जाणे. आनदवलीस येऊन आठच्यार दिवस राहून

1828

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

यैवजास मुदती लाऊन दिल्याच आहेत त्या मुदतीचे मुदतीस यैवज पावता होईल. येणे प्राो करार

खासगीच्या परगण्यांत मोकासी आहेत. त्याची चाकरी येथे घ्यावी. येणे प्रा कलम १

आपणाकडे खासगीच्या मोकाश्यापैकीं शंभर राऊत चाकरी करतील. पेशजीचे यादींत केरोजी पवार दीडसे व बाडे सेंभर योो अडीचसे दिल्हे आहेत. त्यासिवाय खासगीचे मोकाश्यापैकी सेंभर येकून साडेतीनसे स्वार चाकरी करतील. येणे प्रा. करार

पचवीस हाजारांआलीकडे फर्मास येईल ते पाठवीत जावी. कलम

पेस्तर साल सन तिसापासोन सदरहू पचवीस हाजारांचा फरफरमास करीत जावी. प्रविष्ट होईल. येणे प्रा करार

आज्ञा घेऊन जावे. येणेप्रमाणे जाल्यास संतोष राहील. कलम १

हिंदुस्तानातील सरदार रवाना होतील. त्याणी आनदवलीस येऊन आपली भेटी घेऊन च्यार दिवस राहवयाची आज्ञा जाली तर राहून आपली आज्ञा घेऊन जावे. आपणहि त्यांस त्वरेनेच निरोप देत जावा. आपणाकडोन तिलमात्र उपद्रव लागो नये येणे प्रा. करार

दाहा लक्ष रुो सालिना आक्षतमरिष्ट आनदवलीस पोहचत यैसी जाहागीर लाऊन द्यावी. यात उणे कामास नये. माहाल माार व किलेजातची जाहागीर वजा करून येणेप्राा खर्चास पाहिजे. कलम १

माहाल माार खेरीजकरून दाहा लक्षाची जाहागीर निकी लाऊन देऊ. किलेजातची जागीर खेरीजकरून खासगीची दाहा लक्षाची जाहगीर आनदवलीस सदरहू दाहा लक्ष पावतसी जाहगीर नेमून देऊ. करार

खेरीज किले रोजगारी आसाम्या दिल्या आहेत. विना आपराध काढू नयेत. ज्याचे त्याजकडे रोजगार चालवावे. हरामखोर आथवा चोरी आंगी लाविल्यास सुखरूप काढावे. येणे प्रा. कलम १

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

माहाल मारी आसाम्या आज्ञेप्रमाणे
चालऊ. विना आन्याय दूर करणार
नाही. येणे प्रा. करार

यो नव कलमे करार. छ ४ जमादिलावल
आश्विन मास मुा आनंदवली

¶*Terms of agreement arrived at between Raghoba and Madhaorao at Anandvalli where they met for that purpose. The agreement refers mainly to the position of the various sardars who were involved in the affair.*

No. 63] [*Sept. 1767*

(पहिलें पान नाहीं; दुसरें पानापासून आहे).

२

आहे असें दिसतें. मग मनापासून असल्यास तेहि कळेना. परंतु आपण वर्तमान आइकले ते खरेंच. नदी मूळा प्रसिधता. येथे याणी वागवाद याप्रमाणे केला खराच. बारीक मोठे वर्तमान विशेष कांही ल्याहावयाजोगे नाहीं. श्रीमंत रावसाहेब दोन च्यार दिवस गंगापुरास जाऊन राहिले आहेत. थोरले श्रीमंत काल रात्रौ तेथे भोजनास गेले होते. श्रीमंताची मर्जी प्रस्तुत बऱ्यामध्येंच आहे. तुकोजी होळकर यांच्या काल संध्याकाळीं भेटी जाहल्या. राजश्री सखारामपंत काल त्रिंबकेश्वरास गेले. त्रिरात्र राहून येतील. आम्ही आज त्रिंबकेश्वरास गेलो, सातारा हस्तगत जालियाचें वर्तमान आलें. याउपरी शुक्रवारा इतके येथून निघावयाचे होईलसे दिसते. मोठा गुंता सातारियाचाच होता. आशेर बोल्ह लागली आहे. लोकांनी वर अडविलें यामुळे थोरले यांणी बारा हजारांच्या मोहरा सांडणीबाा रवाना कालच केल्या. याउपरी तेथेहि गुंता पडणार नाहीं. बाजी नरसी येथें येऊन भेटले. किल्यावर लोक चढवावयाची आपणाकडून तर्तूद फार लौकर जाली. आम्हाकडून ग्रहस्त गेले होते त्याकडून काही जाले नाहीं. आपली सावधता अधिक आहे. मागाहून तपसीलवार यादीच्या नकला पाठऊन देतों. विशेष वाटले ते आपणास वरचेवर लिहीत गेलो आहे. आपणास पत्र पाठवीत नाहीं म्हणून तीर्थस्वरूप राजश्री दादानी फार फजीत केले व कृष्णाजी-पंत ताबे याणी फार लिहिले. त्यास आपणच कानास खडा लाविला तर बरा की वाईट ? परंतु दुसरेयाकडून फजीत करावे हे उत्तम नसे. माझा जड स्वभाव स्वामीस विदितच आहे. मूळचाच खंबीरच तसा; तेथे मी काय करावे ? हारम-जादेपणे लबाडीने गोष्ट जाहल्यास फजीत करावें तो अर्थ नसतां मग नाहाक

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

दुसरेयास काळजीत घालावें हे धणीपणास उचित नाहीं. आमचा स्वामीचे पायाजवळ ऋणानबंधच तसाच आहे. तेथे आपण काय करतील? सर्व प्रारब्धेकडून घ्यावे. हा स्वामीस शब्द नाहीं. हे विज्ञापना.

¶*The letter, of which the 1st sheet is missing, reports the points of dispute between the Peshwa and his uncle and the negotiations that were being carried on.*

No. 64] [*2-10-1767*

पौ छ ११ जौवल समान आश्विन

श्री

सेवेसी विज्ञापना. ता छ ८ प्रहर रात्र आवसीस क्षेम असें विशेष. मोहे नारळ ९ व गोटा १ यैसें श्रीमंत बाईसाहेबी श्रीमंत रावसहिबास पा ती पावली. प्रविष्ट केलें. आपण माझे पत्रीं लिहिलें कीं, गुरूजीजवळ कितेक यादी दिल्ह्या व आलीकडेहि कितेक कामकाजांचे मजकूर राजश्री मोरोबादादास लिा, त्याचीं उत्तरे आली नाहीं. त्यावरून मी आपले पत्रच उभयतांस दाखविलें. ते बोलिलें की, आम्ही सर्व जाबसाल पाठवीतच आहो व काही राहिले तेहि मागाहून पाठवितो. येथे सारा दिवस खलबताखाली जातो असा प्रकार आहे. राजश्री गोविंदराव तात्यास आपण पत्र मागे पाठविले ते त्यांस पावलेच आहे. कलावे. येथील प्रकार रात्रीस फारच बिघाडाखाली आला होता तो राजश्री माहादाजीपंत लिमये यांणीं लिा आहे. परंतु आज प्रातःकाली फिरोन ठिकाणीं आले. पंचवीस लक्ष द्यावे, पुढील कार्तिकाआलीकडें बेगमी करावी, याप्राा जाहाले आहे. आज विजयादशमीस आपण भावसिंगाबाा सनगे झग्यांची पा तीं पावलीं. श्रीमंतांचे पसंदीस फारच आली. त्यांतून येक झगा तयार करऊन आंगात घातला. व पहिली सनगे आपण पाा तीं श्रीमंताचे मर्जीस बरीच आली. भावसिंग दो रोजातच पोहचला. येका दो रोजी किल्याच्या चिठ्या तिकडून इकडें इकडून तिकडें व्हाव्या यैशांत आहेत. उभयेता श्रीमंत सीमाउलघनास आनंदवलीचे उतरतीरी गंगापार गेले होते. चांगल्या समारंभाने जाऊन आले. स्वामीस कलावें याजकरितां लिा आहे. व श्रीमंतानीं विज्या दशमीस लोकांचे बहुमान केले.

पालख्या दिल्ह्या	दिवट्ये अपदागिरे
१ धोंडो केशव आठेवले	२ पागेकडील बारगीर

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

१ रंगो कोनेर	१ लक्ष्मणपंत आपटे
१ पाद्री वैद्य	१ बाबूराव कृष्ण निा
१ लिंगापा कदम	कुरणे
—	—
४	४

येणेप्रा जाहाले. आपण सनगे श्रीमंतास पाठविली ती फार पसंदीस आली. सेवेसी श्रुत व्हावे हे विज्ञंति.

¶*The establishment of peaceful relations between the Peshwa and his uncle Raghunathrao is reported to Nana Fadnis from Anandvalli.*

No. 65] [*3-10-1767*

पौ छ १२ जावल
समान प्रहर दिवस

श्रीहरी

सेवेसी बाबुराव कृष्ण साा साष्टांग नमस्कार विनंती. येथील क्षेम ताा छ ९ जाावल मंदवार उज्याडता रविवार सकालची रात्र घटिका तीन मुाा आनंदवली जाणोन स्वामीही आपणाकडील वृत ल्याहावयास आज्ञा केली पाहिजे. यानंतर श्रीमंत राजश्री दादासाहेब याही पेशजी कराराप्रमाणे संदा किल्याच्या दिल्ह्या. आज रात्रीस राजश्री गोविंदराव तात्या व सखाराम बापू व चिंतो अनंत व गोपाल-राव गोविंद यैसे तिकडून संदा सिके करून घेऊन बहूत मेहनत सारी रात्र जागोन पाहाटेच्या प्रहर रात्री श्रीमंत राजश्री रावसाहिबाकडे आले. तेव्हां राजश्री मोराबादादा यास बलावणे आले. हे गेले व पेशजी पचवीस लाखाची निशा द्यावयाचा करार होता. त्याआलीकडे तोफखाना वगैरे दोन लक्ष त्याणी काढिले तेव्हा तेहि देणे लागले व रावसाहेब आपणाकडील किले दिल्हे त्याच्या तीन सनदा येकदाच दिल्ह्या व त्याणीहि याप्रमाणेच दिल्ह्या. इकडील किले येणेप्रमाणे दिल्हे

५ तालुके कावनई.
१ किले कावनई
१ किले मदनगड
१ किले अलंग
१ किले गडगडा
१ किले त्रिंगलवाडी
—
५

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

२ किले व्हाटा (?) व पिसोला
१ किले भास्करगड आजच ठरावात आला तो.
—
८

येकूण आठ किले याच्या तीन तीन सनदा दिल्ह्या. त्याकडील याणी घेतल्या याजउपर रवाना करितील. आनंदराव बर्गे यास कालच आशेरीचे सुमारास रवाना केले आहे. येथून लोक जावयास फार दिवस लागतील. याजकरितां आगोधरच रवाना केले आहेत. याप्रमाणे ही वेलपर्यंत जाहाले. सेवेसी कलावे. व आपण कावनईचे चौकसीस नारोपंत ग(द्रे) गेले ते कागदपत्र पाठविले ते पावले. याजउपर होईल ते सेवेसी लिहीन. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Baburao Krishna to Nana Fadnis, reporting the forts which Madhavrao promises to give up.*

No. 66] [*5-10-1767*

श्री

सेवेसी विनंती. येथील वर्तमान ताा छ ११ जमादिलावल मुाा गंगा दक्षणतीर आनंदवलीस असो. विशेष. आपल्या दर्शनाचा वियोग जाल्यापासून काही पत्री दर्शनाचा लाभ न जाला. तेणेकरून चितास समाधान नसे. आपला पंथ तो कोणास उतर ल्याहावयाचा नाहीं. परंतु आम्हास वडील गुरुमूर्ति स्थान एक आपण वडिलामागे. याकरितां विनंती लिहिली जाती. याचे मनन करून लेकराचा परा(म)र्ष पत्री करून भेटीमुले स्वदस्तूर आल्या चिताचे समाधान होईल. येथील वर्तमान उभयता येजमान एका वाडियात अनंदवलीतच असेत. तह सर्व जाला. सावकारी निशा जाली. किल्याच्या चिठ्या जाल्या. त्या जागा जागा सातारा, असेर, नगर, सिवनेर वगैरे जागा जाऊन हस्तगत जाल्याचे उतर आले म्हणजे तेथून कूच होईल. श्रीमंत कृपा करितात. विजयादशमीस पालखीची वस्त्रे दिल्ही. सर्व आशीर्वाद आपला असे. तीर्थस्वरूप नाना आम्ही खुशाल आपले आशिर्वादे असो. या पत्राचे उत्तर पाठवावे की चितास समाधान होय. वडील आपण असेत. बहुत कायं लिहिणे विनंती. चिरंजीव घरी असेत त्याचा समाचार आपण घेतच असतील. तेथील काळजी आम्ही कशास करावी? हे विज्ञापना.

¶*This letter reports the conclusion of an agreement, at Anandvalli, between the Peshwa and his uncle Raghunathrao.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 67] [18-10-1767

पौ छ २९ जाखर

श्रीगजानन

श्रीमंत राजश्री रावजी

स्वामींचे सेवेसी

विनीत सेवक मोरो गंगाधर कृतानेक सां। नमस्कार विज्ञापना. येथील क्षेम आश्वीन वद्य ११ पों। जनस्थानीं यथास्थित जाणोन स्वानंदलेखन करावयासी आज्ञा केली पा। विशेष. बहुतां दिवसीं कृपा करून पत्र पों। पाऊन बहुत संतोष जाला. देशीचे राजकी वगैरे सविस्तर वर्तमानास वाकीफ होऊन हिंदुस्थान प्रांती सत्वर सोबत पाहून येणें म्हणून आज्ञापिलें. यैसियास आज्ञेप्रो। मातबर सोबत पाहून येत असे. तूर्त ते प्रांतीचे सरदार सिंद्यावेगळे सर्व येथे आले. श्रीमंत रावसाहेब सर्व फौजेसहवर्तमान श्रीमंत रा। दादासाहेबाचें दर्शनास आले. श्रीमंतास स्वारीमुळें बतीस तेहतीस लक्ष रुपये कर्ज जाले होते तें श्रीमंत राव-साहेबी फेडून, पुढें खर्चाचे बेगमीस आणखी जाहागीर देऊन वडिलाची मर्यादा अदब बहुतसी राखिली. श्रीमंत रा। दादासाहेबहि कृपावंत होऊन आपले तर्फेने च्यार किले सातारा, नगर, सिवनेर, अशेर देऊन बहुत सन्माने ममतापूर्वक सर्व कारभार श्रीमंत रावसाहेबी करावा आपण स्नानसंध्या करावी, यैसा विचार ठहरला आहे. प्रस्तुत उभयता पितापुत्र येथेच आहेत. आठपंधरा दिवस राहून सर्व मंडलीसह पुणियास जाऊन फौजेस कामगारीस जिकडे पा। तिकडे पाठवितील. वदंता हेहि यैकिल्यात येते, श्रीमंत रा। नानाचे+ माथां सर्व हिंदुस्थानचा कारभार सोपावा. येक प्रकार गंगाधर येशवंत याचे माथा कारभार सोपावा. ठहरल मनसबा विचार पाहून मातबर सोबतीने सेवेसी येत असे; निवेदिन. रावसाहेब, आपली ममतेचे वारंवार स्मरण होतें. चरणदर्शनाचा लाभ घडल तो सुदीन. वर्कड वडिलाकडील देशीचे कारभारांचे वर्तमान समक्ष विनंती आपणास केली होती, तेणेंप्रो। गोष्टीं अमलांत आल्या. मागील दुसाला यजमान स्वामीस हिसेब कचा सजाऊन निखालस असो. प्रस्तुत कारभार समक्ष श्रीमंत करितात, आपलेहि कृपावंत करितात. प्रस्तुत परदेश प्रसंगी हेच आहेत. याउपर आम्ही निस्तुक[१] अवलंब सोडितो. येक आश्रयें आपले चरणाचा राखितों. मार्गाची सुभत्ता नाहीं, याजमुळें येण्यास दिसगत

\+ नारो शंकर.

१ निस्तुक = अजिबात.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

लागली. रा राघोपंत पदरी आहेत; मर्जी राखितील, न राखितील भरवसा येत नाहीं. माहाराजच कृपा करून निभाऊन घेतील तरच त्यांचा परिणाम आहे. बहुत काय लिहिणें हे विज्ञापना.

¶*Moro Gangadhar to Raoji (Vishwasrao Lakshman), reporting the negotiations that had been effected between the Peshwa and his uncle.*

No. 68] नकल [*19-10-1767*

पत्राची लिहिली मिती
आश्वीन वद्य १२
पौ छ १६ जाखर

श्रीसांब

चिरंजीवास प्रति खंडो आबाजी कृतानेक आसीर्वाद उपर. राजकी वर्तमान तर श्रीमंत राजश्री माधवराव गतवर्षी करनाटक प्रांती मोहीम करून सिरे वगैरे पाचच्यार किले व मवास मोडून कुल मुलकी बंदोबस्त करून करभार बहुत घेऊन येश संपादून पुणियास आले. श्रीमंत राजश्री दादासाहेब हिंदुस्थानातून जनस्थानास आले. तिकडील कामकाज यांचे फौजेने जाले तें आपल्यास कललेच आहे!! येथे आल्यावर उभयताच्या भेटीसाठीं भांजगड पडली. यांचे मानस पुणियास न जावे. रावसाहेबी येथे यावे. मग हेहि दोन च्यार मजला पुढे गेले. तिकडून तेहि आले. नांदूर गंगातिरी उभयतांच्या भेटी होऊन येकत्र जाले. दोन च्यार दिवस येकत्र होते. पुन्हा कारभारसंमधी जाबसालामुले पेच पडले. रायांचे मानस कीं, दादास घेऊन पुणियास जावे. हे याचे चितास न ये. पंचवीस लक्ष हिंदुस्थानचे कर्ज वारावयासी द्यावें पांच लक्षांची जागीर आणखी द्यावी. याप्रो रावसाहेबी करार केला. त्याणी मांन्य केले. दादानी पांच किले नगर, आसेर, दौलताबाद वगैरे यैसे द्यावे. किल्यास ठाणी माधोरायांची बसली. यैसा प्रकार जाला. माधवराव यांजकडे सरदार फौज झाडून आहे. सांप्रत यांची इभ्रत भारी आहे. फौजहि दाहा वीस हजार आहे. हिंदुस्थानांत रायानी जावे. दादानी नासकास असावे. यैसा सांप्रत मजकूर दिसोन आला. पुढे काय काय होईल ते पाहावे. कुल कारभार रावसाहेबी करावा. दादा साहेबी आनंदवलीस असावे. पहिले नवा लक्षांची जाहागीर हाली पाचा लक्षाची येकून चौद लक्षांची जाहागीर घेऊन गंगातिरी असावे. हिंदुस्थानचा कारभार राजश्री गंगोबा तात्याकडे रावसाहेबी सोपविला. फौज वीस हजार रावसाहेबा-जवल. दादापासी फौज हजार दोन पावेतो. इभरतहि पडली. दादानी मांन्य

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

केले. दादा वाडियांत आहेत. भोवता परीघ कुल रावसाहेबाचा आहे. सरदार, मुतसदी, कुल रावसाहेबांचे लगामी जाहाले. पुढें हिंदुस्थानात येतात. मोगलाचे रायाचे बहुत सख्य आहे. रावसाहेबांची आंठ करडी, स्वता कारभार करावा. कोणाचे चालत नाहीं. बापूदेखील रंग जोगाऊन आहेत ! कलावे हा आसिरवाद. नारोपंतापासोन पांच लक्ष रुपये नजर घेतली तेव्हा भेटी जाल्यात. कळावे.

पौ छ १६ जमादिलाखर सन समान सितैन

¶*The writer informs Khando Abaji how the dispute between Madhaorao and his uncle arose.*

No. 69] [*23-10-1767*

पौ छ ६ रजब

श्री

श्रीमंत राजश्री रावजी स्वामीचे

सेवेसी

विनीत सेवक मोरो गंगाधर कृतानत सां नमस्कार विज्ञापना. येथील क्षेम कार्तिक शुा १ पाा जनस्थानीं यथास्थित जाणोन स्वानंद लेखन करावयासी आज्ञा केली पाहिजे विशेष. स्वामीची आज्ञा घेऊन देशास आल्यापासून राजकी वगैरे काहींच वर्तमान लिा नाहीं म्हणून स्वामीचें आज्ञापत्र आलें. याउपर देशींचे वर्तमानास वाकीफ[1] होऊन सत्वर येणे म्हणून आज्ञापिलें. (त्यास देशी) आल्यावर सेवेसी दोन तीन विनंती पत्रें पाा. पावलीं नसतील. यानंतर सर्व दरबारसंमधी राजकी वर्तमानास वाकीफ होऊन चांगली सोबत पाहून सत्वर सेवेसी येत असे. दर्शनांती सविस्तर निवेदीन. आजपावेतों आल्या दिवसापासून येकहि दिवस स्वस्थता राजिकामुळें नवती. हालीं उभयता श्रीमंत पिता पुत्रांच्या भेटी जाल्या. कनिष्ठ श्रीमंतीं वडिलांस हिंदुस्थानचे स्वारीमुळे कर्ज बतीस तेहतीस लक्ष रुा जालें होतें ते फेडून बहुत प्रकारें मर्जी अदब राखोन आणखी जातीचे खर्चाचे बेगमी पेशजीचे जाहागिरीसिवाये दाहा लक्ष रुपयांची जाहागीर दिल्ही. श्रीमंत दादासाहेबहि संतोषी होऊन ममतापुरःसर आपले कडील च्यार किले सातारा व नगर सिवनेर अशेर देऊन, दरोबस्त राजकारभार श्रीमंत रायांही करावा; आपण स्नानसंध्या करावी यैसा तह ठहरला. होईल

---

१ माहीत.

1836

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

वर्तमान सविस्तर वाकीफ होऊन मीच सेवेसी येत असे. आपली आज्ञा घेऊन आल्यावर लस्करांतून तीन च्यार पत्रें पाा पावली नसतील. त्याउपर काही येक दिवस ल्याहावयसीहि न फावलें. श्रीमंत राा दादासाहेबीं यजमान स्वामीकडील रामसेज किला घ्यावयाविषंई बहुत आग्रह धरिला होता, त्याजमुळें यजमान स्वामीहि पेंचातच होते. मधे समजाविष श्रीमंत स्वामीही किला माफ करून केली. उपर श्रीमंत रावसाहेब आले. त्यांच्या यांच्या भेटी होऊन तह ठहरे, त्यास मास पक्ष लागला. प्रस्तुत श्रीमंत रावसाहेब येथेंच आहेत. दोन किले नगर सिवनेरचे जाब पावल्याचे आले; शेष सातारा आशेरचे पाऊन जाब येणें, याजमुळें कांही येक दिवस स्थिरता होईलसे दिसतें. येथील कार्यभाग जाल्यानंतर पुणियास सर्व सरदारांसह जाऊन तेथून फौजाची रवानगी हिंदुस्थानप्रांती करणार. राा तुकोजी होलकर ये प्रांती आले; उदईक श्रीमंताच्या त्यांच्या भेटी होणार. सिंद्याचेहि कारभाराची घडमोड होणार. राा बाजी नरसी येथें राा गंगाधर येशवंत याचे विद्यमानें श्रीमंतास भेटले. पेशगीचा कारभार राा अच्युतरायांचे विद्यमानचा आपणास वाकफच आहे. हाली माहादजी सिंदे सरदार नावास दिवाण यजमान स्वामी कारभार बाजी नरसीं याणीं करावा; येणेंप्राो श्रीमंत रावसाहेबी राा गंगाधर येशवंत याचे विद्यमानें डौले ठहरले आहे. प्रस्तुत तात्या आवधे सरदारांअगोधर भेटून मसलतीस अनुसरले, त्यामुळें यांजवर रायाची अधिकोत्तर कृपा ममता. रायाचें मतें, सर्व रेवापूरचे कारभाराचा जिमा तात्यांचा करून दरोबस्त फौजा होलकर, सिंदे आणखीं हुजूरची फौज मातबर पथकें तैनात करून आपली मुतालकी सिके देऊन ते प्रांती रवाना करावें. समागमें फौजेसह यजमान स्वामीसहि द्यावे, हा येक विचार; दुसरा श्रीमंत राा सखारामपंत बापूंचे विचारे श्रीमंत राा नानांस सर्व रेवापारचा कारभार सोपून दरोबस्त फौज यांचे तैनात करावी, हा मनसबा घडणें तर घडेल. मासपक्षानंतर पुणियास जाऊन, घडले सविस्तर वर्तमान राा गोविंद रघुनाथ यांही सेवेसी लिाच असेल. मजला अधिकोत्तर कललियास रावजींस मीहि वाकीफ करीत असतों. केवल बारीक मोठें निखालसपणे आम्हास लिा येत नाहीं. आपले कृपावंताही हिंदुस्थान प्रांती कारभार केला; त्याप्राोच येथेहि वडिलाकडील कारभारांत बखेडे करूं लागले, तो प्राार सेवेसी विनती केल्या प्राोंच करूं. याउपर अवलंब भरवसा सर्व आपले चरणाचा असे. राा राघो रंगनाथ यांही आपले कृपेचा माार लिा. सर्व प्रारें रसदेविषई वगैरे रावसाहेबांहीच कृपा करून निभाऊन घेतलें. त्यावरून सेवकाचा ठाईं पुर्ती ममता आहेसी वाटून बहुत

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

आनंद जाला. विस्तार कोठवर लिहावा ? रावसाहेब, आपणाखेरीज कोण कृपा करणार ? स्वामी अभिमानी, जो आपला म्हणविला, त्यांचे चालवायास आपणापासून कधींहि अंतर होणार नाहीं. आम्ही सेवक पदरचे पिढीजाद असों. बहुत काय लिहावें; कृपा वर्धमान करावी. हे विज्ञापना. हा गोपाळराव स्वामीस सा नमस्कार.

¶*Moro Gangadhar reports to Raoji how the dispute between the Peshwa and his uncle became acrimonious and what part the various officials played in settling it.*

No. 70] *[1-11-1767*

श्री

श्रीमंत सकल सौभाग्यादिसंपन

मातुश्रीबाई साहेबाचे शौ

आपत्यसमान नारो नीलकंठ कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ता कार्तिक शुा १० मुकाम नासीक. आपले कृपावलोकनेकरून स्वस्त क्षेम आसे विज्ञापना. बहुत दिवस जाले; आज्ञापत्र सादर न जाले. तेणे करून चिंता लागली आहे. तरी कृपावंत होऊन वरचेवर आज्ञापत्री सांभाल करावयाची आज्ञा केली पाहिजे. येथील वर्तमान तरी, श्रीमंत रा दादासाहेबांचे भेटीस श्रीमंत रा पंतप्रधान आले होते. उभयेताचा सलूख जाला. च्यार किले नगर, जुंनर, आसेर, सातारा दादानी दिले. कर्ज वारावयास पसतीस लाख रुा घेतले. याउपरी कारभारांत मन न घालावे यैसे ठरले. परवां कूच करून पंतप्रधान पुण्यास गेले. श्रीमंत रा नानाहि समागमे गेले. सौ मातुश्री ताई बा गेली. रा खंडोपंत मामा उभयेता कुटुंबसह गेले. येथे फौजा जमा जाल्या येणेकरून आपले उभयेता गावास से दोनसे रुा खर्चवेच पडला. उपसर्ग लागला. म्हसरलचे कुरण आपणास दिले होते ते न द्यावेसी मर्जी दिसोन आली. गवताची मोठी आडचण येदा आहे. आपले मामलतीचा जाबसाल पंतप्रधान स्वामीजवल दोन लाख रुा रसद ठरली. यैवज सत्वर आला पाहिजे. रा गोविदराव वकील पुण्यास रावसाहेबाबा गेले. श्रीमंतावर पंतप्रधान स्वामीची दया पूर्ण आहे. सविस्तर मुख्य पत्रावरून श्रावणारूढ होईल. संकलितार्थे श्रृत व्हावे म्हणोन लिा आसे. मातुश्री बया व आजीबाई द्वारकेस गेली आणि डाऊबाई कुटुंबसह तलेगावी गेली आहेत. सेवेसी श्रृत होये हे विज्ञापना.

¶*Naro Nilakanth Mujumdar to Shrimant Bai Saheb (Ramabai?) reporting the adjustment of the differences existing between Madhaorao and Raghoba.*

1838

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 71] [*30-11-1767*

पो छ १२ रजबू

श्री

सेवेसी बाजी गोविंद कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. ता छ ८ रजब पावेतो वर्तमान येथास्तित असे, विशेष :—श्रीमत् राजश्री चितो विठल यास म्हणतात की, सर्व कारभाराच्या येखत्यार तुम्हास सागतो. आपले नावे सिके करावे पाच लक्ष रुो सालिना सिलकेस पाडून द्यावे. आपणास कारभार करणे नाही. आजिणी(री)स जाऊन राहातो यैसे म्हणतात. हे बोलण्याचे प्रमाण नाही यामुले कबूल करीत नाही. निरोप घेऊन कोल्हापूरचे यात्रेचे निमित्य करून जाणार आहेत. राजश्री आबाजी माहादेवहि आठा चोहो दिवसात निरोप घेऊन नागोठणेयास जातात. त्रिवर्गास सालिना वीस हजार पावेतो देणार. याची मर्जी पनास द्यावे यैसी आहे. राजश्री जीवनराव केशव यासी श्रीमंत रावसाहेबानी येत्ये समई खलबत करून, पुण्यास यावे, सर्व प्रकारे चालऊ यैसा करार केला. दीड हजार रुो खर्चास देविले होते ते त्याणे घेतले नाही. येथें श्रीमंत आग्रह करून राहवीत होते. तीनसे रुो दरमाहा व याजखेरीज दोन हजाराचा गाव सरासरी सालिना सा हजार रुा द्यावे यैसे म्हणत होते. परतु राहिले नाहीत. निरोप घेऊन पुण्यास आजच इंदुवारी गेले. कलावे. रुो बाबूराव हरी यास व सखाराम हरी यास उभयतास दाहा हजार रुो सालिना पो साडे तिही हजाराचे गांव बाकी इतलाख या प्रो देऊ आणि येकजण हजूर राहावे, येकजणाने पागा घेऊन भेलसे वगैरे माहालात चारणीस जावे यैसे म्हणतात. अद्याप कबूल केले नाही. तिकडेच समजावीस जाहाल्यास द्यावे यैसे मानस आहे. तमाम पागा देखील हुजूर पागा घोडी बारासे गणती भरली पो च्यारसे खैराती निघाली. त्यापौ अडीचसे राजश्री गोपालराव गणेश, दीडसे बाजिराव गोविंद याप्रो व येक हती पचवीस उंट यैसे उभयता बंधूस वाटून देऊन निरोप पोट भरेल तिकडे जावयास दिल्हा. बाकी आठसे राहिली, पौ दोनसे हजूर ठेविली. साहासे घोडी पौ दोनसे गोविंदराव बारवकर, दोनसे भवानजी वाघ, दोनसे किरकोल पागा याप्रो सजून भेलसे याकडे सवगाई आहे तिकडे चारणीस तूर्त पाठवावी. पुढे सुज्यातदौला जाठ वगैरे सोईस पडल्यास चाकरीस लावावी याप्रो घाटत आहे. कलावे हे विज्ञापना.

¶*Baji Govind reports how Raghoba gradually became dissatisfied with the agreement he had contracted with Madhaorao, and how he consulted some of his followers on the course to be followed.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 72] [Dec. 1767?

श्री

विज्ञापना. तीर्थरूप राजश्री दादासाहेबाजवळ ठेवावयास कारभारी तुम्ही व सखारामपंत, कृष्णराव बसून योजून लिहिणे म्हणून आज्ञा. आज्ञेप्रो विचार करून लिहिले आहे ते श्रुत होये हे विज्ञापना.

¶*This chit (probably in Haripant Phadke's hand) refers to the appointment of a Karbhari for Dadasaheb.*

No. 73] [7-12-1767?

(पहिले पान मिळालें नाहीं दुसरे पानापासून मजकूर आहे.)

कारण कीं ते पहिले येथें आले होते ते समई बोलले होते कांही मदत करू; त्याजवरून बोलाविले. येऊन दाहा पाच जेथपर्यंत काम करतील तर करून घेऊ आणि सनदा त्याजबराबरच रवाना करुं. रा बाळाजी सामराज व सदासिव हरी रा यादो रावजीचे बंधू मार्गेस्वर वा ४ परवा स्वार होऊन सेवेसी येणार. मागाहून रा मल्हारपंत तात्याहि लिा प्रमाणे येतील, ऐवजाची रवानगी अविलंबे करावी. विनंती उपरी. आपणास सरकारची पत्रें लिहावी ऐसी आज्ञा जाली. जाटाच्या (दं)ग्याकरिता कार्याकारण सिबंदी ठेवावी म्हणून सरकारचा दस्तऐवजी कागद द्यावासा करार जाला आहे. आणीखहि राहिले मुदे ते रसद भरणा जालेवर दिवसेदिवस भीडभाड पडत पडत पडून आमलांत येतील. राजश्री हरी चिंतामण परभारा औरंगाबादेवरून पुण्यास गेले म्हणून ऐकिलें. येथे आले नाहींत. त्यास आज्ञापत्र हुजुरून सादर करावे की गोविंदरावास ते एकामतानें वर्तत. गोविंदरायास खातरजमेने आज्ञापत्री लेखन करावे. श्रीमंत राजश्री नानाकडे कोठचा किला द्यावा म्हणून ताकीदपत्र व हुजुरे काहडले होते त्यास तूर्त तो राजश्री मोरोबादादा फडनिसांनी हिसका दिला; परंतु त्यांची भीड भारी द्यावासे होईल. तितक्यासाठीं बिघडूं नये. वडिलांचीहि मर्जी प्रसंन करावी. श्रेयस्कर आहे. आम्ही गोविंदरायास लिहिलें आहे कीं पांच च्यार हजार नजरन्याज (?) कबूल करून जेथपर्यंत कोट आपली आपल्याकडे राहे ते करणे. याहीवर वडिलांकडे जाली तरी त्यांजकडून तरी आपल्या निसबतीस राहे ऐसा बंदबस्त सरकारातूनच करून घेणे. मुत्सद्यांस सर्वांस आपली भीड फार आहे. दरबार रक्षावयाची शकलें निरालश योजीत जावें. ऐवज सत्वर पाठवावा. श्रीमंत राजश्री दादासाहेब आनंदवलीहून श्रीमंत राजश्री रावसाहेब पुण्यास गेल्यावर श्रीत्रिंबकेश्वरास गेले होते. तेथें कोणी सांगितले कीं आज-

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

नेरीवर द्रव्य तलावाचे आसमंतात आहे. त्याजवर निश्चय मानून आजनेरीवर डेरे देऊन आठदहा रोज होते. तलावाचे भवते खणीत * * * त्याचे दुसरे रोजी कांही अपशकून जाला. सर्पदंश होऊन दोनतीनसे (?) माणसे मेलीं. एक उंट घोडे मेलें, म्हणून खणीत महकूफ केले. उपरांत हर्षाकडे गेले. हरिहर तीर्थाजवळ किल्याखालीं आले. तेथून किल्यावर जावे ऐसा अवलंब केला. त्यास किलेवाले नानाची परवानगी खेरीज येऊं न देत म्हणून बेमर्जी जाली. किल्याखालीं नानाकडील सदरेत माणसें होती. त्यांस बांधून मारिलें. तेथें चोकी आपली बसविली. जाहागिर किल्याची बंद केली. एक दो गावचे पाटील भेटले नाहींत ती गावे जाललीं. आठ चार रोज धामधूम केली. नाना सडे कुटुंबासह पुण्यास गेले आहेत. राजश्री आनंदराव मामा व चांगोजी कदम पागा पथक सुधां येथें नासकांतच आहेत. ते व रा कृष्णाजी गोपाळ वकील होते. याणी जाऊन रदबदली केली. नानांही पुण्याहून विनंतीपत्रें पाठविलीं त्याजवरून हर्षाची जहागीर जप्त केली होती ते सोडली. दाहा माणसे चौकी मात्र किल्याखाले हरिहर तीर्थावर अद्याप आहे. पुनः काल कूच करून गंगापुरास गेले. त्रिंबकास जाणार. अंजनेरीवर धनाचा तलाश मागती करणार आहेत. रा गोपाळराव गणेश याची पागा व हती पेशजी घेतली होती ते त्यांस दिली. मधे झाडून खासा सरंजाम त्यास चवघडा देखील देऊन सात हजार फौजेनसीं यवनाकडे भागानगराकडे पाठवावेसा मनसबा होता, तो राहिला. पागा व हती मात्र त्यांचे त्यांजकडे दिले, वरकड वस्तभाव नगदी वगैरे सरकारांत लागली ते दिली नाहीं. याउपरी त्यास मनास येईल तेथे पोट भरावयास जावें. रेणको अनाजीहि याजपासी आहेत. तिसरे जगजीवनराव पोवार आहेत. त्यांत गोपाळराव याचा कारभार येणेप्रो निवडून बिदा करणार. दो चवरोजा जाणार आहेत. रा आबाजी माहादेव आपले कोठाराचे वाड्यांत राहत होते ते दोनतीन रोज जाले रुसवा करून त्रिंबकास गेले. तेथून कोकणांत घरास जाणार; कारण कीं श्रीमंत रावसाहेबांसी कराररमदार जाले आहेत, त्याप्रमाणे चालावे. न चालल्यास मुत्सदी जवळ आहेत, यांचे बदनाम होईल. रावसाहेबांची सलाबत भारी आहे. सर्व त्यांस भितात. पुढें होईल वर्तमान तें दरपत्र सेवेसी लिहून पाठऊ. दादासाहेबानीं मुदे रावसाहेबास लिहून दिले, त्यांजवर रावसाहेबानी करार केले. त्याची नकल लिहून आलाहिदा सेवेसी पाठवली आहे. मनन करावी. दादासाहेबास व उभयेता चिंतोपंत व आबाजीपंत, लक्ष्मण नातू, हरीपंत भिडे यास पत्रे लिहीत जावी. मी येथे आहे.

1841

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

पावती करून उत्तरे घेऊन पाठवीन. अनुसंधान पत्रे लिहिल्याने तुटणार नाही श्रीसप्तशृंगनिवासिनीचे अनुष्टानाची दक्षणा व होमाचे व ब्राह्मणभोजनाचे साहित्यास ऐवज पाला त्याप्रमाणे वो रा आबाभट कानसकर वगैरे भिक्षुकास सांगितले. सर्व मतें ठराव जाला की मावशुद्धात तेथे जाऊन आज्ञेप्रमाणे हवन व ब्राम्हणभोजन करावे, तवपर्यंत साहित्य ठीक करून ठेवितों. तूप तेल तेथे वणीकडेच घेतो, वरकड साहित्य येथून न्यावयाचे तें नेऊन आज्ञेप्रमाणे सिध्धीस नेतो. वो रा महादेवभट पैठणकर कोल्हापुराहून काल आले. तेथील प्रसाद व याद पाली आहे पावल. पुन: वो रा आबाभट कानसकर यांचा मनोदय घेतला कीं कारभारांत न्यूनपूर्ण मनास आणीत जावे. त्याणी साफ जाब दिला की आमचे दिवस कामकाज करावयाचे नाहीत. या उपरी आयुष्याचे दिवस स्नानसंध्या करून घालावे. दुसरा अर्थ नाहीं. प्रस्तुत कृष्णास्नानास गेले आहेत. तेथून परभारा सप्तशृंगास येऊं आणि होमाहवनाचे वगैरे सांग करूं म्हणून बोलले आहेत. मातुश्री डाऊबाई कुटुंबासहवर्तमान तळेगावास गेली आहेत. दो चवरोजा मातुश्री डाऊबाई येथे येणार आहेत. मातुश्री बया व आई द्वारकेस यात्रेस गेली आहेत. विठलराव तात्याची सरदारी रा बापूकडे सांगितली. अंताजी माणकेश्वराचे पुत्राचा अभिमान रा सखारामपंत बापूस आहे. त्यांचे उर्जीत पूर्ववत् होणार. तूर्त हिंदुस्थानांत फौज रवाना जाली नाहीं. रा महादजी सिंदे येणार ते आल्यावर ज्यास पाठवणे ते पाठवितील. होळकर सिंदे यांचा बंदबस्त महादजी सिंदे आल्यावर होईल. उपरात हिंदुस्थानात पोख्त फौजा रवाना करणार. कर्नाटक प्रांती रा गोपाळराव गोविंद वगैरे पंचवीस हजार फौज पाली. यवनाचा मोड फिरंग्यानी केला होता. पुन: यवनाने सांभाळून फिरंग्यावर गेला. प्रस्तुत वर्तमान आले की फिरंग्याचा व यवनाचा सलुख जाला. दादासाहेबानी यवनाकडे मकुंदराव मुनसी नाना जवळ होते त्यांस पालखी देऊन वकिलीस पाले. आनदराव मामाचा व मकुंदरायाचा पेच म्हणून नानानी मकुंदरायास आज्ञा दिली ते सरकारांत भेटून वकिलीचे कामावर गेले. त्रिंबकराव नारायेण नानास भेटावयास दोन तीन वेळ आले परंतु त्यासी अनास्था व पेच नानानी भाषण केले म्हणून श्रीमंत रा रावसाहेबांची भेट आनंदवलीचे मुकामी त्रिंबकरावजीनी घेतली. रावसाहेबांनी आश्वासन दिले कीं तुम्ही पुण्यास या, तुमचे मनोदयानरूप केले जाईल. पुण्यास जाणार आहेत, जातच होते; परंतु सौ गंगाबाई गरोदर दिवस जाले आहेत. प्रसूत जाल्यावर जातील. विठल जानराव यास जंबुसरची फडनिसी दीड हजार रुपये

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

वेतन करून सांगितली. कमाविसी इजारा तुळसीसेट नानासेटाची अवलाद जंबुसरकार वाणी त्याजडे सांगितली असे. गुजराथ आपाजी गणेश याजकडे आहे. बऱ्हाणपूर त्रिंबकपत वोढुकर गृहस्त त्यांजकडे आहे. खासगी गावचे वर्तमान तरी पीकपाणी अद्यापवर बरे. वेठबिगार दादासाहेबांचे डापेखाली चैन पडू देत नाहीं. गवत जाबस कुरणात व मोकाशाकडून इकडून तिकडून कोरून कारून लाखपर्यंत कापविले. बागास वगैरे कुळवाडीस बैल गुदस्ता च्यार घेतले आणीख आठ बैल येंदा घ्यावे लागतात. ऊस रान पडते हुजूर विनंती लिहिली होती. त्याची मार्गप्रतिक्षा आजपर्यंत बैलांची केली. तिकडून न आले. याजकरितात जरूर घेतले पाहिजेत. दोन म्हसरलच्या बागाकडे, दोन कामत वाडयाचे बागाकडे, व दोन जांबच्या कुळवाडीकडे, दोन गाडीस, ऐस ८ बैल पाहिजेत. नादुरकोट हा गावच्या बाजारातून खाा करून आणवितो. त्रिंबकराव यांजकडून शभर रुो येणे तेविसी येत्न बहुत करीत असो. त्यांचे ध्यानास येत नाही तजविजीत आहोच. यथंभूत वर्तमान श्रवणरूढ व्हावे म्हणून लिाा असे. वोा राा दादंभट पैठणकर याचा भावाचा कागद व वोा राा अनंतभटजीचा ऐसे पााले आहेत. पावतील श्रुत होय. राा यादो रावजी जाटाने ठाणी बसविली होती ते उठवावयास फौज सहवर्तमान पााले आहेत. त्यास इकडून बलाबल उपराला ध्यानांत आणून युक्तीनेच कामे करावी. फौजास छावणीस त्या प्रांते येतील तवपर्यंत दम खाऊन कोणासी विरुद्ध न करावे. जाट जयनगरवाल्याकडे गेला, एकदोन परस्पर त्यांच्या लडाया जाल्या ते वगैरे सविस्तर वर्तमान वरचेवर दरबारी आपली बातमी सर्वां कमावीसदारांच्या अगोधर पोहचेसे संधान राखावे हे विज्ञापना.

राा वासुदेवपंत बापू व राा यादोराव भाऊ व राा गोपाळ रावजी स्वामीस सांा न(म)स्कार लिाा परिसोन कृपालोभ कीजे हे विनंती.

¶*A detailed account of the quarrel between Madhaorao and his uncle, written soon after they were reconciled.*

No. 74] *[1767-68*

श्री

यादी तीर्थरूप राा दादासाहेबाकडील कलमाची सुाा समान सितैन मया व आलफ

स्वारीसंमधे व सावकारीचे व खासगीचे कर्ज हिसेबी ठरेल ते व नारो शंकर व सिवाजी विठल व त्रिंबक सिवदेव व खडेराव पोवार व

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

स्वारीसमंधेच यैवज खर्च होऊन जमाखर्च उगवला नाहीं ती कलमे स्वारीसमधेच कलम राहिले आसल ते हिसेबाचे रुईने निवल ते झाडून यैवज द्यावा त्याची मुदत. रुा

१९००००० तूर्त इ॥ आस्विन ता॥ फालगुनआखर सन समान इ॥ चैत्र ता॥ आस्विन सन तिसा सितैन हिसेबी निवतील त्याची बेरीज आजमास येकवीस लाख

सदरहू यैवज सावकारी निशा-करून सदरहू हफ्तेयाणी द्यावा.

कलम १

सदरहू यैवजाची निशा सावकारी होईल. येणेप्रा॥ करार.

खरगोन व देपूर खासगीकडे ठेविले आहे. त्याप्रा॥च राहील.

कलम १

दाहा लक्षाचे बेरजेत कम होतील येणेप्रा॥ करार.

किले मोलेरीसेजारी किरकोल किले न्हावा, पिसोला वगैरे याजवर आद्याप इकडील लोक नाहीत. तेथे पहिले लोक आसतील ते उतरून इकडील लोक चढऊन बंदोबस्त करूं.

कलम १

1844

जिवाजी पवार व आणीक याचे प्रती पथके खासा स्वारीबराबर चाकरी करीत आले आहेत. त्यांचा सरजाम व किले ठाणी व इनाम व वेतने आदिकरून जे त्याजकडे चालत आले आहे त्याप्रा॥ याजकडे निर्वेध चालावें. हिदुस्थानची चाकरीची नेमणूक आहेच. दुसरीकडे मोहिमीस पाठवणे तरी इकडील आज्ञेने पाठवावे.

कलम १

मा॥रनिलेनी फितूर न करितां येकनिष्टेने वर्तणूक करावी. त्याजवर सर्व प्रकारे ममतापुरस्कर चालविले जाईल. दुसरीकडे पाठवणे ती विनंती करू. जावयाची आज्ञा करीत जावी. येणेप्रा॥ करार.

खासगत किले धोडप आदिकरून जे आहेत त्यांस सरजाम नेहमी आजपावेतो जो आहे तो त्यांचे खर्चात वजा करून बाकी यैवज बेहड्याप्रा॥ पाहिजे. त्यास भागारे व आमोद आहेतच. त्याखेरीज यैवज राहेल त्यास नेहमी चांगला माहाल वसुली लाऊन द्यावा. कलम १

सन सबात बेहडे जाले आहेत त्या आजमासे बाकी बेरजेचे माहाल तापी आलीकड खुलासा वसुली बेरजाचे लाऊन देऊ येणेप्रा॥ करार

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

पहिली माणसे आसतील ते उतरून आपलेकडील माणसे किल्यावर ठेऊन बंदोबस्त करावा. करार.

मलारराव कृष्ण व कुकाजी सिवराम वगैरे कारकून आम्हाजवल चाकरी करीत आहेत. त्याचा पुरातन सरंजाम गावखेडी आहेत व इनाम वगैरे जे आसतील ते निरोपद्रव चालवावे. कलम १

सदरहू चालेल. येणेप्राो करार.

साष्टी वसई येथें फरफर्मास होईल ते येथील चिठीप्रा प्रविष्ट करीत जावी. कलम १

पांच हजार रुपयांच्या जिनसाच्या चिठ्या सदरहू दोनी तालक्या मिलोन कराव्या आज्ञेप्रमाणे जिनस पावता होईल येणेप्रा करार.

गणेश विठल व सेव्याजी आइतोले वगैरे रिकामे होतील त्यांची सोय करून द्यावी. आम्हाजवल राहतील कलम १

मारनिलेचे स्वरूपानसार कालानरूप सेवा घेऊन चालविले जाईल येणेप्रा करार.

नारो शंकर यांजकडे यावल, लोहारे व दिवाणगिरी सिंद्याकडोन मारनिलेकडे चालत आहे. त्याप्रोाच चालवावी. मारनिलेचे कर्ज सिद्याकडे आहे त्याची मुदत सिद्यानी करून दिली आहे. त्याप्रो उभयपक्षी ताकीद व्हावी. आणि उगऊन द्यावे. कलम १

श्री त्रिंबकेस्वराचें आसपास किले आहेत ते आम्हाकडे द्यावे. त्याचा बंदोबस्त इकडोन व्हावा.

१ ताा कावनई
 १ किले कावनई
 १ किले आलंग
 १ किले मदनगड
 १ किले त्रिगलवाडी
 १ किले गडगडा.

—

५

१ किले भासकरगड.

—

६

सदरहू किले साहा सरजामसुधा आम्हाकडे द्यावे. कलम १

सदरहूप्रो करार.

सिंद्याचे सरदारीचा बंदोबस्त केला आहे त्यास सिकेकटार सरकारातून केदारजी सिंदे याचे नावेची करून दिली आहे त्याप्रो बदोबस्त चालावा. कलम १

साप्रत सरदारीचे वोझे माहादाजी सिंदे याजवर आहे. त्याचे विचारे बदोबस्त करावा लागेल. येणे प्राा करार.

राजमडलचे पदाधिकारी आहेत त्यांची तगीरी बाहाली जे होणे ते येथील आज्ञेप्रो होईल. कलम १

येखाद्यापासोन मातबर आंतर पडले तरी आपणास विनती करून. आपण करावे म्हणौन आज्ञा करीत जावी! येणेप्राा करार.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

दिवाणगिरीचे नावमात्र मा॥ मा॥र-निलेकडे चालतील कारभाराचा बंदबस्त येथूनच करावा लागला. कर्जाविसीं ताकीद करूं. येणेप्रो करार.

वडगाव वारंजे कर्यात मावलचे दोनी गाव बागाकडे दरोबस्त तेथील खर्चास नेमून द्यावे. येथील कारकून राहील. कलम १

बागाकडे खर्च लागला तो सदरहू गावचे यैवजी गोविंद सिवराम खर्च करतील. येणेप्रो करार.

परस्परे किल्याचा फितूर व राज-कारणे करूं नयेत. कलम १

सदरहूप्रा॥ करार.

पेशजी खासगीकडील जाहागीर आहे व हली खरगोन व देपूर घेतले आहे त्यासुधा रुो दाहा लक्षाचे भर-तीची बेरीज लाऊन द्यावी. परगणे बरडे वगैरे खुलासा भा॥ लाऊन द्यावा. कलम १

दाहा लक्षाची जाहागीर द्यावी त्यांत पेशजीचे माहाल आहेत ते व देपूर-तरफ व खरगोन वगैरे वजा करून बाकीचे बेरजेस माहाल लाऊन देऊ. येणेप्रा॥ करार.

आम्हांकडे किले राहिले तेथील नेबाद मागील देणे राहिले आहे ते हिसेबाचे रीतीने द्यावे. कलम १

सन सबाचे बेहड्याप्रो बाकी निघेल त्याचा निकाल करून देऊ.

हिंदुस्तानात व गुजराथेत जे कोणी पाठवणे त्यास येथील आज्ञेन पाठवावे. कलम १

हिंदुस्तानात मात्र ज्याची रवानगी होईल तो जाते वेलेस आपली आज्ञा घेऊन जाईल. येणेप्रा॥ करार.

चंदेरी पो गाव तनखा पचवीस हजारांचे कापडाचे खरिदीबदल ठेविले आहेत. त्याप्रा॥ खासगीकडे चालावे. सदरहूप्रो करार.

किले आसेरीजवल खासगी तालुका आहे. त्यास बलकुबलीस किले-दाराने कुमक करावी. दुसरियाने लबाडी केली तरी त्याचे पारपत्य करावे. रयेतेस किल्यानजीक आश्रा द्यावा. कलम.

सदरहूप्रो करार. कदाचित कमा-विसदार दंग्यामुले किल्याचे आश्रयास आल्यास जागा द्यावी. पूर्वी सेव्याजी आइतोले साहित्य करीत होते त्याप्रो करावे. करार.

नारो कृष्ण यासी हुजूर आणू. आतःपर त्यास उपद्रव न व्हावा. त्याचे फाजील हिसेबाचे रुईने निघेल ते द्यावे. कलम १

हिसेब मा॥रनिलेनी समजावावा. चौकसीमुले फाजील ठरेल त्याचा निकाल काढू. येणेप्रो सरकारचा जाबसाल आसेल तो मा॥रनिलेनी करावा. येणेप्रमाणे करार

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

येणेप्रा खेरीज नेबादे यैवज देऊ.
येणेप्रो करार.

आम्ही मामलतीची घालमेल करून नवे मामलेदार केले आहेत. त्यांची फाजले निघतील तीं हिसेबाचे रुईने निकाल करून द्यावा. आम्हाकडे बोभाट येऊ देऊ नये. कलम १

मामलेदार हुजूर बोलाऊन आणून दुसरा मामलत करीत आसेल त्याप्रो मामलत कबूल करील तर त्याजकडेच ठेवावी. कबूल न करी तरी त्याचे फाजिलाची वाट हली नवे मामले-दाराची वाट होते त्याप्रो त्याची करून देऊ. येणेप्रा करार. [अपूर्ण. एक बंद गहाळ असावा.]

¶*Terms of agreement between Peshwa Madhaorao and his uncle Raghoba. The demands are put forth by the uncle and Madhaorao records his assent or remarks thereon.*

No. 75] *[1768?*

श्री

सेवेसी हरी बलाल कृतानेक साष्टाग नमस्कार विज्ञापना. राजश्री चिंतोपंत तात्यानी सांगितले की, श्रीमत् राजश्री दादासाहेबास यैवज द्यावयाचा करार श्रीमत् राजश्री रावसाहेबानी केला. ते समई दोन लक्षांचा हवाला तुम्ही द्या म्हणून आज्ञा केली. त्याजवरून आम्ही आपले जातखत राजश्री विष्णुपंत गद्रे व त्रिबक नाईक यांस लेहून देऊन, उभयतांपासून दोन लक्षाच्या चिठ्या श्रीमत् दादासाहेबास लिहून देविल्या. सांप्रत त्या चिठ्या सुटल्या. त्यास उभयतां-पासून आमच्या चिठ्या निघाल्या पाहिजेत, यास्तव आमचे हवाली कराव्या. त्याजवरून आपणांस लिहिले असे. दोन्ही चिठ्या याचे हवाली कराव्या. हे आपल्या चिठ्या घेऊन त्यास देतील. परभारे सावकारास न द्याव्या. हे विज्ञापना.

¶*Hari Ballal to Nana Fadnis (?), asking for the two promissory notes passed by Chintopant in payment of the debts of Raghunathrao.*

1847

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

पो छ २२ मोहरम सन तिसा

श्री

शेवेसी विज्ञापना. येथील वर्तमान ता। छ १९ मोहरम मुकाम का। राहुरी तालुकेमजकूर येथास्थित असे विशेष. स्वामींनी कृपापत्र छ १५ मोहरमचें पाठविलें ते पावोन आनंद जाहाला. याच प्रकारें पत्री सांभाल व्हावयाची आज्ञा जाहली पाहिजे. इकडील वर्तमान तरी छ १६ मोहरमी धनगरटाकलीहून कूच जाले ते पारनेरावर मुकाम जाहला, तेथून दुसरे रोजीं मौजे निंबगांव परगणे पारनेर येथें मुकाम जाहला. तेथून काल कूच करून मुकाममजकुरास आले. राजश्री गोपालराव आपले फौजेसुद्धां पुढेंच राहुरीचे मुकामानजीक येऊन राहिले होते. त्यास काल भेटी जाहाल्या. त्याजबरोबरचा तोफखाना व इकडील तोफखाना व फौज येके जागा जाहाली. गोविंदराव गाइकवाड याणीं धनगर टाकलीचे मुकामी येऊन मिलावे. त्यास च्यार पांच रोज चालवाचालव केली. याजकरितां गोविंद सिवराम व रामचंद्र गणेश याजबरोबर फौज देऊन रवाना केले होते. त्यास दोन तीन कोसांवर गेले, तों त्याचें कूच होऊन आलें. त्याजवरून फौज माघारी आली. गाइकवाड येऊन मिलाले. न येते तरी जसे येते त्या तऱ्हेनें आणावे, याप्रमाणें फौज पक्याच बंदोबस्तानें गेली होती. माहादजी शिंदे दोन हजार फौजेनिसी येऊन परवां दाखल जाले व आपली हुजुरात व पाग्ये येऊन तमाम दाखल जाले. सारी फौज वीस हजार पावेतों जमा जाहाली. आणखी येतच आहे. नामी सरदारापैकीं मालोजी नाईक निंबालकर व वणगोजी नाईक निंबालकर व राणोजी निंबालकर व सुभानराव पाटणकर व मान्ये व प्रत * * * * के सरदार आले नाहींत. बाकी झाडून येऊन हजर जाहाले. श्रीमंत राजश्री दादासाहेबाचा मुकाम वाकी नजीक पुणतांबें येथें आहे. दाहा हजार फौज लाहानथोर जमा जाहाली आहे. तुकोजी होलकर आपले ठिकाणीच आहेत. गंगोबा, होलकरापासून थोडकासा पुढें येऊन राहिला आहे. निखालस तिकडे जात नाहींत, व त्रिंबकराव सिवदेवहि जात नाहीं. लक्ष्मणपंत आपटे गंगोबाकडे गेले होते ते आले. त्याजवल गंगोबानें सांगितलें की मी काय करावें ? जवल दादासाहेब आले, याजमुळें उग्याच त्याजसारिख्या गोष्टी बोलाव्या लागतात ; परंतु माझें लक्ष स्वामीकडे आहे. याप्रमाणें जाबसाल होऊन थोरल्या श्रीमंताची भेट घेऊन लक्ष्मणपंत आले. बालोजी पलांडे गेले होते तेहि आले. गोपालराव गोविंद याजकडे दादासाहेबीं सिशा, पत्र देऊन पाठविला तो परवा येऊन गोपालराव यास भेटला. त्याचा मजकूर आम्हांपासून काय अंतर पडिलें ? केदारजी सिंदे

1848

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

आपण होऊन आले, त्यास मातबराचे हातीं देऊन पाठवावे असें आम्हीं म्हणत असतां फौज जमा करून चालोन येतात. त्यास तुम्ही मध्यस्त आहां. ऐशास याचा विचार करून लिहून पाठवणें. विचार न जाहाल्यास उठोन हुजूर येणें म्हणोन लिहिलें आहे. त्यास तें पत्र श्रीमंताकडे गोपालराव याणीं पाठविलें. ऐशास त्याचा सावसाल आज उद्यां आज्ञा होईल त्याप्रमाणें जाईल. आपली फौज फार चांगली जमा जाहाली आहे. याउपरी गाट मात्र पडावी! पडिल्यास विलंब लागणार नाही. फौजेचा तिकडे दबाव भारी पडिला. विठलराव मामा थोरल्याकडून काल आले; काय जाबसालाकरितां आले आहेत हें अद्याप (ठीक) लागलें नाहीं. कलल्यावर सेवेसीं लिहीन. सेवेसी (श्रुत होय हे विज्ञापना.)

¶*Details of Madhaorao's preparations to meet his uncle in an engagement.*

No. 77] *[4-6-1768*

पौ छ २४ मोहरम

श्रीगजानन

श्रीमंत राजश्री रावसाहेब स्वामीचे शेवेसी

विनंती. शेवक सदाशिव गोपाल कृतानेक सां नमस्कार विनंती विज्ञापना. येथील क्षेम ताा छ १८ माहे मोहरम मुकाम किले भेलसे स्वामीचे कृपेअवलोकनेकरून येथास्थित जाणून स्वकीये कुशल लिाा आज्ञा केली पाहिजे. पूर्वी शेवेसी विनंतीपत्र लिहिले आहे त्यात कितीका प्रकारचे वर्तमान आइकिल्या पदार्थाचे लिहिले होते. हली छ ५ मोहरमची पत्र बातमीची आली ती छ १५ रोजी भेलशास आली. तेथे वर्तमान की, श्रीमंताचा उभयेताचा कलह प्राप्त जाला. उभयेपक्षी फौजबंदी आहे. सबब की, श्रीमंत राा दादासाहेबानीं दतपुत्र भुसकुटियाचे मूल घेतला. आमृतराव नाव ठेविले. वृतबंध व लग्न करणार. यांकरिता श्रीमंतास बहुतच विशमता लागली आहे. पाहावे कोणे रीतीने रहश घडेल. श्रीमंत नाना सुखरूप आहेत. श्रीमंत रावसाहेब यांच्या घरास आले. बहुता प्रकारे समाधान केले. तलेगाव दाभाडियाचे याजला दिल्हे. याणीहि हती घोडी वगैरे बहुता प्रकारे श्रीमंतास खुसी केले. उभयेतासी रहश जालियानंतर हिंदुस्तान प्रांती येणार ऐसे आहे. स्वामीस कळावे. बहुत काये लिहिणें? कृपा लोभ करीत जावा, हे विज्ञाप्ति.

¶*Sadashiv Gopal writes to Vishwasrao Laxman of Zansi. The letter contains the news of the estrangement between the Peshwa and his uncle Raghunathrao on account of the latter having adopted a son (Amritrao). It is also stated that the Peshwa, after concluding peace with his uncle, intended to proceed to the North.*

1849

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 78] [5-6-1768

पो २२ मोहरम सन तिसा

श्री

सेवेसी विज्ञापना ताा छ १९ मोहरम मुक्काम कसबे राहुरी वर्तमान यथास्थित असे विशेष. स्वामींनी छ १९ मोहरमचे पत्र पाठविले ते (पा)वले. इकडील वर्तमान तर राजश्री गोपालराव काल भेटले. दोन्हीं फौजा एकत्र जाल्या. याउपरी जो विचार होईल तो लिहून पाठवूं. श्रीमंत दादासाहेब यांचा मुक्काम वाकी नजीक पुणतांबे येथें आहे. तुकोजी होलकर येणार होते ते आलियावर कूच करणार होते. त्याजकडे फौज सदाशिव रामचंद्रसुद्धा आठ नवहजार जमाव * हजार जमा जाली. नित्य फौज येतच आहे. कलावे. आज कूच जाले. प्रवरेवर मुक्काम होईल. उदैक श्रीमंत कैलासवासी नानासाहेबांचे श्राद्ध आहे, याजकरितां गंगातीरास नेऊरगांवास जातील. तेथेंच मुकाम होईल. पुढें चालणे ते गंगातीरानेच जिकडे जाणे तिकडे जातील. परस्पर झुंजावयाचा प्रसंग आहे. विवेक येकीकडेहि नाहीं. श्रीकृपेकरून घडेल ते खरे; सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Haripant Phadke reports to Nana Fadnis the position of the two armies of Madhaorao and Raghunathrao before their fight commenced.*

No. 79] [5-6-1768

पो छ २२ मोहरम तिसा

श्री

सेवेसी विज्ञापना. येथील वर्तमान ताा छ १९ मोहरम मुाा कोा राहुरी कूच जालें. यथास्थित असे विशेष. येथील वर्तमान, राजश्री गोपालराव काली प्रहर रात्रीस डेऱ्यास येऊन भेटले. त्याची फौज सारे मिळून अजमासे दाहा हजार आहे. आपलीहि फौज हुजरांत पांच सा हजारपर्यंत जमा जाली. आणखी रोज येतच आहेत. (फाटले) * (गाये)कवाड पांचसें होलकराकडील लोक देसचे व गाव * * * च्यार पांचसें याप्रमाणें आले. कृष्णाजी जिवाजी पवार आपले घराहून बाइका घेऊन निघाले. त्याकडील तीनसें स्वाराची गाठ पडिली. झुंज होऊन कांहीं जखमी

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

जाले परंतु पनास पाउणसेनिसी येऊन पोचले. त्याजकडे फौज सा हजारपर्यंत आहे. तुकोजी होळकर चांदवडींच आहेत. तात्या आलीकडे चहूं कोसांवर आहेत. पांचसासे स्वार जमा आहेत तें मिलतील. तुकोजीस आणावयासी बालोजी पलाडे व दादोपंत वाघोलीकर गेले होते ते आले. त्यास त्याणी सांगितलें मजवल फौज नाहीं. मी बेमान व्हावयास कोणीकडे येत नाहीं. तात्या जाणें, तुम्हीं जाणा. याप्रमाणें आहे. आपली फौज पंधरा हजारपर्यंत चांगली जमा जाली. (फाटले) * * * * * * * * * आहेत. आतां त्यांसहि विचार बहुत पडिला आहे. येथें जत फार चांगला जाला. गाठच पडणें तर दोचों दिवसांत पडावी. पंचवीस तीस कोसाची तफावत मध्यें आहे. विठलराव गाडगीळ यास त्याणी लाऊन दिल्हे ते येथें काली आले. हे ठेवितात कीं नाहीं तें पाहावें. पुढें होईल तें लेहून पाठऊं. सेवेसीं श्रुत होये हे विज्ञापना.

¶*A news-letter from the Peshwa's camp at Rahuri. The Peshwa is marching towards Nasik, against his uncle Raghunathrao.*

No. 80] *[7-6-1768*

पौ छ २३ मोहरम
तिसा जेष्ठ बा रायभानजी
जथे बयाजी गणजी

श्री

अपत्यें मोरो बाबूराव सां नमस्कार विनंती. ता छ २१ मोहरम मु नेऊरगांव गोदातीर वर्तमान यथास्थित असे विशेष. आपण छ १९ मोहरमचे पत्र पा तें पावलें. इकडील वर्तमान तर काल येथे मुकाम जाहाला. आज कूच जाले. आवलगावी मुकाम चहू कोंसाचा नेमिला आहे. तिकडील वर्तमान तर पाटोद्यांनजीक त्यांचा मुकाम जाला होता. आज वैजापुरानजीक येऊन राहणार. आजचे मुकामाहून त्यांस आपल्यांस पंधरासोला कोसांचे अंतर राहील. लौकरच गांठ पडेल. आपली फौज वीस हजार जमा जाली. नित्य पांचसेसातसे राऊत येतच आहेत. पुढे होईल तें लिहून पाठऊ. मागाहून सविस्तर लिहून पा हे विनंती.

¶*This letter of Moroba Dada gives the movements of the two armies, the Peshwa's and the Raghoba's, before the fight took place.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 81] [*7-6-1768*

पो छ २३ मोहरम तिसां जेष्ट
हस्तें रायभानजी जथे बायाजी
गणजी

श्री

सेवेसी विज्ञापना. ताा छ २१ मोहरम मुाा जेऊरगांव गोदातीर वर्तमान यथास्थित असे विशेष. श्रीमंत राजश्री दादासाहेब येवल्यापलीकडे तीन कोसांवर आले आहेत. श्रीमंत या मुकामाहून तिकडेच जाणार. फौजेचा मजकूर पेशजीं लिहिला आहे. जिवाजी पवार इकडे येऊन भेटले. त्रिंबकराव सिवेदव त्याजकडे गेले म्हणोन पेशजी लिहिलें आहे; परंतु अद्यापि वोढ्यासच आहेत. जातील न जातील. गांठ लौकरच पडेल. होईल तें लेहून पाठऊं. दोन रोज पाऊस पडू लागला. गंगो(गंगेस) पाणी आलें आहे. कलावे हे विज्ञापना.

¶*Haripant Phadke reports the position of Raghunathrao and the arrival of Jivaji Pawar to Madhavrao.*

No. 82]

पो छ २७ मोहरम सन तिसा

श्री

विज्ञापना ताा छ २२ मोहरम मुकाम अवळगाव परगणे वैजापूर वर्तमान यथास्थित असें विशेष. इकडील वर्तमान आज कूच जालें. वैजापुरावर मुकाम होईल. श्रीमंत राजश्री दादासाहेब येवल्याआलीकडे सा कोंस आले होते. त्यास आपली फौज भारी मिळाली. ही आवाई खाऊन मागें सा(हा) कोंस हटोन गेले. त्यांजवळ फौज मिळाली आहे. त्यांत मातबर होळकर; त्यास त्याचें मत तेथें राहावयाचे नाहीं. निकाल पाडून येणार. गंगोबा मात्र मन:पूर्वक आहेत. त्रिंबकराव शिवदेव वोढ्यासच आहेत. ते * * * * कडे लौकरच येतील असें दिसतें. आपली फौज पंचवीस हजारपर्यंत जमा जाली. अशी फौज कधींहि जमा जाली नवती. नित्य फौज येतच आहे. श्रीकृपेंकडू-(रू)न उत्तमच होईल. श्रीमंत दादासाहेब कूच करून इकडे येत होते तें समयीं तुकोजी होळकर यास मसलत पुशिली; त्याणी सांगितलें कीं आपल्याच्यानें झुंजवत नाहीं व तिकडेहि जाऊन तुम्हाशी झुंजत नाहीं; उठोन चांदवडास जातों. त्याजवरून अवसान गेलें. सा(साहा) कोंस माघारें कूच केलें.

1852

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

धोडपेस जाणार असें वर्तमान आहे. आम्ही पाठीमागून दरकूच जात असों. त्रिंबकराव शिवदेव वोढ्याहून निघाले. आजउद्यां आपलें लष्करांत येतील. कळावें. सारांश गोष्ट त्यांजकडील मनसुबा कचा जाला. श्रीकृपेनें श्रीमंतास यश येईल. कळावें पुढें होईल तें लिहून पाठऊं. होळकराचें मतें रसायण करून द्यावें असें आहे; परंतु हे कोठें ऐकतात? घडेल तें खरें. सेवेसी श्रुत होय हें विज्ञापना. रवाना छ २३ मोहरम मुकाम वैजापुरापुढें दोन कोंस आज कूच जालें, दाहाबारा कोंस जाऊं हें विज्ञापना.

¶*Haripant Phadke describes the position of the two armies before the fight commenced.*

No. 83] [*10-6-1768*

श्री

सेवेसी विज्ञापना. येथील वर्तमान ताा छ २४ मोहरम भृगुवार मुकाम कसबे पाटोदं कूच जालें विशेष. धणगरटाकलीहून गुरुवारीं कूच जालें तें दरमजल सोमवारीं शस्टीस गंगातीरीं जेऊर गांवास उतरतिरीं मुकाम जाला. शस्टीचें श्राध जालें तेच दिवशीं गंगेस रात्रौ पाणी येऊन उतार मोडला. तेथून मंगलवारीं कूच करून आवलगांव गंगातीरीं मुकाम पांच कोसाचा जाला. श्रीमंत दादासाहेब मौंजे वाकी परगणे चांदवड येथें चांदवडापासून सा कोसांवर होते. त्याणी रविवारीं कूच करून पुढें सा कोस सावरगावास आले. सोमवारीं कूच जालें. येवल्याचा मुकाम नेमिला. बुनगें बिनी पुढें आलीं, तों गोपालराव आले म्हणोन लस्करांत आवई पडली त्याणें गडबड फारच जाली. तसेच रव मावारी फिरून च्यार कोस माघारा मुकाम केला. तेथें पर्ज्यन्यानें लस्करावर अतिवृष्टी फार केली. दोन वोढे होते त्यांस पूर अतिशय आला. त्याणें तटें घोडी जीन कांहीं वहावले. येक दोन पालख्याहि वहावल्या. ढाला तीन कोसांवरून आणिल्या. मंगलवारीं त्याचा मुकाम बेजापुरापासून दोन कोसावर देवठाणास येणार असी बातमी आली, त्यामुळें आपली मजल हलकी नेमली होती. फिरोन माघारे फिरल्याची बातमी येताच देवठाणास बारा कोस आले. तेथून काल चौदा कोस येथें आले. ते लांब मजली करून परवां बुधवारीं धोडपे-खालीं धोडांब्यास आले. बरोबर फौज पांच सा हजार, तोफा वीस, सदाशिव रामचंद्र आहेत. कालीचा मुकामच तेथें केला. माचीस किल्यावर जावें

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

असाहि मजकूर ; दुसरा एक लढाई द्यावी असेहि * * * * * * मुकाम धोंडाब्याचे आलीकडे दोन कोस नेमला आहे. तुकोजी होळकर त्याचे लस्करांत येक दिवस आले. त्याणी सांगितलें आपण कोणासी झुंजत नाहीं. दोन कोस लांब राहिले होते. दुसरे दिवसीं उठोन चांदवडास गेले. श्रीमंत माघारे फिरल्यावर गंगोबा तात्या येक रोज होते. दुसरे दिसीं कूच जालें. भोजनास मागें राहिले. खासा स्वारी गेलियावर अणकाई किल्यास गेले. त्याणी पांच माणसानिसीं आंत घेतले. किल्यावर जाऊन राहिले ; त्यासी बोलावयासी लक्ष्मणपंत आपटे काली पाठविले होते. त्यास पेठेत घेतले नाहीं. गंगोबा येथें नाही म्हणून सांगितलें. पुढें आल्यास गोळी मारूं म्हणून सांगितल्यावर हे माघारे फिरोन आले ; परतु ते ग्रहस्त तेथेंच सडे आहेत. माघारे फिरले ते दिसीं कारभारी याणी मनसबा केला होता जाल्या कर्मास आतां टाला देऊं नये ; झुजोन मरावें उत्तम पक्ष ; नाहींतर सडे होऊन खानदेशांतून दरमजल वराडांत भोंसल्याकडे जावें याप्रमाणें करून चिंतो अनंत पुढें निघोन गेले. याणी जावें तर श्रीमंतानी सांगितले जे आमचे वस्तू येवत नाहीं. पांच लक्ष रुपये गुन्हेगारी आपणांपासून घ्या. स्वसंतोषें देतों. आणि तुम्ही झुंजा आपण झुंजत नाहीं ; माझी त्याला पित्रुहत्या घडेल. त्याची मला घडेल. यामुले झुंजत नाहीं असें सांगितलियावर साराच मनसबा राहिला. चिंतो अनंत दोन मजली गेले त्यास माघारे आणिले. फिरोन मागती जाणार आहेत. असीहि बातमी आली. त्याचे लागास खानदेशांत मानाजी निकम व परकाले यास रवाना केले आहेत. कारभारी याची मुलेंमाणसें धोडपेवर आहेत. खासा आनंदवलीस जाऊन श्रीत्र्यंबकेश्वरास जावें असीहि आवई घातली ; परंतु धोडपेस आहेत. आपली फौज फार जमा जाली. रोज येतच आहे. पंचवीस हजारपर्यंत अजमास जाला आहे. शाहाजी भोसले सरलस्कर, प्रतिनिधी, यावयाचे आहेत. होलकरांकडून संताजी वाबले आले होते. बोलोन चालोन गेले आहेत. तुकोजी होळकर आज येतील. त्र्यंबकराव सिवदेव, धोंडो दत्तात्रेय तिकडे गेले नाहीं. त्रिंबकरायानीं मुलें माणसें हातगडास अगोधरच त्यांचीच परवानगी घेऊन नेलीं. सडे मात्र घरीं होते. त्याची चौकी लोकर येण्याविसीं होती. येथूनहि कारकून गेले होते. त्यास तजविजीनें निघोन येतों म्हणून सांगोन पाठविले. त्याप्रमाणें गांवींहून निघोन इकडे येतात. आज येतील याप्रमाणें वर्तमान आहे. काली गोपालराव यास पत्र श्रीमंत दादासाहेबाचें आलें कीं चिरंजिवानीं निकर्षच आरंभिला आहे. त्यास दोनच्यार अन्याय त्याजकडूनच

1854

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

जाले. तुम्ही मध्यस्त आहां. आणशफत केली. तुम्ही आहे त्याचें स्मरण धरणें. चिरंजीव तुमचें न आइकत तर तुम्ही इकडे यावें, असा करार आहे त्याप्रमाणें यावें. असें पत्र त्रिंबक शागीर्द घेऊन आला होता. सेवेसीं श्रुत होय, हे विज्ञापना.

¶*Description of the fight of Dhodap between Madhaorao and his uncle. The details are graphic and interesting.*

No. 84] [*11-6-1768*

श्री

सेवेसी विज्ञापना. येथील वर्तमान ताा छ २९ मोहरम पावेतों येथास्थित असें विशेष ; काल भृगुवारीं पाटोद्याहून कूच करून मुकाम मजकुरास सोला कोस आले. श्रीमंत राजश्री दादासाहेबाची फौज धोडप किल्याचे पाईं राहिली होती, तिजवरी आपल्याकडील सड्या फौजेनें चाल केली. श्रीमंत राजश्री दादासाहेब सकालचे प्रहर दिवसास लस्कराहून निघोन किल्यावरी गेले. फौजेत चिंतो विठल व गणेश विठल, हरिपंत भिडे, मोरो विठल, केदारजी सिंदे, सदाशिव रामचंद्र होते. त्याणी ज्या ठिकाणावर होते ते ठिकाण सोडून दीड कोसावरी चालून आले. तोफखान्याची मात्र येक दोन वेलां रंजक[1] झडली ; इतक्यांत आपले फौजेनें गांठून क्षणमात्र लाडाई चिंतो विठल होते तेथें जाहाली. मोरो विठल जखमानी काईल होऊन घोड्यावरून पडिले. चिंतो विठल हतीवरी होते ते मोरोपंतास काढावयानिमित्य उतरतां आपले फौजेची दाटी जाहाली याजमुलें पाडाव जाहाले. उजवे हातास मनगट फोडून गोलीची जखम लागली आहे. मोरो विठल मध्यरात्र पावेतों होते. उपरांतिक देवाज्ञा जाहाले ! लडाईसमईं हरिपंत भिडे गणेश विठल व केदारजी सिंदे निशाणाजवळ होते ते मोड जाहाला. हे स * * * * पंतास दोन जखमा येक * * * * * सदाशिव रामचंद्र अगदीं पलोन गेले. राहिली फौज तमाम लुटली गेली. किल्याचे माचीपावेतों लूट जाहाली. लडाईचे अवसरांत दोन घटिका पर्जन्य पडिला, याजमुलें लोकास जावयास थोडासा अवकाश सांपडला. सिंहगडास लुटीची अवस्था जाहाली, त्याप्रमाणे जाहाली ! दोनच्यारसें उंट लस्करांत आले. घोड्यास नीत (?) नाहीं, दाहा पंधरा हती आले. सदाशिव रामचंद्र आदिकरून कांहीं राहिले नाहीं. चितो विठल बरदास्तीस आपले राहुटीस आणिले आहेत.

---

१ सिलक, फेर.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

आपले फौजेत दाहापांच जखमी, दोनच्यार ठार होतील, याप्रयाणें लढाईचा प्रकार जाहाला. श्रीमंत राजश्री दादासाहेबाकडे बालाजी कृष्ण ठोसर गेले. त्याजपासी बोलिले. जेंजें होणें तें ईश्वरइच्छेनें जाहालें पुढें तुमचे मुदे काये आहेत ते सांगावे. आम्हांकडे बोलावयाचें राहिलें नाहीं, म्हणोन भाषण जाहालें. सरकारांत येक खजिन्याचा उंट दाहा बारा हजार रुपयाचा ऐवज आला ; खासगी पैकीं किरकोळ सनगें दाहावीस आलीं. तोफा आल्या. याप्रमाणें वर्तमान जालें. डावे बाजूस गोपालराव, उजवे बाजूस होलकर सिंदे, मध्यें हुजरात होती सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Details of the fight of Dhodap.*

No. 85] [*11-6-1768*

श्री

सेवेसी माहादाजी बलाल व हरि बलाल व बाजी गोविंद कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागाईत छ २९ मोहरम मुा नजीक धोडप च्यार कोस वर्तमान यथास्थित असे विशेष. इकडील वर्तमान काल छ २४ रोजीं पोटेद्याहून कूच करून श्रीमंत धोडपेजवल फौजसुधां आले. श्रीमंत राजश्री दादासाहेब किल्याचे आश्रयानें मुकाम करून राहिले होते. आपली फौज द्रिष्टीस पडतांच श्रीमंत राजश्री दादासाहेब किल्यावर गेले. वरकड फौज व सरदार सारे खालीच उभे राहिले होते. तिकडील इकडील तोफांची मारगिरी होत होती. आपलेकडील तोफा पलेदार होत्या. त्याची मारगिरी होतांच तिकडील फौज उधलली. दोहीकडील फौज, आपल्या उजवे बाजूस राजश्री तुकोजी होळकर व महादजी शिंदे व राजश्री नारो शंकर होते. डावे बाजूस राजश्री गोपालराव रास्ते होते. हुजरात मधीं होतीं. दोहीकडील फौज उठतांच तिकडील फौज फार करून पलाली. चिंतो विठल हतीवर होते ; उभे राहिले थोडीशी तरवारेची लडाई जाली. चिंतो विठल यांस उजवे हातचे पंज्यास गोलीची जखम लागली ; भारी आहे. पाडाव आले. मोरो विठल याचे मानेस * * * जखम भारी लागली. गोटांत आल्यावर मृत्यु पावलें. सदाशिव रामचंद्र पलाले. वरकड सिंदे, आबाजी माहादेव आदीकरून किरकोल मंडली किल्यावर पलोन गेले. गोट अगदीं लुटला गेला. विशेष कांही लडाई पडली नाहीं. सायंकाळीं मुकामास आलों. आज कूच दोन कोसाचें आहे. धोडांब्यांवर मुकाम होईल. श्रीकृपेनें श्रीमंतास येश आले. याउपरी होईल मजकूर तो लिहून पाठऊ. बहुत काय लिहावे शेवेसी श्रुत होय, हे विज्ञापना.

¶*The defeat of Raghunathrao's army at Dhodap is reported, probably to Nana Fadnis, by Mahadaji Ballal, Hari Ballal and Baji Govind.*

1856

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 86] *[11-6-1768*

पो छ २९ मोहरम सन तिसा
बा। खास जिलबीचे लोक

श्री.

चिरंजीव राजश्री नारायेणराव यासी माधवराव बलाल प्रधान आसिर्वाद उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय लिहित जाणें. विशेष. चिंतो विठल याचें वतन खानदेश प्रांतीचें वगैरे आहे तें कमाविसदारांस लिहून जफ्त करणें. वसूल त्याजकडें न जाई ते करणें. मारनिलेचे बंधू गोविंद जोसी पुण्यांत आहेत त्यास चौकी ठेऊन बंदोबस्त करणें. रा। छ २९ मोहरम सुा। तिसा सितेन मया व अलफ. याखो। तिकडील ग्रहस्ताकडे व तीर्थस्वरूपाकडे गाव, खेडी, जमिनी बाग, कुरणें वगैरे जे असेल ते झाडून जफ्त करणे. माहाली माहालच्या आसाम्या दूर करणें. छ मजकूर गंगाधर यशवंत याचे माहाल गाव, खेडी कुल जफ्त करणें. रा। छ २९ मोहरम हे आशिर्वाद.

¶*Peshwa Madhaorao asks his brother Narayanrao to attach the vatan of Chinto Vithal, Gangadhar Yeshvant and also those villages that were handed over to Raghunathrao*

No. 87] *[13-6-1768*

श्री

सेवेसी माहादाजी विस्वनाथ लिमये साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता। छ २७ मोहरम मुकाम धोंडप वर्तमान येथास्थित असे विशेष. उभयेतां श्रीमंताचे लढाईचें वर्तमान विदित जाहालेंच आहे. दुसरे दिवशीं मंदवारीं किल्याखालीं जाऊन तोफा लागू केल्या. खासा स्वारी सा घट(का) रात्रपर्यंत खालींच होती. किल्यावरून श्रीमंत राजश्री दादासाहेबानीं राजश्री आबाजी माहादेव व हरिपंत भिडे यांस बोलण्याकरितां पाठविलें. त्यांजबरोबर साफ सांगोन पाठविलें कीं आपण सर्व प्रकारें वडील, आपण पुण्यास यावें. येके जागां रहावें. वरकड विचार कशास पाहिजे? तेव्हां उत्तर आलें कीं आपल्यास माहायात्रेस जाऊं द्या, तेथें राहीन. तेथील बेगमी करून द्या; तें नाही तरी आपला सरंजाम आपणाकडे माहाल ठेवावे किले आपले द्या. अशा कितेक गोष्टी होत्या; परंतु निदान याचें एकच कीं निरालें स्वामीनीं राहूं नये. पुण्यांत स्वस्थ राहावें; तेव्हां शनवारचे रात्रीस त्याणी विच्यार करून रविवारीं प्रात:कालीं सांगोन पाठविलें कीं आम्हीं भेटीस येतो. दोन प्रहरा भोजनास येतो. स्वयेंपाक तयार करावा. मला वडील कैलावासी नानासाहबाप्रमाणें म्हणतां. याउपरी तुमच्या मर्जीस येईल तसें

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

चालवावें, असें सांगोन पाठऊन दीड प्रहर दिवसास किल्यावरून खालीं उतरून उभयेतां येका हतीवर बसोन डेऱ्यास दाखल जाहाले. तदोत्तर बोलण्याचा मजकूर किलेयाचा बंदोबस्त सर्व तुम्हीं करा; परंतु नांव मात्र आमचें चालवावें. वरकड माहालचा ऐवज दाहा लाखाचा आपला आपणाकडे चालवावा, व तूर्त दोन महिने आनंदवलीस राहावें. उपरांत पुण्यास यावें. मागील करारापैकीं सावकारी निशा जाली आहे. कागदपत्र सावकाराचे आहेत तो ऐवज द्यावा. याप्रमाणें बोलण्यांत आलें. त्याचें उतर जाहालें कीं आनंदवलीस राहावयासी अनकूल इतकी फौज घेऊन पडत नाहीं. दिवसें दिवस, नद्या भरतील. प्रज्यन्य काल, तेव्हां पुण्यासच यावें. तें कबूल केलें कीं च्यार दिवस गंगातीरीं मुकाम करावें. श्रीत्रिंबकेस्वराहून बाइका आणून आतांच येतो. किलेयाचा बंदोबस्त तुम्हीच करा. नांव मात्र आपले चालवावें. ते हिकडून निम रजा वंदीची (?) जाली आहे. करारांत येईल तेव्हां खरें. सावकारी निशा मागें आनंदवलीचे मुकामची जाली आहे तो ऐवज द्यावा. त्यास उत्तर जाले कीं आम्हांस फौज ठेऊन यावें लागले. मसलत पडली. याजमुलें ऐवज पावणार नाहीं. सुरलीत निभावणी जाली असती तरी कराराप्रमाणें पावता. पुढील दाहालाख दरसाल द्यावे ते पुण्यांत गेल्यानंतर सर्व बंदोबस्त होईल याप्रमाणे जाबसाल जाला; निदानी जसे ठेवाल तसे राहूं, बंदवानचे मूल जाहालेंच आहों. सारांश पुण्यांत येऊन राहावें. कांहीं अडखाळूं नये. चालत नाहीं असा मजकूर आहे. याप्रमाणें मनसबा घाटतो. ठरतां ठरेल तो खरा. वरकड वर्तमान तरी राजश्री गंगाधरपंत तात्या आणकाईस पलून गेले होते. त्यांस आणावयासी राजश्री राघो बावाजी शंभर राऊतानिसी पाठविले आहेत. त्याचे पुत्र पारोल्यास पलून गेले तेहि ठिकाणीच आहेत. अटके दाखलच. गुता नाहीं. राजश्री चिंतो अनंत भोसल्याकडे गेले त्याचे कबिले मुलेंमाणसें सर्व धोडपेवर होतीं तीं खालीं आणविलीं. राजश्री चिंतो विठल याचीं माणसें व आबाजीपंताचीं खालीं आणिलीं. पुण्यांत राहावी असें होईल. चिंतो विठल जखमी, गोलीची जखम हातास आहे. भारी जखम परंतु उतार पडेल. त्याचे भाऊ मोरो विठल मृत्य पावले. वरकड त्याजकडील मंडली कांही येथें आहे. कांहीं पलाली जिवंत आहे. केदारजी शिंदे येथेंच आहेत. कांहीं पलाली जिवंत आहे. केदारजी शिंदे येथेंच आहेत. अवचितराव येथे आहेत. दादो उधव पलाले. किल्यावरूनच त्याजकडील जखमी से दोनसे, ठार चालीसपनास, याप्रमाणें वर्तमान आहे. लढाईपूर्वी स्वामीस दोन तीन पत्रें पाठविलीं आलीकडे दोन यासुधां. कलावें. उत्तर पाठवावयाची आज्ञा जाहाल्यास सेवकास संतोष होईल. याउपरी पुण्यास यावयाचा रंग आहे. लौकरच येणें होईल. फौजेस

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

निरोप होईल असें आहे. तालुका सुटला आहे. अशांत शागीर्दाची सोये मर्जीस आल्यास करावी. स्वतंत्र चाकरी करावी हीच उमेद आहे. कृपा असों द्यावी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Details of the position of the two armies after the fight of Dhodap.*

No. 88] [*15-6-1768*

पौ छ २ सफर सन
तिसा सितैन मया व
अलफ आशाढ शुा

श्री

वेदशास्त्र संपन्न राजश्री रामशास्त्री
स्वामीचे सेवेसी

विद्यार्थी माधवराव बलाल प्रधान नमस्कार विनंती. उपरी : येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहीत जावे विशेष. खासा स्वारी पुण्याहून निघोन गंगातीरास आली. त्यास तीर्थरूप राजश्री दादासाहेब याची गाठ किले धोडप येथे किल्याखाली पडली. छ २४ मोहरमी युध्ध जाले. त्याचा मोड जाला. फौज व बुनगे सर्व लुटले गेले. तीर्थरूप तो फौजा नमूद होताच आगोधर किल्यावर गेले. दुसरे रोजी माचीस मार दिल्हा, तेव्हा संदर्भ खाली आला. उपरांत दुसरे रोजी छ २६ मोहरमी येऊन भेटले. वडीलपण खावंदपणे असावे. आमचे म्हटले सर्व ऐकावे. याप्रो करारांत आले आहे. सरांश तीर्थरूप शाबुतिनिसी भेटले. ज्या ज्या लोकानी लबाड्या केल्या ते फजीत पावले. हे संतोशाचे वृत तुम्हास कलावे म्हणून लिहिलें असें. रा छ २९ मोहरम सुा तिसा सितैन मया व अलफ. बहुत काये लिहिणे, हे विनंती.

¶*Peshwa Madharao reports to Ramshastri how he fought with his uncle and vanquished him.*

No. 89] [पो *17-6-1768*

पौ छ १ सफर

श्री

शेवेसी. येसाजी जासूद विज्ञापना ऐसीजे:—साहेबाची आज्ञा घेऊन निघालो तों मजल दरमजल डाग चौकीचे जासुदाचा बंदोबस्त गावोगाव करीत वैजापूरचे सुमारे आलो. त्यास वाटेस लस्करचे वर्तमान ऐकिले की, श्रीमंताचा मुकाम

1859

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

पाटोद्यावर होता. त्यास सुकृवाराचे दिवसी खासा स्वारी फौजसुधा तयार होऊन तमाम लोकास ताकीद करून रो दादासाहेबावर स्वारी केली. आण लढाई दोन प्रहर रायांची त्यांची जाहाली. मग रो गोपालराव यानी फौजेहून चालून पुढे जाऊन त्याचे फौजेत मिस(ल)ले. मग दादासाहेबाचा मोड जाहला. धोडपच्या किल्यावर पलोन गेले. केदारजी सिंदे व सदासिव रामचंद्रहि किल्या-वर गेले. गर्दी मोठी जाहली. फौज जिक(डी)ल तिकड गेली. तोफखाना व हाती पाडाव करून आणले. आतां श्रीमंताचे लस्कर धोडपचे किल्याच्या आसपास आहेत. जासुदाची डाग निंबेदेहरपात्रेतो बसली आहे. पुढे काही डाग बसली नाही. याजकरिता लस्करातून जासूदजोड्या आणून बंदोबस्त करीत येतो. साहेबास कलावे. बहुत काये लिहिणे हे विज्ञापना.

¶*News-letter reporting the fight of Raghunathrao with Madhaorao and the former's defeat and resort to Dhodap.*

No. 90] [*24-7-1768*

पौ छ ९ रावल

श्रीशंकर

श्रीमंत राजश्री रावजी

स्वामीचे शेवेसी

पोा गणेश माहादेव व बाजी विठल कृतानेक सां नमस्कार विनंती. येथील कुशल ताा छ ९ रावल जाणून स्वानंदलेखन करावया आज्ञा केली पाा. विशष : — श्रीमंत राजश्री नानासाहेबांची पत्रे छ ५ सफरची पुण्याचे मुकामीहून काल त्रितीय प्रहरी आलीं. पत्रीं मजकूर उभयेता श्रीमंतासी सौरस्य जालें. नानासाहेबास श्रीमंत रावसाहेबी खास स्वारीचा हाती बक्षीस दिल्हा. जातीस जाहागीर गंज बसोदे दिल्हे. बहुता प्रकार गौरव करून हिदुस्थानप्रांतें रवानगी केली. पुणाहून येक मजल आलीकडे आले. तो मागती मुख्याचा हातरोखा आला की, राा गंगाधर येशवंत याजकडील निर्गम तुमच्याविना होत नाही. याजकरिता जरूर येणे. त्याजवरून सर्व फौज नाशकाकडे रवाना करून दोस्या स्वारानसी पुण्यास गेले. याउपर हिदुस्थान प्रांते यावयासी दिवसगत लागत नाही. जलदीने येत आसो म्हणून लिाा आसे. सरदाराची बिदा जाली. इकडील मवासानी दुंडी केली. याचे वर्तमान बहुत गेले. त्याजवरून सरदारास ताकीद इकडे यावयाची आहे. याप्राा वर्तमान आले. आपणास कलावे यास्तव लिहिले आसे. बहुत काये लिहिणे, कृपावृधी करावी हे विनंती.

¶*Baji Vithal reports the reconciliation of the Peshwa with his uncle.*

1860

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 91] [*5-8-1768*

श्रीमार्तंड

पुरवणी श्रीमंत राजश्री रावसाहेब स्वामीस

विज्ञापना. राजकी वर्तमान राजश्री गंगाधर येशवंत याजकडे तीस लक्ष रुपये व्यावेसे करार आणि येक वर्ष पुण्यांत कुटुंबसुधा राहावें यैसे जाले होते, त्यास त्याजकडून तिसा लक्षा रुपयाचा निकाल होऊन न ये यास्तव श्रीमंतानी अधिक वद्य १ प्रतिपदेस समक्ष दिवाणखान्यांत दोन प्रहर दिवसा बोलाविले. तात्याबराबर बाजी विठल मेहुणे व सखंभट व चिरंजीव दादा व आपणसह आले. श्रीमंतांनी रुपयेचे विचारिले. रुपयाचा जाबसाल येथास्थित न जाला. त्याजवरोन श्रीमंत बहू कोपायमान होऊन चौघाचे मुसके बांधले; पायांत आलंकार घालून चौघास छेड्याचा मार विशेष दिला. बाजी विठल यांस तीनसे छडी मोजून मारली, रवत वोकले, त्याप्रा सखंभटास व दाजीस मारिले. तात्यास बारा छेड्या यैशा मारिल्या की रवताचे चिलकांड्या उडाल्या; उपरांतिक चालीस पनास आणखी मारिल्या. काही रुपयाचे काही न बोलत. मग पितापुत्राचे नाका कानांस चाप लाविले ते समई माहा आकांत जाला. यैसी बहुतप्रकारे विटंबना करोन थोरल्या चौकांत दरवाज्यापासी गाड्याचे हवाला आहेत. सर्वत्र जन तमासा पाहात आहे. अद्याप रुपयाचा निकाल जाला नाही. कलावे. सिंदे होलकर निरोप घेऊन गेले. त्रिबक सिवदेव तिकडे कूच होऊन जैनाबादेस गेले. पुढे दर मजल कुबराईस येतील. श्रीमंत राजेबहादर उद्या शनवारी पुण्यास येणार. येथे आलियावर रा। रामचंद्र गणेश वगैरे पथके व राजे बहादर याचे येकचित्त करोन हिंदुस्थानांत रवाना करावे यैसे आहे. येथून फौजा भाद्रपदमासी निघतील. निजामआली भावनगर प्रांती आहेत. भोसलें वराडात आहेत. हेदर नाईक बिदुरात आहे. रा। गोपाळराव गोविंद अश्विनमासी करनाट(क) प्रांती सुभा जातील. श्रीमंत राजेबहादर येथे आलियावर काय रंग होईल पाहावे. श्रीमंत दादासाहेब स्नानसंध्या करोन आहेत. शागीर्दपेशा त्याजवल श्रीमंत रावसाहेबाचा आहे. त्याचा शागीर्दपेशा झाडून इकडे रावसाहेबाकडे आहे. मातुश्रीकडे बटकी देखील कोठीच्या दिल्या. त्यांच्या बटकी कोठीस आहेत. या प्रकारचे वर्तमान आहे. रा। सखारापंत बापू घरी आहेत. बोलाविल्यास दो चौ रोजा दरबारास जाता(त). विशेषात्कारे कारभारास राजश्री मोरोबा फडनीस आहेत आणि स्वता श्रीमंत खबरदार कारभार करितात. रा। त्रिबकराव नारायण यांस पंधरा हजाराची खेडी यावल प्रगण्याची राजेबाहदराकडून श्रीमंतानी देविली. सनद जाली आहे. श्रीमंत राजेबहादर येथे आलियावर त्यास सनद दाखवितील, मग जाबसाल काय

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

होईल पाहावे. मागाहून लेहू. रा गंगाधरपंत तात्या याजपासोन दाहा लक्षाची निशा आली, व होलकराकडे आकरा लक्ष रुपये लाविले. बाकीची निशा होणे. त्यानी तुम्हावर नवद हजार रुपये लेहून दिल्हे आहेत. रा हरिपंत फडके त्याचे कामांत वसुलाच्या आहेत, त्यास आम्हास बोलाविले आणि म्हणाले कीं विश्वासरा (व) याजकडे नवद हजार रुपये तात्यानी लिहून दिल्हे आहेत, तुम्ही त्याचे कारभारी आहां ; नवद हजार देणे. त्यास आम्ही उतर केले कीं आम्हापासी रुा नाही; त्याजला लेहून पाठऊ; ते ज्याप्राा आज्ञा करितील त्याप्राा विनंती करू ; यैसे उतर केले. त्यास गगोबा तात्या बहुत विपतीत आहेत. रा कुशाबास येथे आणून त्याजसेजारी बसविले आहे कोणाची रदबदल श्रीमंत यैकत नाहीत. यैसा प्रकार जाहला आहे. तात्याचे वर्तमान यैसे होऊन मातबर ग्रहस्त बहुत भयाभीत जाले आहे. त्याप्रमाणे संकट सर्वास पडिले आहे. आपणास तपसीलवार वर्तमान लिहिले आहे. नवदी हजाराचा जाबसाल लेहून पाा त्याप्राा उत्तर करू. विशेष इतक्यामध्ये वडिलानी आपली बाजू सरकारांत राखून लाखा रुपयाची जागीर घेत आणि कृपा संपादून घेतली. तुमचा निजध्यास वडिलास लागला आहे. तीन लक्षाचा प्रकार निाा दरबारी म्हणतात. तुम्हाकडून तो हिसेब ती लक्षाचा येत नाही. वडील तो तुम्हावर शस्त्र घेऊन उभे आहेत. त्याचे मनोदयानरूप घडेल तेव्हां त्याचे समाधान होईल. बहुतच आपले ममतेवर आहेत. ते कोठवर लेहू. रा गोपाल केशव याचे नावे मामलत करोन रसद जे मागतील ते द्यावी आणि मामलत करावी या उदेशास फार आहेत. होत मात्र नाही. त्यास आपण सावध राहून रसदेचा जाबसाल व मुछदी याची दरबा(र) खर्चाची हामी व ग्वालेरकराची हामी व पुढें दरबार खर्चास यैवज यैसे पाठऊन दिल्या सर्व येथास्थित घडेल विशेष कार्ये ल्याहावे हे विज्ञापना. श्रीमती कृपा करून खातरजमेस पत्र लिहिले आहे. त्याची कृपा पूर्ण आहे, परतु रुा पाहिजे म्हणजे सर्व खरे. रा अवचितराव नगरी आहेत. त्याजलाहि बोलाऊ गेले आहे. आल्यावरी मागाहून सर्व लिहू. रा गगाधरपत तात्याकडे किले व जाहगीर वगैरे सर्व जमीत अली अहेत. कलावे हे विज्ञापना. ग्वालेरकराची माणसे अजीच प्रातः-काली येऊन बसली आहेत. कजिया करितात. रुा तर नाही. इतका मात्र लाभ आहे. भोग आहे तो भोगिला पाहिजे. लोकात उपहास आहे. श्री इच्छा हे विज्ञापना.

¶*Details of punishment inflicted by Madhaorao on Gangadhar Yashvant Chandrachud at Poona.*

1862

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 92] [*9-8-1768*

पो छ २९ रबिलाखर

श्रीगजानन

श्रीमंत राजश्री रावसाहेब स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक नारो निलकठ कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान तागाईत अधिक वद्य ११ मुकाम नाशिक स्वामीचे कृपेंकरून स्वस्त क्षेम असें. विज्ञापना. बहुत दिवस जाले. आज्ञापत्र सादर न जालें तेणेंकरून चिंता लागली होती. त्यास मुजरद जोडीबराबर आषाढ वद्य ९ चें पत्र आलें तें आर्श्वीक वद्य ७ स बत्तिसा रोजा पावलें. सर्वार्थ शिरसा वंदन केला. उभयतां श्रीमंताचे कटाक्ष्याचें वर्तमान कळत नाहीं तें लिहिणें म्हणून आज्ञापिलें, त्यास हें पत्र रवाना जाल्यावर दो चव रोजा येथून तर आजुरदार काशीद पाठविला तो सेवेसी पावला असेल; त्याजबराबर सविस्तर मजकूर लिहिला आहे, ध्यानारूढ जाला असेल. त्याउपरी आणीखहि दोनतीन विनंतीपत्रें पाठविलीं, पावलीं असतील. श्रीमंत राजश्री दादासाहेबांस राजश्री तुकोजीराव होळकर व राजश्री गंगाधरपंत तात्यांनीं फसविलें. आठ हजार फौजेनसी सामील असों, आणि माहादजी शिंदेहि त्यांजकडे आहेत; परंतु आमचे सूत्रांत आहेत. जिकडे होळकर तिकडे सारी फौज सामील होईल, ऐसें कररमदार करून लाख रुपये आनंदवल्लीचे साहेबाजवळून खर्चास देखील घेतले. परिणामीं येका मजलीची तफावत या त्या फौजेस. ते दिवशीं तुकोजी होळकर निघोन चांदवडास गेले तेणेंकरून सर्व मनसबा हतवीर्य जाला. येवल्याचे आसपास होते तेथून कूच करून धोंडपेस आले. पाठलागतेहि फौज आली. ज्येष्ट वद्य ११ स जुंज जाले, दादासाहेब सरंजाम माफक जाणून किल्यावर गेले. राजश्री चिंतो विठल जुंजांत राहिले. दादासाहेब किल्यावर गेले येणेंकरून लोक तजावजा जाले. दोन च्यारशें पंत मशारनिलेजवळ लढाईचे प्रसंगीं राहिले. तेवढ्यानसींच चिंतोपंतांनीं शर्त केली. नीट हत्ती चालऊन फौजेंत मिसळले. श्रीमंत राजश्री नानाचेंहि सूत्र होतेंच; परंतु त्यासमयीं पारपत्य यांजकडून घडले. मोरोबानाना कामास आले. चिंतोपंतांचे हातावर जखम गोळीची लागली. येक करांगुली उडाली, हात जायांच जाला, येणेप्रमाणें फत्ते रावसाहेबाची जाली. धोंडपचा किलेदारहि सूत्रांत मिळाला, शेवटीं दादाही भेट घेतली. सरंजाम झाडून हत्ती वगैरें लुटले. दादाची भेट जाल्यावर दुसरें दिवशीं कूच करून पुण्यास गेले. दादा तों वडील, परंतु जे सामील होते त्यांचें पारपत्य नांवनिशीवार केलें. केदारजी शिंदे यास मार दिला आणि माहादजी

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

शिंद्यांचे हवाली केला. रा। गंगाधरपंत तात्या व राजश्री अवचितराऊ नगरचे किल्यावर घातले. आबाजी माहादेव यास पुण्यास गेल्यावर अप्रतिष्ठा केली. दादा उद्धव आदि करून लहा(न)थोर सर्व फेऱ्यात आणून पैका घेतला. गंगाधरपंत तात्याचे तीस लाख मामलत ठरली म्हणून पुण्यास आणिले होते. त्यास तीस लाखाचा भरणा घोडीं, हत्ती, जडजवाहीर कर्जवाम येणें तो लाविला; तेणेंकरून सरकारची बेमर्जी होऊन त्यास शंभर कमच्या माराविल्या. ते समयीं त्यांणींहि अवाच्यवाद भाषणें केलीं; पुन्हा किल्ल्यावर घातले. दादाचा दिवाणखाना पुण्यांत आहे तेथें आहेत. रुबरू मात्र मर्यादा. परंतु माणसेंकाणसें भवतीं सर्व रायांचीं, येणेंप्रमाणें वर्तमान उभयतांचें इत्थंभूत निवेदन व्हावें म्हणून लिहिलें आहे. गंगाधरपंतांनीं लाख रुपये आपलेकडेहि लिहिलें होतें. श्रीमंत राजश्री नाना अधिक वद्य १ प्रतिपदेच्या मुहुर्तें सडे पुण्यास गेले. उभयेतां मामा व सौभाग्यवती ताई येथें आहेत. झांशीचे मामलतीचा दुराग्रह दिसोन येतो. आपण करावी, दुसऱ्याचे नांवें सनद करून करावी ऐसें मानस आहे. गोपाळ केशव यांचें नांवें करणार आहेत. राजश्री गोविंदराव रघुनाथ याणी येका मासाची मुदत सरकारांत मागून सेवेसी विनंतीपत्रें पाठविलीं, त्याप्रमाणें सन समानचे रसदेची बाकी व तिसाचे रसदेचा करारमदार आपलेकडून जाल्यास घालमेल नाहीं. यास्तव हर तजवीज करून लाख रुपये ऐवज पाठविला पाहिजे म्हणजे जाबसाल तालीं पडेल. घालमेल करणार. सुस्त पडलिया नक्ष आहे. येंदा फौजा हिंदुस्थानांत येत आहेत; राजश्री नाना पुरंधरे याचा पुत्र बज्याबा त्यास मुतालकी राजश्री रामचंद्र गणेश दिवाण व विसाजीपंत बिनिवाले उभयेतां मंत्री दाहा हजार हुजुरात व शिंदे होळकर मिळोन पंनास हजार फौज दसऱ्यास निघोन येत आहे. फौज आलियावर बंदबस्त खांतरखां होऊन मामलत सुरळीत चालेल. येंदाची बाजू रक्षिलिया पुढें भय नाहीं; येविशी गोविंदराव याणीं दरपये सेवेसी विनंती लिहिली आहे, तदनुरूप पैक्याची सरबरा करून समयास पोहोंचेसें करणार स्वामी समर्थ आहेत. गोपाळराव गणेश याची भेट आपण न घेतली हें उत्तम केलें. भेट घेतल्यास सरकारचा पेंच पडता. बहुत उत्तम केलें. याउपरी जोर पोहचाऊन तजवीज करून पैका सरकारांत पावल्यानें इतके दिवस मेहनत केल्याचें सार्थक आहे. त्याप्रांतें दुंडी. सरकारांतून रसदेचा तगादा नसावा; परंतु सरकारांत मुत्सद्दी आदिकरून सारेच गर्भश्रीमंत; परवेधना कोणास नाहीं. तेथून लिहिलें कीं हरतजवीज करून मागाहून दुसालां हिशेब व पैका तोडजोड करून पाठऊं. समानचे सालचा फैसला जाल्यावर तिसाचे रसदेचा करारमदार

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

जो ठहरावणें तो ठराऊन घ्यावा; ऐशास उत्तम आहे. परंतु तिसाचे सालचे रसदेचा ठराव ठराऊन घ्यावा; पक्कें जाल्यावर समानपर्यंत फैसल्ल्याचे रुपये निघतील ते देऊन तिसापैकी पंनासपर्यंत द्यावें म्हणजे खातरजमा जाली. सरकारांत अमित्र दर्शवितात कीं दीड लाख रुपयेच झांशीचे आले. त्यांतहि बाकी राहिली. लाहान साहान प्रगण्याचे लाख दीड लाख रसद येते हेंहि संधान ध्यानांत असावें म्हणून लिहिलें आहे. तरी येविशीचा पांचपेंच मननांत आणून श्रीमंत कैलासवासी दादा त्याचे हतवर्टीप्रमाणें आपली सचोटी उतरे तो मार्ग अवलंबिला पाहिजे. वडिलांस तीन लाख रुपये वरातेबद्दल आपणांजवळून घ्यावयाचा छंद बहुत आहे. आपण लिहिलें कीं तीन लाख पाऊन फाजील आहे. त्याचा हिशेब लिहून आला असतां म्हणजे समर्पक उत्तर करावयास येतें. फडनीस, मजमदार, बक्षी आळ्यांत येत नाहींत; भलत्या कांक्षा घेतात, दरबारचा रंग जाणत नाहींत. हिशेब तयार असतां तरी तिसांचे रसदेचा लढा न पडता म्हणून लिहिलें. त्यास हुजुर त्यांचे हातें खरकटानिशी कामकाज घेत जावें. माहालीं आपला जावसाल कच्चा पक्का राखून धुतलें ठेवलें असतें म्हणजे त्यांसहि उमज पडता, ती गोष्ट न जाली. पांच रुपये त्यांचे हातीं चहडले म्हणून दुराशा सुटली. कार्याकारण आपलें काम निवें तो प्रकार करून घ्यावा. पेस्तर सालापासोन त्यास म्हणावें, तुम्ही हैराण करितां आपला कच्चा जमाखर्च राखा, ज्यात तुमचें समाधान तेंच केलें जाईल. हिशेब जाणा तुम्ही जाणा, फक्त मामलेदार मात्र आम्ही; वरकड तुम्ही सांभाळा. कच्चा जमाखर्च राखितां निराधार राहिले म्हणजे अर्जमात राहातील. त्यास पैका द्यावा तो दरबारीं दिल्या फडनीस मजमदार कामास तरी येतील. येथून गोविंदराव रघुनाथ यास हिंमत देऊन लिहिलें आहे. कळेल तशी सालमजकूरची बाजू राखणें ऐसें बहुत लिहिलें आहे. पैक्याची मदत करावयास दिवसगत न लावावी; आणि गोविंदराव यांस लिहीत जावें कीं, तिसाचे सालचा बंदवस्त केल्यावर समानची बाकी द्यावयाचें बोलां; येथून लिहीत असें. गोपाळराव मुलकाची खराबी करीत गेला तर जावो. भेटी न घेतली हें फार उत्तम केलें. येथें वडिलांकडे वदंता उडाली होती कीं, आपण त्यांस भेटला, ते सवालाख रुपये मागतात; त्याणीं काबूंत आणिलें. येणेंकरून चिंतार्णवीं पडलों होतों. आज्ञापत्र सादर जालें तेव्हां समाधान जालें. याउपरी मामलतीची काळजी रात्रंदिवस लागली आहे. श्रीसांब आपणांस साहाय आहे तरी चिंता दूर होईल. राजश्री अच्युतराव नगरचे किल्ल्यावर आहेत. त्यांचा संदर्भ सरकारांत आला कीं, म्यांही कोणाचें सांगितल्यावर खेळ केला;

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

तें येकीकडे राहून माझ्या प्राणांशी गाठ किमर्थ? मजला हुजुर न्यांवे विनंती करणें ते करीन; त्याजवरून पुण्यास आणविले आहेत. लाख रुपयें त्यास मागतात. त्याची सरबरा करतील परंतु जामीन मागतात. माहादजी शिंदे त्यास जामीन होत होते परंतु सरकारची मर्जी नानास त्याचे कारभारांत आणावें ऐसी आहे. नानाहि गेले आहेत तेहि येणार. होईल वर्तमान तें लिहून पाठऊ. राजश्री चिंतो विठल जखमी म्हणून कोठुन्याजवळ शिंगवें गांव आहे तेथें ठेविले होते. हली बोलाविले आहेत, सत्वरच जातील; त्याजवळहि दक्षणा घेणार. राजश्री चिंतो अनंत भोंसल्यास आणावयास लष्करांतून गेले होते ते नागपुरीं भोंसले यांजवळ आहेत. मुलें माणसें त्यांचीं पुण्यांत आहेत. त्यांजकडून बोलाविले होते; त्यांचें स्पष्ट उत्तर आलें कीं येत नाहीं. प्राचीन भोंसल्याचे चाकर त्याजवळ असो. मुलांमाणसांस जें करणें तें करावें. कालपासोन चर्चा आहे कीं अबाजी माहादेव यांणीं विष भक्षून देहावसान केलें. बायको सहगमनी गेली परंतु तथ्य नाहीं मिथ्या आहे. होईल वर्तमान तें मागाहून लिहीन. इकडे प्रजन्य नव्हता. काळ थोडासा पडला. नाशिक वण दिंडोरी वगैरे माहाल दादाकडे होते त्यांवर कमाविसदार राजश्री खंडो गणेश राजश्री मोरोबा दादा फडनिसाचे मामा पाठविले आहेत. यांसी दुमाले गांव झाडून जप्ती करावयाची आज्ञा; आपल्याहि दोही गांवांस जप्ती पाठविली होती, त्याजवरून त्यांस भोजनास आणून दोन वस्त्रें दिलीं. खुशामत करून तूर्त जप्ती बसूं दिली नाहीं. सोडचिठ्ठीविशी राजश्री गोविंदराव यासी लिहिलें. त्यांणीं विनंती केली त्याचें प्रत्योत्तर दिलें कीं झांशीचे रसदेचे भरण्याचे वेळेस सोडचिठ्ठी देऊं. मागती त्यांस लिहिलें कीं झांशीची मामलत तो गेली. हे गांव पंचवीस वर्षे इनाम चालतात त्यांत हा जाबसाल काशास? उपजीविका इतकीच लागूं होऊन सोडचिठ्ठी लौकर पाठवणें. पाहावें सोडचिठ्ठी येईल तो सुदिन आहे. येविशी गोविंदरायास व श्रीमंत फडनीसपंतास तेथून लिहून बंदोबस्त केला पाहिजे. तूर्त कमाविसदाराचे आर्जव करून गांवास उपसर्ग लागूं दिला नाहीं. ईश्वरास करणें; दादाचा हा प्रकार जाला. नाहीं तरी येंदा रसद देणेंच न ल(ग)ती. मोठं अनिष्ट जालें. लपायास जागा होती, भगवत सत्ता प्रमाण. सौभाग्यवती मातुश्री ताई यासी आम्हीं विनंती केली कीं, आमचे येजमानांवर मोठे पेंच आहेत, परंतु वडिलाची कृपा असल्या वरकड पेच तिलप्राय आहेत. त्यांणीं उत्तर दिलें कीं तुम्ही त्यांचे चाकर म्हणून बोला परंतु तिन्हाईतपणें अम्हांकडून कोणतें अंतर पडलें.? उपरांत विनंती केली कीं आम्हाकडे लेकुरपण आहे, वडील आपण आहेत. सर्व

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

आंतर क्षमा करून कृपा आपणांवेगळी कोण करणार.? तेव्हां म्हणाली येकच असों. ईश्वर करों. त्यास मूलबाळ हो म्हणजे सर्व पावलें. येथील मुकामी त्यांस व नानास पत्र आपण पाठवावें. कार्याकारण विपर्यास ध्यानांत राखूं नयेत. फर्शाचें काम समाप्तीस सरस्वतीपर्यंत आलें. त्याची याद कारखान्याची अलाहिदा पाठविली आहे, ध्यानास आणावी. गच्ची आडाजवळील व वरील नीट केली. भिंतीस पाणी झरत होतें तें नीट केलें. कार्याकारण कामें न करिता हवेली जायां होते म्हणून केलें. हिंगण्याजवळलील जागेची चार दिवाळीस तीन साडेतीन हजार रुपये लागतील. विहिरीजवळील भिंत घालणें तीस दोन हजार पाहिजेत. कोठाराचे हवेलीचे पिछयावड्याचे चवकाच्या भिंतीस तीन च्यार हजार ऐशी जरूर जरूर कामें आहेत. राजश्री खंडोपंत मामांनीं खंडेराव याचे टेंकडीजवळ जागा घेऊन पांच हजार रुपये लाऊन च्यारदिवाली केली. स्मरणार्थ विनंती लिहिली असें. सेवेसी श्रुत होय हें विज्ञापना.

¶*Naro Nilkanth to Vishvasrao Laxman describing very vividly the fight between the Peshwa and his uncle Raghunathrao at Dhodap, in which Chinto Vithal received injuries. He also writes how severely the Peshwa dealt with the accomplices of Raghunathrao. The writer further discusses the question of the payment of dues from the Zansi territory under the management of the addressee. Lastly he refers to the rumour of the death of Abaji Mahadeo and mentions the Peshwa's order issued to Khando Ganesh to confiscate the province round about Vani and Nasik which was being administered by Raghunathrao.*

No. 93] *[24-9-1768*

पैा छ ३ जोवल

सन समान

श्री

सेवेसी बाबूराव कृष्ण विज्ञापना ताा छ ३० रााखर क्षेम असे विशेष. श्रीमंत मातुश्री बाईसाहेबाचा लाखोटा सरकारचा पाठविला आहे; पावेल व आज तेरा घटिका दिवसानंतर श्रीमंत उभयेता आनंदवलीच्या वाड्यांत जाऊन राहाणार. यापुढे होईल ते सेवेसी लिहीन. सरकारचे हती आजच येथून ११ अकरा पुणेयास रवाना जाहाले आहेत. या रोखाहून डाकेचा कागद दीडा दिवसात पोहचे यैसी जासुदास ताकीद येथूनहि केली आहे. हा कागद कधी पोहचतो तो पाहावयास आज्ञा केली पाहिजे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Baburao Krishna Apte to Nana Fadnis, informing him that the two Shrimants, the Peshwa and his uncle, were proceeding to Anandvalli.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 94] [तालीक *1769 ?*

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
धोंडोपंत स्वामीचे सेवेसी

पोष्य बाळाजी जनार्दन साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जावें. विशेष. तुम्ही पत्र पाठविलें तें प्रविष्ट जाहालें. किल्ले दौलताबादेस सुखनिधान तोतया आहे. त्याजबाबत फितुराचे आत्माराम नाईक साहुकार व वेंकु कोठीवाला व जीवी परदेशीण या तिघांस व बाबूराव सोवनी पळाला आहे त्याचा शोध करून त्याजला, येकूण चौघास व चिठ्या असल तीन हुजूर पाठवणें व शिंद्याचें नांवाची ठेव साहुकारींत आहे त्याची चौकशी करून लेहून पाठवणें, म्हणून सरकारचें पत्र तुम्हास पेशजी गेलें होतें. त्याजवरून चिठ्या अस्सल तीन पाठविल्यात त्याजप्रमाणें पावल्या. आत्माराम नाईक शहरीं आहे. त्यास पाठवावयाविशी सरकारचें पत्र शेरजंग यास पाठविलें आहे, हें त्याजकडे पाठऊन त्याजला आणून पाठवावें. बाबूराव सोवनी व वेंकु कोठीवाला व जीवी परदेशीण ह्या तीन आसाम्या गैरहजीर जाहाल्या आहेत, त्याचा शोध करून सांपडल्यास रवाना करावें.

¶*Nana Fadnis to Dhondopant, probably Killedar of Doulatabad, informing him of his having received the papers of treason in favour of the Pretender.*

No. 95] [*20-1-1769*

श्री

श्रीमंत राजश्री पंत
प्रधान स्वामीचे शेवेसी

विनंती शेवक भिकाजी जनार्दन साष्टांग नमस्कार विज्ञापना यैसीजे. माहादाजी नारायण नगरचे तोतयाचे फितुरात होते ते कुटुंबसुधा पलोन गेले. त्याचे बंधू रामाजी नारायण व बाळाजी नारायण विभक्ता त्यांच्या बायकामुले वस्तभावसुधा आटकेत ठेविली होती; त्यास आपण हजीरजामीन होऊन मुले माणसे वस्तभावसुधा आपले स्वाधीन करून घेतली असेत. सरकारची आज्ञा होईल ते समई हजीर करून देऊ. न देऊ तरी याचे निसबतीचा जाब करू. मिती पौष शुध्ध १३ त्रयोदसीं सुा तिसा सितैन मया व अलफ. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Bhikaji Janardan to the Peshwa, standing security for Ramaji Narayan and family implicated in the trouble created by the Pretender.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 96] [*23-1-1769*

पौ छ २० रमजान तिसा

सितैन पौष मास

श्री+

श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे

सेवेसी

विनंती. सेवक धोंडो माहादेव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ १४ रमजान पावेतों स्वामीचें कृपावलोकनेंकरून सेवकाचें वर्तमान येथास्थित असे. विशेष. छ ३० साबानचें सरकारचें आज्ञापत्र सादर जालें. तें छ १० रमजानीं पावलें. तेथें आज्ञा कीं, सुखनिधान तोतया कनोज्या ब्राह्मण किल्ले अमदानगरास अटकेस होता. तो किल्ले दौलताबादेस अटकेस ठेवण्याकरितां तुम्हांकडे वेंकाजीराम कारकून याजबराबर पाठविला आहे. त्यास किल्लें मजकुरीं पक्या बंदोबस्तानें अटकेस ठेऊन पोटास शेर दररोज देत जाणें. तुम्हाजवळ पोहोंचलियाचें उत्तर पाठवणें. व किल्लेमजकुरीं तुळाजी आंगरे अटकेस आहेत त्यास किल्ले पुरंधरावर अटकेस ठेवावयाकरितां वेंकाजीराम कारकून याजबराबर रवाना करणें. हुजुर पुण्यास आलियावरी किल्ले मजकुरास पाठविला जाईल. चौकी पाहाऱ्यास तुम्ही किल्ले मजकुरीहून पंचवीस माणूस हुजुर पोहोंचवावयाकरितां समागमें देणें व एक कारकून देणें म्हणोन आज्ञा. त्यैसियासी नगरीहून तोतया किल्ले दौलताबादेस पाठविला; तो सरकार आज्ञेप्रमाणें ठेविला. व तुळाजी आंगऱ्याची रवानगी आज्ञेप्रा केली आहे. सेवेसी पावतील. सेवेसी श्रुत होये हें विज्ञापना.

¶*Dhondo Mahadeo informs Nana of the writer having taken charge of the Pretender transferred to Doulatabad from Nagar and having sent Tulaji Angria to Purandar from Doulatabad.*

No. 97] [*5-3-1769*

पो छ १० जिल्काद

तिसां

श्रीगणपतीवरद

सेवेसी विज्ञापना. ताा छ २९ सवाल मुकाम मेदक प्रांत भागानगर. स्वामीचे कृपेंकरून सेवकाचें वर्तमान येथास्थित असे. विशेष. इकडील वर्तमान भोसले गंगातीराकडे आले; म्हणोन सड्या फौजा करून राजश्री गोपालराव यांची रवानगी पुढें केली. माहूरचे मुकामाहून खासा सडे होऊन पाठलग

\+ हें पत्र, नं. ९४ चे आधीं वाचावें.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

केला. वीस वीस कोशाच्या मजली करून गाठ घालावी हा मनसबा केला. पुढील फौज बारा कोशाचे तफावतीनें भोंसल्यापासून होती. परंतु गांठ पडली नाहीं. निकड करून गांठ तोडून येलगधककडे झाडींत गेले. मजलदरमजल श्रीमंत मुा मजकुरास आले. येथून गोपालराव चालीस कोशांवर आहे. त्यापलीकडे भोसले तीस कोशावर आहेत. लांब मजली जाहाल्या. यामुळें मोंगलाकडील फौज मागें राहिली. आज उद्यां येऊन पोंहचेल. ते आलियावर मनसबा होऊन पुढें जाण्याचा विचार करितील. चांद्यास जावें हा विचार वाटतच आहे. भोंसल्यांकडील कारकून येक आला आहे. कृपा करून पूर्ववत प्रमाणें चालवावें. यैशा पोकळ गोष्टी बोलतो. देवाजीपंतास पत्रें भोंसल्यानी पाठविलीं आहेत. देवाजीपंत बुणग्यांत आहेत. आणावयास सांडणीस्वार गेले आहेत. आल्यावर बोलण्याचे अर्थ दिसोन येतील. सारांश दरकुचामुळें घोड्यांत माणसांत गुर्मी राहिली नाहीं. सडी स्वारी. माहागाई. परंतु श्रीमंताचे पुन्यप्रतापें मनुष्यमात्रांत हिमत भारी. गाठ पडती तरी भोंसला वाचावयाचें संकट होतें. असो आम्हीं आज्ञेप्रमाणें श्रीमंतासनिध आठशा स्वारानसी आहों. तूर्त जाबसाल भवानरायाचे पंचविसा हजाराचें आम्हांसी करितात. आम्ही गावखडी देतों. यास पंचवीस हजार रुपये सालमजकूरचे तूर्त द्या म्हणतात. आम्ही निमे चइत्र, निमे जेष्ट अखेर देऊं म्हणतो. परंतु ध्यानास येत नाहीं. होईल वर्तमान तें मागाहून लेहून पाठवीन. स्वामीच्या कृपावलोकनें परिणाम लागला तर लागेल. राजश्री हरिपंत तात्या कृपाच करितात. स्वाम वरचेवर त्यास लिहितच असतील. उभयेता येजमानाचें लक्ष स्वामीच्या चरणासी विस्तार काय लेहूं. सदैव पत्रीं परामृश करणार स्वाम समर्थ आहेत. इकडील वर्तमान राजश्री हरिपंत तात्यानीं लिा आहे; त्याजवरून विदित होईल. याउपरि मागती चांद्यास जावें हा विचार आहे. घडेल तो खरा. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*News-letter communicating the movements of Janoji Bhonsle and Gopalrao Patwardhan in the Peshwa's expedition against Nagpur.*

No. 98] [पौ *20-4-1769*

पौ छ १२ जिल्हेज तिसा
चैत्र बाा सुभानजी बावरें
खास जिलीब

श्री

विज्ञापना. आपण पत्र पाा तें पावलें. थोरल्या श्रमिंतानी बखेडा केला होता ते कलतांच चौकसी केली. संकलित श्रीमंतास लिहिलें आहे त्याजवरून

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

कलेल म्हणौन लिा ते कळले. आपण लिहिले होते ते वर्तमान श्रीमंतानी व दादानी मजवळ सांगितले त्याजवरून कळले. भगवंत आपला साहकारी आहे. तेणेकरून गोष्ट लौकर कळली. मोठी गोष्ट जाहाली. पोशाक तयार करविले. कारिगर मिळत नाहीं, तथापि लाविले आहेत. मागे जाफरमानी[१] व केशरी बुटांचा पोशाक पाा त्याजविसीं श्रीमंतास विनंती केली कीं, जाफरमानीवर आपली रीझ[२] होती म्हणौन पाा होते. मग म्हणाले की, तेव्हा रीझ होती; परंतु आतां नकोत. अमारीचे वाल्याचे पडदे पाा ते पावलें. वरकड इकडील काहीं नवलविशेष लिहिजेसे नाही. हे विज्ञापना.

¶*Hari Ballal, writing to Nana Fadnis, refers to an unsuccessful attempt of Raghoba to escape from Shanwar Wada where he was kept in confinement by the Peshwa.*

No. 99] [*22-4-1770*

असल बमोजिब नकल

श्री

राजश्री दुर्गोजी सिंदे नामजाद
किले माहुली गोसावी यांसी

॥ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्राो माधवराव बलाल प्रधान आसीर्वाद. सुाा सबैन मया व अलफ. सुकनिधान तोतिया किले दौलताबाद येथे आहे. त्याच्या फितुरांत कासिनाथ भट पुजारी व नारो तिमाजी होते. सबब किले मजकुरी अटकेंत ठेवावयासी पाठविले असेत; तरी पके बंदोबस्तानें अटकेंत ठेऊन पायांत बेड्या घालून पोटास सेर देत जाणे. भोजनसमई पायांतील बिड्या तोडून मागती घालीत जाणें. जाणिजे, छ २९ जिल्हेज बहुत काये लिहिणें.

¶*Kashinathbhat and Naro Timaji have been consigned to jail for complicity in the affair of the Pretender.*

No. 100] [*11-11-1769*

पौ छ १२ रजब सबैन

श्री

सेवेसी विज्ञापना. येथील वर्तमान ताा छ ११ रजब मंदवार मुकाम वाई येथास्थित असे विशेष. काल जासूद स्वामीकडून आला होता. त्यास तेव्हांच पत्र देऊन रवाना केला. तो येऊन पावलाच असेल. काल श्रीमंत धोमास गेले होते, ते संध्याकाळी आले. संध्या करून श्रीमंत राजश्री दादाकडे गेले. च्यार

१ जांभळा. २ आवड.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

पाच घटका खलबत जाले. उपरांत आले. उदईक कूच व्हावे न व्हावे असे आहे. इंदुवारी कूच करार होईल. मंगळवारी जेजुरीस जातील. दादानी आज पथ्य घेतले. वाखाच आहे. हे विज्ञापना. रा मंदवार दोन प्रहर दिवस हे विज्ञापना.

¶*This letter, written from Wai by Baburao Krishna, mentions a long interview which took place between the Peshwa and Raghunathrao. It further states that the Peshwa would shortly move to Jejuri and that Raghoba is ill.*

No. 101] *[6-11-1769*

पो छ १४ रजब सबैन

श्री

सेवेसी विज्ञापना. येथील वर्तमान ताा छ १३ रजब इंदुवार प्रात:काळ पावेतों मुाा वाई येथास्थित असे विशेष. काल श्रीमंत व दादा स्वामीकडे गेले होते. आज तेथें स्वामीचे पुडीस जातात. नागोजी सिंदे साताऱ्याहून आले होते. त्याणी माहाराजाचे दर्शनास यावे, त्याचा मानस फार आहे, म्हणोन आग्रह केला. त्याजवरून नागोजी सिंदे यास साताऱ्यास रातोरात पौ आहे. माहाराजांनीं कांहीं आड घालू नये याप्रमाणे प्रमाणेंत आले तरी ठीक करून आज दोन प्रहरीं यावें. मग आज भुईंजेस जावे. ते ठीक नसल्यास आजच कूच करून घाटाखाली जावें. साताऱ्यास गेल्यास तीनच्यार रोज अधीक लागतील. शुक्रवारी आपणास जेजुरीस बोलाविले आहे. त्यास आपले निघणे लौकर कामाकाजामुळें होणार नाहीं. यास्तव लौकर यावें म्हणोन लिाा आहे. साताऱ्यास गेल्यास च्यार पांच रोज अधीक लागतील; असे आहे. आजचा मुकाम वोझरड्याचा नेमिला, दोन कोस येथून आहे. नागोजी सिंदे आज येतील, त्याप्रमाणें साताऱ्यास जातील. संध्याकाळीं ठरेल त्या प्रमाणें लेहून पाठवीन हे विज्ञापना.

¶*Baburao Krishna to Nana Fadnis from Wai, sending news about the proposed interview of the Peshwa with the Chhatrapati.*

No. 102] *[7-3-1770*

पौ छ ८ जिल्काद सबैन
फाल्गुन हाा
आली बेग सांडणीस्वार

श्री

विज्ञापना राजश्री आपाजी गणेश यांजकडील फाजीलाचें प्रकर्ण पाठविलें ते पावलें. श्रीमंतास समजाविलें. आपण दोन पत्रें या मजकुराचीं श्रीमंतास

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

लिहिलीं होतीं तीं अक्षरशा वाचून दाखविलीं. च्यार दिवस विचार केला, श्रीमंत दादा जवल असतां विचार होत होता. मामलत काढावी न काढावी, सेवटीं आज्ञा आली कीं मामलत काढूं नये. येविसीचें तपासिलवार वृत श्रीमंतांचे पत्रीं लिहिलें आहे त्याजवरून कलेल. स्वामीनी माझे पत्रीं येविसींचा तपशील लिहिला व अवसान सोडून बोलतात येविसीचा भाव लिहिला व हाताचा मांडा होत नाहीं, साहित्य पाहिजे म्हणोन पत्रीं आज्ञा केली. त्यास हे काहीं मजला कलत नाहीं कीं काय ? आपला प्रेत्न होता तितका केला व आतां लिहिलें आहे तें श्रीमंतानी आपले लिहिण्याचे भाव धरूनच लिहिलें आहे. इतकें असोन त्यास न पुर्वे तर दैव त्याचें, आपण काय करितील. आपण श्रीमंतांस दुअसफी लिहिलें होतें. ठेवणे तर असा प्रकार, न ठेवणें तर दुसरा प्रकार. दोन्ही प्रकार समजोन श्रीमंतांनी उत्तर सागितलें तसें लिहिलें आहे. सेवट काय होतो तें लिहिलें पाहिजे. दुसरा मजकूर श्रीमंत दादासाहेबानीं सनद दिल्ही ते समई कलम लेहून दिल्हें कीं, गोपालरावासमधीं जाजती खर्च लागेल तो मजुरां पडणार नाहीं. भेदाने कामे करावें त्या अन्वयें लिहिलें तर येक रुपया फाजील देणे नाहीं. हा मजकूर गाळून श्रीमंतास लिा. तुम्हांस कलावें म्हणोन लिा म्हणोन पत्रीं आज्ञा केली. त्यास हा कुन्हा[1] असल्यावर फाजिलाचा प्रांत कललाच आहे व आपणास कललें असतां पुण्यास आल्यावर श्रीमंताचेहि कानांवर घालावें लागेल. तूर्त श्रीमंतानीं आज्ञा केल्याप्राो विल्हे लागेल तर लावावे. पुढें त्याचें दैव. स्वामीचे साहित्य फलदाता इश्वर आहे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Haripant Phadke to Nana, communicating the Peshwa's decision on the dispute about Appaji Ganesh (the Subha of Ahmedabad).*

No. 103] [*10-5-1770*

पौ छ १८ मोहरम-
सबैन

श्री

श्रीमंत राजश्री पंत
प्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक दुर्गोजी सिंदे नामजाद किले माहुली विज्ञापना. तागाईत छ १३ मोहरम पावेतों किले मजकुरचे व सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. छ २५ जिल्हेजचे आज्ञापत्र छ मजकुरी सादर जाले तेथे आज्ञा कीं

---

१ कपट.

1873

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

सुकानिधान तोतया दौलताबाद येथं आहे. त्याचे फितुरात कासिनाथ भट पुजारी व नारो तिमाजी होते सा किले मजकुरी अटकेस ठेवावयासीं पाठविले असेत; तरी बंदोबस्ताने ठेऊन पायात बिड्या घालून ठेवणे म्हणोन आज्ञा. आज्ञेप्रमाणे बंदोबस्ताने अटकेस ठेऊन आज्ञेप्रमाणे वर्तणूक करितों. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Durgoji Sindia to the Peshwa, reporting the safe custody of Kashinath-bhat Pujari and Naro Timaji implicated in the affair of the Pretender.*

No. 104]

श्रीसांबः सपुत्रो विजयते

चिरंजीव राजश्री नारायेणराव यांसी प्रति रघुनाथ बाजीराव आसीर्वाद उपरी. तुम्हास येतेसमई आज्ञा केली कीं, सर्वदा वर्तमान आधीक होईल ते लिहीत जाणे. परंतु स्वारी आलियातागाईत आद्यापि पत्र आले नाही. तरी ऐसे न करावे. चिरंजीवाचे शरीराचे वगैरे मातबर मानसुब्याचे वर्तमान सर्वदा लिहित जावे. टोक्यास चिरंजीव बालाचे लग्न करून, आनंदवली, इंद्रगड पाहून दरमजल पुण्याचे रूखे येतो. तुम्हास कलावे. रा छ १२ सफर. बहुत काये लिहिणे, हे आसीर्वाद.

¶*Raghunathrao to Narayanrao, informing him that he would soon be arriving at Poona.*

No. 105] [*August 1770*

श्री

अजमास खर्च येक माही श्रावण मासचा स्वारी राजश्री दादा मुकाम आनंदवली सुा इहिदे सबैन मया व अलफ रुपये.

१३५० अनुष्ठानाचे ब्राह्मणास दक्षणा रुपये

५४०	नमस्काराचे आा	१२	दररोज रुा	१८
४५०	अर्घ्याचे आा	१२	दररोज रुा	१५
३६०	सौर जपास आा	१२	दररोज रुा	१२
१३५०				३६

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

१५७॥ देवाचे पूजेस ब्राह्मण आा ९ येकून दक्षणा दररोज रुा ५। प्रोां

४५॥ सोमवार व प्रदोष ७ येकून रुा

७ देवास दक्षणा दर १ प्रोां

३८॥ अभिषेकाचे ब्राह्मणास दर ५॥

४५॥

९६ बाण व शालग्राम देवांस दक्षणा रुा

९० नित्य दक्षणा दररोज रुा ३ प्राा

६ येकादशा २ दर ३ प्राो अजमासास द्वादशाचे मोघम रुा ७२ लिहिले आहेत ते दर येकादसीस

९६

१९६॥ आश्रित व गोसावी तपश्वी

४२ माहादेवभट अग्नहोत्री

१५ त्रिंबक जोसी मुळे

१६॥ श्रीधरभट खरे

६० श्रावण पर्वत गोसावी

५० सिरटेकी बैरागी

१० धूंम्रपानी गोसावी

१९६॥

४० भोजनदक्षणा आषाढमासचे दक्षणेवरून

५७७॥ भोजनखर्च दररोज आसामी येकून

७० अनुष्टानाचे ब्राह्मणभोजनाकडे आसामी भोजनास दररोज

३६ अनुष्टानाचे ब्राह्मण

९ देवांचे पुजेचे

४ शार्गीद आा ५ पाौ

६ पाणके व खटपटे

२ निाा गणपतीपुजेच्या ब्राह्मण व खटपट्या

१ बाणांस बेल आणावयासी

१ अर्घ्यप्रदानाकडील खटपटेस

२ निाा बागा कारकून व कारभारी

१ कारकून निाा कोठी

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

२ उपाध्ये खुद व शागीर्द
९ आंगातुक
२ आचारी
२ अंधशास्त्री बंधू सुधा
१ रखवान

७०

७ राजश्री अमृतराव यांचे पंगतीस भोजनास दररोज आसामी

१ आश्रीत
१ पंतोजी
१ नित्यदानाचा ब्राह्मण
१ आचारी
२ शागीर्द
 १ नेमणुकेचा
 १ जदीद

२

१ पाणका

७

७८

दुवख्ता मिळोन सरासरी दर आसामीस दररोज ·।· प्रो येक रोजा रुा ✻ ✻ प्रो तीस रोजा याखेरीज गणपतीस व गंगेस व हनुमंतास येकून नैवद्य दररोज ३ प्रो याच अजमासांत

९४३॥ बाा मुाा येकंदर

९९ कारकून सिलेदार

२९ हरी सिवाजी निाा त्रिंबक
१६॥ गोपाल कृष्ण पंतोजी
१२॥ निाा कोठी वाकनिसाकडील

५४

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

७५ ब्राह्मण हरकारे

३५	पाणके खटपटे आा	७
४	बेल आणावयाचा	१
५	अर्घप्रदानाचा खटपट्या	१
५	रक्तवान	१
२६	आचारी	३
७५		१३

७८ कामाठी आा १२ पीठ पैसा देखील

२१२ सिबदीप्यादे ३७ येाा दर ६ व दर ५॥ प्रो

३१ खास बारदार ५ पागा थटी सुधा

९३॥ पात्र लोक व बाजे लोक किरकोळे १८

५४३॥ ८८

१७१ आषाढ मासचे खर्चावरून

२५ तैवज खर्च

२५ रोशनाई खर्च

३६ नमस्काराचे ब्राह्मणास दूध साकर व अर्घ्याकडे उपसाहित्य मिळोन

२५ पागेस चरिंदा व लागवड

२० थटीस चरिंदा व लागवड

४० बाण शालग्राम देवास उपसाहित्याचे

१७१

५१॥ देवस्थाने

३० श्रीकपालेश्वर संस्थान नासिक नैवेद्य व ब्राह्मण मिळोन दररोज रुपया १

२१॥ श्रीगणपती संस्तान आनंदवली नूतन स्थापना

१५ ब्राह्मणपूजेचा दररोज ॥.

५॥ खटपट्या

१ उपसाहित्य

२१॥

५१॥

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

८३ धर्मादाव विा राजश्री अमृतराव
३७।। नेहमी
३० नित्यदान दररोज रुपया १
१ देवास नित्य दक्षणा पैसे २
६।।। वैधृती व व्यतिपात व माससंक्रांत सुवर्णदानास दर २। प्रा
४५। तीथ पर्वणीस कार्याकारण

८३
२४१ बागा आनंदवली सालिना २९०० पौ येक माही.
५८ बाग बिलैक (१) तीर्थ सालिना २९०० पौ येक माही

३६११

आनंदवलीस बाराद्वारीचे काम पहिल्या मजल्याचे दाहा पंधरा हजारांचे असेल, वरील घर फार इजमाली तकलपी आहे. इतकारितां येत नाही. वासे मोडतात. माणूस पडलें तर ठार होईल. साल मजकुरी जसतसे शाका(र)लें. पुढें मोडोन पडलें, तर खालील काम जाया होईल.

कलम
१

इंद्रगडचे तळ्याचे कामास रुा ९९६ सालिना नेमले आहेत; परंतु त्या कामावर कोणी नेहमी ठेवावयाची नेमणूक नाही. तेथे कारकून असल्याखेरीज काम होणार नाही. कारकून अगर आणखी कोणी शाहाणा माणूस नेमल्यावर कारखाना चालेल.

कलम
१

¶*An estimate of one month's expenses of Raghunathrao at Anandvalli. The total is Rs. 3,611.*

No. 106] [*23-8-1770*

नकल

श्री

यादी निा गंगाधर येशवंत सुा इहिदे सबैन मयां व अलफ

मारनिलेपासून हजीर जामीन घेऊन मुले लेकरा कबिले सुध्धां मोकलें करावें. १

माधवराव गंगाधर यास आहिल्याबाईकडे जावयाची च्यार महिने आज्ञा द्यावी. १

---

१ बिल्वकतीर्थ ?

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

तिघे लेक व गंगाधर येशवंत यास हाजीर जामीन नारो शकर राजेबादर याचा कागद सरकारांत घेऊन मुलाबायकासुद्धां मोकले करावे. येणे प्रो करार

(मार)निले यांस जातीस सरंजाम स्वदेसी वसुली पेशजीच्या सरंजामा पौ

१५००० इनाम गावं पौ

२५००० सरंजाम पौ जवल

पेशजी मारनिलेकडे सरंजाम व इनाम होते ते सरकारांत जप्त आहे त्यापौ हाली पंधरा हजार रुपयाचे इनाम व पंचवीस हजाराचा सरजाम कमाल बेरजेचा द्यावा. करार

आमची वस्तभाव व यैवज वगैरे कुल सरकारांत आलाच आहे कदांचित किरकोल यैवज कोठे विस्मरणामुलें राहिलाच तर त्याचा दोष आम्हाकडे नसावें.

१

किरकोलसिरकोल मिलून दाहा हजार रुपये पावेतों असल्यास गुंता नाहीं अधिक निघाल्यास सरकारांत घेतला जाईल येणे प्रो करार

मौजे निबगांव येथें कुणाबिणी आहेत त्या सोडून देवाव्या.

१

निंबगावी असतील त्या माघाऱ्या देणे म्हणोन कादारास सनद देणे दिल्ही

च्यार महिने अहिल्याबाईजवल राहून हुजूर यावें अधिक दिवस लाऊ नये येणे प्रों करार.

घरें हवेल्या पुण्यातील वगैरे मोकल्या कराव्या.

पुण्यांतील घर व निंबगावी वगैरे घरे असतील ती मोकली करू. करार पत्रें मोकलीची दिल्ही.

साहूका(रा)चे कर्ज व मामलेदाराचें फाजील सरकारांत आहे त्यास आम्ही ज्याची विनंती करू त्यास आम्हांकडून रदकर्जास व फाजिलास यैवज देवावा.

४००००० च्यौ महिन्याचे मुदतीने
२००००० दिडा वरशाने द्यावे तूर्त
जातखत द्यावे.

६०००००

सा लक्ष रुपये पौं च्यार लक्ष रुो सरकारात फाजील व कर्ज ज्याचे असेल त्यापौ आलाहिदा यादीवर नावनिसी लिहिली आहे त्याप्रो रदकर्जाचा जमाखर्च करावा बाकी दोन लक्ष दिडा वर्षानें द्यावे त्याचे जातखत मारनिलेचे नावें द्यावे सदरहू दोन लक्ष मुदतीस सरकारचे कर्ज व फाजील वाजबी देणे त्याप्रो रदकर्जास द्यावे. येणेप्रो करार

बाजी विठल यास मोकळे करून मारनिलेची हवेली तलेगांवी आहे ते द्यावयाची आज्ञा करावी.

1879

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

सरकारांत वस्तवानी वगैरे आमची भरणा जाहाला आहे त्याची रुजुवात आम्हांस असावी येविसीची आज्ञा १

सरकारांत भरणा जाहाला असेल त्याची रुजुवात करावी करार

सदासिव गंगाधर यास हुजूर यावयाविसी अभयपत्र देवावे मारनिले यांचा फडशा येकंदरात आला.

जामीन सरकारात घ्यावा व मारनिलेकडे यैवज निघाल्यास अलाहिदा सरकारांत घ्यावा येणेप्रो करार करून मारनिलेस हुजूर ये(णे)विसी अभयपत्र देणे.

सदासिव गंगाधर यांणी आठा महिन्यांत हुजूर यावें येणेप्रो करार

मारनिलेकडे पेशजी यैवज करार केला ते समई कर्ज वगैरे लोकाकडे यैवज येणे त्याच्या यादी सरकारांत लिहून दिल्या आहेत त्याप्रो जी बाकी राहिली असेल ते सरकारांतून वसूल करून आलाहिदा घ्यावी. येणे प्रो करार

हजीर जामीन चागला द्यावा त्याचा जामिनीचा कागद सरकारांत घेऊन मारनिलेस सोडावें व तळेगावची हवेली मोकळी करून द्यावी. करार

वतनें आमची आहेत ती सारी पूर्ववत् प्रो आम्हांकडे चालवावी १

दोन हजार रुो उत्पन्नाची चालवावी व ज्या वतनात दिकत असेल व जबरदस्तीनें घेतले असेल ते चालऊन नये येणेप्रों करार.

साडे येकुणतिसा लक्षाच्या कराराची याद पेशजी सरकरांत घेतली आहे ती फिरोन द्यावयाची आज्ञा.

हाली यैवज करार केला तो भरणा जाहालियर याद पेशजीची माघारी द्यावी. करार

स्वारीबरोबर बलाविल्यास यावे. येणेप्रो करार.

छ १ जमादिलोवल इहिदे सबैन भाद्रपद.

¶*Agreement containing conditions of release of Gangadhar Yashvant (Chandrachud).*

No. 107] [*31-1-1771*

पौ छ १ जिलकाद इहिदे सबैन

श्री

श्रीमत् राजश्री रावसाहेब

स्वामीचे शेवेसी

विनंती शेवक त्र्यंबक नारायण कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागाईत छ १४ शौवालपर्यंत स्वामीचे कृपेकरून शेवकाचे व प्रांत गुजराथचे

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

वर्तमान यथास्थित असें. विशेष:—छ १४ रमजानचे आज्ञापत्र सादर जाहालं. तेथे आज्ञा कीं, राजश्री त्रिंबकजी भालेराव याजकडे श्रीमंत दादासाहेब याचे स्वारीपैकीं तसलमतीस ऐवज येणे रुपये ३३६५० तेतीस हजार साडे साहासे. त्याचा निकाल हुजूर येऊन करून दिल्हा नाही; नामोहोर जाले आहेत. त्यास अमदाबादेस आहेत म्हणोन हुजूर विदित जालें. त्यावरून पत्र सादर केले असे; तरी त्यास बोलाऊन आणून येविसी निक्षून ताकीद करून खुद त्यांजकडे ऐवज किती व इतर सिलेदारांकडे ऐवज किती; ते कोण कोठे राहातात त्याची चौकसी करून त्यापैकीं तेथे ज्या आसामी असतील त्यासुधां माारनिल्हेस हुजूर बंदोबस्तीने पाठऊन देणे म्हणोन त्यावरून येथे मनास आणितां भाद्रपद मासपर्यंत येथें होते. आम्ही येथे आलियावर कोठे अढलांत आले नाही. त्यावरून गाइकवाडाकडील लस्करांतहि शोध करविला; परंतु तेथे नाही. सारांश महीआलीकडे त्याचे ठिकाणी कोठे लागले नाही. पुढेहि शोध करवितो. लागलियावरी सरकार आज्ञेप्राा घडेल. सेवे (सी) श्रुत होये, हे विज्ञाप्ति.

¶*Trimbak Narayan to Peshwa, reporting details of some monetary dealings of Trimbak Bhalerao.*

[22-10-1771

No. 108]

पौ छ १६ रजब

आश्विन मास

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
गोविंदपंत तात्या स्वामींचे सेवेसी

पो अंताजी विस्वनाथ सां नमस्कार विनंती. येथील कुशल ताा आस्विन शुाा १४ मुाा संवछर वर्तमान येथास्थित असे. विशेष. आपण येक दोन पत्रे पाठविली ते पावोन लिहिले सर्व कलले. इकडील पेशजी येक दोन पत्री लिहिलेच आहे. त्यावरून कललेच असेल. उभयेता श्रीमंताच्या भेटी सुरेगांवच्या मुकामी जाहाल्या. तेथे दाहा बारा मुकाम होते. काल तेथून या मुकामास आले. ग्रहणी थोरले राव याची तुला होत आहे. साहित्य कचेश्वरी होत आहे. ग्रहण जाहालियावर टोक्याकडे जावयाचा रोख दिसतो. कलावें. कामकाजाचा मजकूर तर दसरेयाचे मुहूर्ते साल माारचे अजमासाच्या मखलाश्या होऊ लागल्या. खानदेसचे मात्र पांच सात माहाल जाहाले आहेत वरकड आपणाकडील काही आद्याप नाही. श्रीमंत राजश्री दादा फडणीस मुहूर्ते करून बाहेर आले

1881

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

नवते. याकरिता या मुकामीहून माघारे येणार. पुण्याहून बाहेर निघावयाचा वद्य पंचमीचा मुहूर्त आहे; म्हणौन बोलतात. उभयेताची भोजने प्रथक राहुठ्यांत होत आहेत. कलावे. कामकाजाची जलदी नाही. दोन महिने पावेतो यापुढे लागतील ऐसे दिसते. काय घडेल ते पाहावे. बहुत काये लिहिणे? आम्ही माघारे येणार म्हणौन पाच सात वेला आपणास लिहिले होते. त्यास हरिपंत हडप यांची पत्रे आली. त्यावरून स्वस्थ आहो त्याचे पत्र यावयाविसी येईल, त्याप्रमाणे निघोन येऊ. वरकड येथील सोय सर्व बरीच आहे. घोडेदेखील उतम नाही. बरे जे आहे ते उतम मानून गुजराणी होईल. विस्तार काये लिहावा. सर्व भेटीनंतर कलेल. आपणाकडील सविस्तर लिहित असावे, हे विनंती.

¶*Antaji Vishvanath to Govindpant Tatya, giving news of the movements and doings of the Peshwa and his uncle.*

No. 109] [*23-11-1772*

श्री

नकल

राजश्री दुर्गाजी सिंदे
नामजाद किले माहुली
गोसावी यासी

ॐ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्ये श्नो माधवराव बलाल प्रधान आसीर्वाद. सुाा सलास सबैन मया व अलफ तुम्ही विनंती पत्र पाठविले ते प्रविष्ट जाहले. दौलताबादच्या तोतियाचे फितुराबाबत नारो तिमाजी व केशवभट मानवी जोसी ऐसे दोघे बंदीवान किलेमारी होते ते बेड्यासुधा रवाना केले ते पोहचले. त्याच्या बेड्या फिरोन माघारा पाठविल्या असेत. जाणिजे; छ २७ शाबान बहुत काये लिहिणे.

¶*Madhaorao to Durgoji Sindia, returning the iron shackles of two prisoners Naro Timaji and Keshaobhat Joshi, who were sent back to Poona from Mahuli.*

No. 110]

श्री

राजश्री सदासिवपंत शेवडे स्वामीस

विनंती उपरी. तुम्ही पत्र पाठविले ते पावले. श्रीमंत राजश्री दादा साहेब खासगीकडे पंधरा हजारांचे गाव घेणार. त्यांत पहिले तीन गाव घेतले आहेत.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

बाकीचे हाली घेणार; त्यास गाव पाहिले आहेत. तेथील आकार लेहून आणविला आहे. तो पाहून त्यांत गाव मर्जीस पडतील त्याची यादी लेहून पाठऊ. त्याप्रमाणे गाव द्यावयाविसी कमावीसदारास रुबरू सांगावे. सनदा ध्यावयासी ठीक दिसत नाही. यास्तव रुबरूच परवानगी सांगावी. येविसी श्रीमंतानी ल्याहावयासी आज्ञा केल्यावरून तुम्ही लिहिले, ते सविस्तर कळले. ऐसियास गाव द्यावयाचे ठरतील त्याच्या सनदा पुणियाहून होतील. तेथून सनदा देणे तर दुसऱ्या द्याव्या. येथील सनदा नसता तेथूनच सनदा द्याव्या हे ठीक नाही. हे विनंती.

¶*The letter makes a reference to sanads for the grant of some villages to Raghunathrao for his private expenses.*

No. 111] [*22-2-1774*

श्रीमोरया

श्रीमंत राजश्री तुकोजी बावा होळकर सुबेदार साहेब गोसावी यांसी

श्नो गंगाधर येसवंत कृतानेक आसीर्वाद विनंती. माझे म्हातारपण जाहाले; श्रम होईनात; याकरितां बहुता दिवसांचा शेवक आहे. माझा परलोक करावा. मुले लेकरे सर्व तुम्हापासीं आहेत. कर्ज परिहार करून मुलावर कृपा करावी. राग धरू नये. आम्ही शेवक लो (क) सहश्र अपराधी क्षेमा करून लोभ करावा. राजश्री बाजी विठल यासही आणून त्याच्या गुजारतीचे कर्जवाम फारीद करावे. सर्वा ब्राह्मणावर कृपा करावी. फार काये लिहू हे विज्ञापना. सेवटील पत्र आसे हे वित्नती.

¶*Gangadhar Yashvant takes final leave of Tukoji Holkar prior to his death.*

No. 112] [*22-2-1774*

श्रीमोरया

सहश्राय चिरंजीव राजश्री भिकोबा आन्या व ताा राजश्री कुशाबा व ताा राजश्री दादाजी व ताा राजश्री माधराव यासी प्रती गंगाधर येसवंत आसीर्वाद उपरी. वृधवस्था जाहाली. श्रम न होये. बहुत पेच कुपेच संसारामुळे जाहाले. येसियास सर्व यादीबुदी स्वदस्तुरें लिहिल्या आहेत. ते मनन करून राजश्री बाजी विठल व राजश्री सकंभट व राजश्री सिवाजी विठल सर्व मिळोन जिकडील तिकडे वारावार करणे. गांव खेडीं इनाम वगैरे वतनें चौजागा विभागें घेणे. कळह न करणें. राजश्री बाजी विठल व सकंभट सिवाजीपंत यांची आकस न

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

करणें. सर्व आन्याय माफ करणें आणि लोभ करीत जाणे. यैशीं कोण्याचीहि आकस कराल तरी माझा शफत आसे. आलाहिदा यादी लिहिल्या आहेत त्या मनांत आणून चूकभूल सांभाळने. फार काय लिहिणें हे आसीर्वाद+.

¶*Gangadhar Yashvant's letter to his sons, just previous to his death.*

No. 113] [*22-2-1774*

श्रीमोरया

सहश्राय चिरंजीव मंडली समस्त यासी गंगाधर येसवंत आसीर्वाद उपरी. माझे वृधपण जाहाले, श्रम होईनात. सर्व कारबार केला त्यांत बोलनेचालने आपराध क्षेमा करणें आणि हिसेबाकितेबा श्री स्मरोन कर्जापासून मुक्त करवणे. चौघा चिरंजीवाबर लोभ करीत जाणे. मनांत द्वेष न धरणें. श्रीप्रीतीर्थ खरे करणें. सेवटील हे पत्र लिा आसे. बहुत काय लिहिणें हे आसिर्वाद.

¶*Gangadhar Yashvant's last letter to his relations, requesting to be forgiven for all misdeeds and to be absolved from debt.*

No. 114] [*22-2-1774*

श्रीमोरया

राजश्री संताजी वावले व राजश्री सुलतानजी लांभाते समस्त लहान थोर इष्टमैत्रास कृतानेक आशीर्वाद. विनंति. माझे वृधपण जाहाले, श्रम न होयत. प्रपंचानें फार पीडलो ते दुःख काय सांगावे. याकरितां मुलें लेकरें मातुश्री बाईसाहेब व राजश्री तुकोजीबावा यांचा पदरी आहेत. त्यांचे चालऊन कर्ज परिहार होऊन त्याजवर लोभ करीत जावा. फार काय लिहू. मागे लोभ कराल तो श्रीप्रीतीर्थ आहे हे विनंती.

¶*Gangadhar Yashvant takes final leave of Wable and Lambhate.*

No. 115] [*24-2-1774*

श्रीमोरया

राजश्री बाजीपंत स्वामीस

सां नमस्कार विनंतीः उपरी. वृधआवस्था जाहाली. श्रम न होये. याकरितां सर्व यादीबुदी चिरंजीवांपासीं पाठविल्या आहेत. त्यासी मनन करून

+ गंगाधर यशवंत चंद्रचूड याचें शेवटचें पत्र, त्याचे चार मुलांस :—यशवंतराव ऊर्फ भिकोबा अन्या, कृष्णराव ऊ० कुशाबा, दादाजी व माधवराव.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

राजश्री सकंभट व राजश्री सिवाजी विठल मिळोन हिसेब क्रियेने करून वरचा व सरकारचा देणें घेणें. जिकडील तिकडे वारावार करणें. चिरंजिवांस शपतपूर्वक लिहा आहे. तुम्हीहि त्यासी संशये सोडून लोभ करणें हे विनंती.

¶*Gangadhar Yashvant sends his last desire about the disposal of his property and affairs.*

No. 116] [*25-2-1774?*

श्री.

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री हरिपंत तात्या स्वामीचे सेवेसी पो। येशवंतराव गंगाधर विनंती. उपरी येथील फाल्गुन शुद्ध १४ चतुर्दसीपर्यंत निंबगावीं असो. विशेष. तीर्थरूप तात्यांचे शरीरी आकस्मात ज्वर होऊन तीन चार दिवस समाधान वाटत नव्हते. शुद्ध ११ येकादशी मंगळवारी देवाज्ञा जाली. ईश्वरें आम्हावर मोठा काहार केला. आम्हास दुःखार्णवी सोडून गेले. आतां तीर्थरूपामागे आम्हास वडील आहेत. सर्वप्रकारें आभिमान धरून आमचे चालविणे इतःपर आपणाकडे आहे. दिवस जालियावर भेटीस येतों. आता भरंवसा आपला आहे. विशेष उपरोधिक लिहावेसे नाहीं. बहुत काय लिहिणें, लोभाची वृद्धि करावी हे विनंति.

¶*Yashvant Gangadhar informs Haripant Tatya of his father's death.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh



CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

क्रम-संख्या

श्रेणी

क्रम-संख्या

श्रेणी

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh